इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष - ४१ ▸ अंक - १६२ ▸ मंगळवार,ता.१४ ऑक्टोबर २०२५ ▸ पाने १२ | इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 ▪ पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

बेलेकर सराफ
परंपरा आणि आधुनिकतेचे संगम !
५/२३, हॉटेल तारा, शाहू कॉर्नर, इचलकरंजी - ४१६११५
संपर्क : 9595 08 9292

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक
# महासत्ता
कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

NEWLY OPEN
PETER ENGLAND
Raymond
Levi's
USPA SINCE 1890
Pepe Jeans LONDON
SWASTIK CLOTHING
VYANKATRAO HIGH SCHOOL ROAD,
ICHALKARANJI
9762951313, 9762778687

www.emahasatta.com | e-mail : mahasatta@gmail.com | mahasattaadvt@gmail.com | किंमत ₹ ५.००

# जि.प.आरक्षण सोडत ;अनेक ठिकाणी महिलाराज

## इच्छुकांच्या मोर्चेबांधणीला मिळणार गती ;इच्छुक लागले तयारीला

■ कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)-

**जिल्हा परिषद गटांसाठी आरक्षणाची सोडत सोमवारी काढण्यात आली. निवडणुका लांबणीवर गेल्यानंतर तब्बल नऊ वर्षांनी ही सोडत पार पडली. जिल्हा परिषदेचे एकूण ६८ गट असून अनेक ठिकाणी महिलांसाठी आरक्षण जाहीर झाल्याने, अनेक ठिकाणी आता 'महिला राज' येणार आहे. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही आरक्षण सोडत काढण्यात आली.**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी गटनिहाय आरक्षणाची सोडत आज जिल्हाधिकारी कार्यालयातील ताराराणी सभागृहात पार पडली. यावेळी महसूल उपजिल्हाधिकारी संपत खिल्लारी,तहसीलदार स्वप्निल पवार यांची उपस्थिती होती. जिल्ह्यातील एकूण ६८ गटांपैकी मोठ्या प्रमाणात महिला उमेदवारांसाठी आरक्षण जाहीर झाले आहे.

● हातकणंगले तालुका- घुणकी (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला), भादोळे (अनुसूचित जाती महिला), कुंभोज (सर्वसाधारण महिला), आळते (अनुसूचित जाती महिला), शिरोली पुलाची -(नागरिकांचा मागास प्रवर्ग), रूकडी -(अनुसूचित जाती), रूई (अनुसूचित जाती), कोरोची-(सर्वसाधारण महिला), कबनूर (अनुसूचित जाती), पट्टणकोडोली (अनुसूचित जाती),रेंदाळ (सर्वसाधारण).



विद्यार्थीनीच्या हस्ते आरक्षण सोडत काढण्यात येत असताना.यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे व इतर मान्यवर.

विशेष म्हणजे चंदगड तालुक्यातील चारही गटांवर महिला आरक्षण लागू झाले असून, यापैकी दोन गट खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. तसेच भुदरगड तालुक्यातील चार गटांपैकी तीन गट खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आणि एक गट ओबीसी महिलांसाठी राखीव आहे.

● शिरोळ तालुका- दानोळी (अनुसूचित जाती महिला), उदगाव (नागरिकांचा मागास प्रवर्ग), आलास (सर्वसाधारण), नांदणी (अनुसूचित जमाती महिला), यड्राव (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला), अब्दुललाट (अनुसूचित जाती महिला), दत्तवाड (सर्वसाधारण महिला).

गगनबावडा तालुक्यातील तिसंगी आणि असळज या दोन्ही गटांपैकी तिसंगी गट सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. शाहूवाडी तालुक्यात सरूड आणि बांबवडे हे दोन मतदारसंघ नागरिकांचा मागास प्रवर्ग तर शित्तूर वारूण गट सर्वसाधारण आणि आंबर्डे हा सर्वसाधारण महिला असे आरक्षित झाले आहेत.एकूणच, गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आरक्षण जाहीर झाल्याने इच्छुक उमेदवारांच्या मोर्चेबांधणीला आता वेग येणार आहे.

ज्याठिकाणी सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाले आहे. त्या ठिकाणी मात्र चुरस तीव्र होण्याची चिन्हे आहेत. जिल्हा परिषद निवडणुका लांबणीवर गेल्या होत्या ;मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली. त्यामुळे तब्बल नऊ वर्षांनंतर जिल्हा परिषद आणि पंचायत समितीसाठी आरक्षण सोडत घेण्यात आली.

(पान २ वर)

## महाराष्ट्रात मंकी पॉक्सचा शिरकाव
### धुळ्यात आढळला रुग्ण

■ मुंबई,ता.१३-

**जगात थैमान घालणाऱ्या मंकी पॉक्सचा राज्यातील पहिला रुग्ण धुळ्यात आढळून आला आहे. त्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. रुग्णाचे दोन्ही रिपोर्ट पॉझिटीव्ह आल्याने हिरे रुग्णालय प्रशासनही सतर्क झाले आहे.**

मंकी पॉक्स हा संसर्गजन्य आजार असल्याने रुग्णाला स्वतंत्र विलगीकरण कक्षात दाखल करण्यात आले असून त्याच्या संपर्कातील व्यक्तींचा शोध घेण्यासाठी महापालिकेला कळविण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनाही याबाबत सुचित करण्यात आले आहे. मंकी पॉक्स (पान २ वर)

## संजय राऊत रुग्णालयात दाखल

■ मुंबई,ता.१३-



**शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना मुंबईतील भांडुप येथील फोर्टिज रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**

काही दिवसापूर्वी त्यांनी फोर्टिज रुग्णालयात रक्त तपासणी केली होती. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. अस्वस्थ वाटत असल्याने तातडीने फोर्टिज रुग्णालयात दाखल करण्यात आले. राऊत यांना सोमवारी अचानक रुग्णालयात का दाखल केले, याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार त्यांना नियमित तपासणीसाठी रुग्णालयात दाखल (पान २ वर)

## लालू,राबडीदेवी,तेजस्वी यादव यांच्यावर आरोप निश्चित

■ नवी दिल्ली,ता.१३-

**आगामी बिहार निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयआरसीटीसी हॉटेल भ्रष्टाचार प्रकरणात लालू प्रसाद यादव यांच्यावर आरोप निश्चित करण्यात आले आहेत. राऊस ॲव्हेन्यू येथील विशेष न्यायाधीशांच्या न्यायालयाने आयआरसीटीसी हॉटेल भ्रष्टाचार प्रकरणात माजी रेल्वे मंत्री लालू प्रसाद यादव यांच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ४२०, १२० आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा (पीसी कायदा) अंतर्गत आरोप निश्चित केले आहेत.**

न्यायालयाने राबडी देवी आणि तेजस्वी यादव यांच्यावर फसवणूक आणि गुन्हेगारी कट रचल्याचे आरोप देखील निश्चित केले. न्यायालयाने तिन्ही



### आयआरसीटीसी घोटाळा

आरोपींना विचारले की, त्यांनी गुन्हा कबूल केला आहे की, खटल्याला सामोरे जाणार आहे. तिन्ही आरोपींनी त्यांचा गुन्हा नाकारला आणि सांगितले की, ते खटल्याला सामोरे जातील (पान २ वर)

## हातकणंगलेत पं.समितीच्या बावीस गणांची आरक्षण सोडत जाहीर

■ हातकणंगले,ता.१३(प्रतिनिधी)-

**हातकणंगले तालुका पंचायत समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी बावीस गणांच्यासाठी लकी ड्रॉ पद्धतीने सोडत जाहीर करण्यात आली.प्रांताधिकारी दिपक शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व प्रक्रिया तहसिलदार कार्यालयाच्या इमारतीत दुपारी दोन वाजता पार पडली. यावेळी लोकांची उपस्थिती अत्यल्प होती. आरक्षणामध्ये अनुसुचित जाती चार, इतर मागासवर्गीय पाच, सर्वसाधारण तेरा अशी विभागणी करण्यात आली आहे.**

तालुक्यात एकूण बावीस गण असून यातील महिलांसाठी असलेल्या पन्नास टक्के आरक्षणानुसार अकरा गण महिलासाठी

**सर्वसाधारण १३, अनुसुचित जाती ४ तर इतर मागासवर्गीसाठी ५**

आरक्षित करण्यात आले आहेत. यामध्ये अनुसचित जातीसाठी रुकडी, पट्टणकोडोली, आळते, हेर्ले हे चार गण राखीव ठेवण्यात आले आहेत. यातील पट्टणकोडोली, रुकडी हे दोन गण महिलांसाठी आरक्षित आहेत.

इतर मागासवर्गीयसाठी रेंदाळ (पूर्व), नागाव, रेंदाळ (पश्चिम), सावर्डे शिरोली हे पाच गण आरक्षित आहेत. यातील शिरोली, सावर्डे, रेंदाळ (पश्चिम) हे तीन गण महिलासाठी गण राखीव आहेत. तर तेरा गण सर्वसाधारण आरक्षित ठेवण्यात आले आहेत. तारदाळ, घुणकी, कबनुर (पुर्व), रुई, माणगाव, कुंभोज, कबनुर (पश्चिम), लाटवडे, कोरोची, भादोले, टोप, नवे पारगाव, चंदूर, यातील तारदाळ, घुणकी, कबनुर (पुर्व) (पान २ वर)

## जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| राधानगरी | ८.३६ | ८.२७ |
| तुळशी | ३.४७ | ३.४७ |
| वारणा | ३४.४० | ३४.४० |
| काळम्मावाडी | २५.३९ | २१.९२ |
| कासारी | २.७७ | २.७६ |
| कडवी | २.५२ | २.५२ |
| कुंभी | २.७२ | २.७० |
| पाटगाव | ३.७२ | ३.७२ |
| चिकोत्रा | १.५२ | १.५२ |
| चित्री | १.८९ | १.८९ |
| जंगमहट्टी | १.२२ | १.२२ |
| घटप्रभा | १.५६ | १.५६ |
| जांबरे | ०.८२ | ०.८१ |
| आंबेआहोळ | १.२४ | १.२१ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६७ |
| धामणी | १.२९ | १.२५ |

## एन.चंद्रशेखरन यांचा कार्यकाळ वाढवला

■ मुंबई,ता.१३-



**रतन टाटा यांच्या जाण्यानंतर टाटा समूहात निर्माण झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर, टाटा सन्सच्या विश्वस्त मंडळाने टाटा सन्सचे विद्यमान अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांचा कार्यकाळ २०३२ पर्यंत वाढवण्यात आला आहे.**

चंद्रशेखरन सध्या अध्यक्ष म्हणून दुसरा कार्यकाळ पूर्ण करत असून, तो मूळतः (पान २ वर)

**टाटा समूहाच्या छत्राखाली सध्या ३० कंपन्या कार्यरत असून त्या १० विविध व्यवसाय क्षेत्रांमध्ये जगभरातील १०० हून अधिक देशांमध्ये सेवा देतात. त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा मोटर्स, टाटा स्टील, टाटा पॉवर, टाटा कन्झ्युमर आणि एअर इंडिया यांसारख्या कंपन्यांनी नव्या युगातील व्यवसाय मॉडेलकडे वाटचाल सुरू ठेवली आहे.**

## हमासच्या कैदेतून इस्त्रायली वीस ओलिसांची सुटका

### डोनाल्ड ट्रम्प शांतता योजनेला यश



■ जेरुसलेम,ता.१३-

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गाझामध्ये सुरू केलेल्या शांतता योजनेला यश आले आहे.इस्त्रायल आणि हमास यांनी ट्रम्प यांच्या शांतता योजनेवर सहमती दर्शवली आहे.**

गाझामध्ये दोन वर्षांपासून सुरू असलेल्या विनाशकारी संघर्षाचा शेवट करण्याच्या दिशेने हा युध्दविराम करार एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या कराराअंतर्गत हमासने उरलेले सर्व इस्त्रायली ओलिस सोडले आहेत. या युध्दबंदी दरम्यान ट्रम्प इस्त्रायलमध्ये पोहोचले आहेत. (पान २ वर)

## दहावी,बारावी परीक्षांच्या तारखा झाल्या जाहीर

■ मुंबई,ता.१३-

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या तारीख जाहीर करण्यात आल्या आहेत. फेब्रुवारी-मार्च २०२६ परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. १० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ दरम्यान बारावीची परीक्षा होणार आहे. २० फेब्रुवारी ते १८ मार्च दहावीची परीक्षा होणार आहे. लेखी परीक्षेच्या तारखा जाहीर झाल्या आहेत.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी (एसएससी) आणि बारावी (एचएससी) परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. लाखो विद्यार्थ्यांसाठी हे वेळापत्रक महत्त्वाचे ठरले असून, फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये परीक्षा घेण्यात येतील. लेखी परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक लवकरच उपलब्ध होईल, ज्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना तयारीसाठी पुरेसा वेळ मिळेल. मंडळाने पारदर्शकतेसाठी हे वेळापत्रक आधीच प्रसिद्ध केले आहे.बारावी परीक्षा १० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १२३८०० रु. | १७२००० रु. |

अंडी ५८० रुपये शेकडा

## हास्यतुषार - सुरेंद्र दास





महागाईचा मुद्दा जिवंत ठेवण्याचे विरोधी पक्षाचे षड्यंत्र आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांना ६ हजार रुपये दिवाळी भेट
### वेतनवाढीच्या फरकाचा हप्ता आता वेतनासोबत देणार

■ मुंबई,ता.१३-

**एसटीच्या सुमारे ८५ हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचा तसेच वेतन वाढीचा फरक वेतनासोबत देण्यासाठी महामंडळाला दरमहा ६५ कोटी रुपये देण्याचा आणि पात्र कर्मचाऱ्यांना दिवाळी अग्रीम म्हणून १२ हजार ५०० रुपये देण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे जाहीर केला.**

एसटीच्या सर्व कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, राज्यात अतिवृष्टीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकार शेतकरी



बांधवांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहिले आहे. एसटी कर्मचाऱ्यांची दिवाळी देखील गोड झाली पाहिजे म्हणून शासनाने आज हा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर एसटीला आर्थिकदृष्ट्या समृद्ध करणे गरजेचे आहे. एस टी महामंडळाचे उत्पन्न वाढण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी खासगी शासकीय सहभागी (पान २ वर)

## १२ कोटीचा गंडा घालून पसार झालेला महाठग राजेंद्र नेर्लेकर अखेर गजाआड

■ हुपरी,ता.१३(वार्ताहर)-

**भरघोस परताव्याचे स्वप्न दाखवून सामान्य गुंतवणूकदारांना कोट्यवधींचा गंडा घालून फरार झालेल्या मुख्य आरोपीला अखेर आर्थिक गुन्हे शाखेच्या कोल्हापूर पथकाने बेड्या ठोकल्या आहेत.**

विविध कंपन्या आणि फॉरेक्स ट्रेडिंगच्या जाळ्यात अडकवून तब्बल १२ कोटी ३५ लाख ३५ हजार १३८ रुपये इतक्या मोठ्या रकमेची फसवणूक करणारा मास्टरमाईंड राजेंद्र भीमराव नेर्लेकर (रा.हुपरी) याला आदमापूर येथून अटक करण्यात आली असून, त्याला १८ ऑक्टोबर २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.



**४५ दिवसांत पैसे दुप्पट करण्याचे आमिष**

हुपरी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या या गंभीर गुन्ह्यात राजेंद्र नेर्लेकर आणि त्याचा मुलगा बालाजी राजेंद्र नेर्लेकर यांनी फिर्यादी विनायक पाटील आणि इतर गुंतवणूकदारांना गंडा घातला होता. माझा मुलगा बालाजी फॉरेक्स ट्रेडिंगमध्ये निष्णात असून, केवळ ४५ दिवसांत गुंतवलेली रक्कम दुप्पट करू शकतो, असे आमिष दाखवून राजेंद्र नेर्लेकर याने लोकांचा विश्वास संपादन केला आणि कोट्यवधी रुपये गोळा केले.

**वर्षभरापासून फरारी मास्टरमाईंड जेरबंद**

२२ ऑक्टोबर २०२४ रोजी फिर्याद दाखल झाल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेने तातडीने तपास सुरू केला होता. या गुन्ह्यात सहभागी असलेला त्याचा मुलगा बालाजी याला त्वरित अटक झाली, मात्र मुख्य आरोपी राजेंद्र नेर्लेकर गुन्हा दाखल झाल्यापासून पसार झाला होता. तब्बल वर्षभरापासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या या मुख्य आरोपीला अखेर १२ ऑक्टोबर २०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.

(पान २ वर)

(पान १ वरून)

## राऊत रूग्णालयात दाखल

करण्यात आले आहे. सोमवारी सकाळी राऊत यांनी नेहमीप्रमाणे पत्रकार परिषद घेतली.दरम्यान त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## आरोप निश्चित

आणि आरोपांना आव्हान देतील.लालू यादव रेल्वेमंत्री असताना रांची आणि पुरी येथील दोन आयआरसीटीसी हॉटेल्सच्या निविदा वाटपात झालेल्या भ्रष्टाचाराशी संबंधित हा खटला आहे. हॉटेल वाटपाच्या बदल्यात कुटुंबाला फायदा व्हावा यासाठी जमिनीचे व्यवहार करण्यात आल्याचा आरोप आहे.लालू प्रसाद यादव व्हीलचेअरवरून न्यायालयात पोहोचले होते.तेजस्वी यादव आणि राबडी हे देखील लालू यादव यांच्यासोबत न्यायालयात गेले होते. दरम्यान, आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे आणि त्याचा निवडणुकीवर मोठा परिणाम होऊ शकतो.

## चंद्रशेखरन यांचा कार्यकाळ वाढवला

२०२७ मध्ये संपणार होता. मात्र आता त्यांना तिसरा पाच वर्षांचा कार्यकाळ देण्यात आला आहे. ते २०३२ मध्ये वयाच्या ७० व्या वर्षी निवृत्त होतील.एन. चंद्रशेखरन पहिल्यांदा ऑक्टोबर २०१६ मध्ये टाटा सन्सच्या संचालक मंडळात सामील झाले होते आणि जानेवारी २०१७ मध्ये रतन टाटा यांच्या उत्तराधिकारी म्हणून अध्यक्षपदी नियुक्त झाले.त्यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने अनेक धोरणात्मक बदल केले आणि जागतिक स्तरावर आपला ठसा अधिक मजबूत केला. त्यांच्या कार्यकाळात डिजिटल रूपांतरण, टिकावू विकास आणि जागतिक विस्तार या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला.

टाटा सन्स ही टाटा समूहाच्या सर्व कंपन्यांची मुख्य होल्डिंग आणि गुंतवणूक कंपनी आहे. तिच्याकडे टाटा समूहातील सुमारे ६६ टक्के हिस्सा आहे, जो विविध टाटा ट्रस्टकडे आहे. हे ट्रस्ट शिक्षण, आरोग्य,कला,संस्कृती आणि उपजीविका निर्मिती यांसारख्या सामाजिक क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत.जमशेदजी टाटा यांनी १८६८ मध्ये टाटा समूहाची स्थापना केली होती आणि आज तो भारतातील सर्वांत मोठा बहुराष्ट्रीय समूह म्हणून ओळखला जातो.टाटा समूह आज भारतीय अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक मानला जातो. चहाच्या पानांपासून ते कार, घड्याळे, हॉटेल्स, आयटी सेवा आणि मनोरंजन क्षेत्रापर्यंत – टाटा समूहाची उत्पादने आणि सेवा प्रत्येक भारतीयाच्या दैनंदिन जीवनाचा एक भाग बनल्या आहेत. एन. चंद्रशेखरन यांचा कार्यकाळ वाढवण्याचा निर्णय हा समूहाच्या सातत्यपूर्ण आणि स्थिर नेतृत्वाची खात्री देणारा मानला जात आहे. त्यांच्या तंत्रज्ञानविषयक पार्श्वभूमीमुळे आणि दूरदृष्टीमुळे समूहाने नव्या काळात डिजिटल परिवर्तन, हरित ऊर्जा आणि जागतिक गुंतवणूक यांमध्ये आघाडी घेतली आहे.

## मंकीपॉक्सचा रूग्ण आढळला

बाधित रुग्ण २ ऑक्टोबर रोजी तो सौदी अरेबियाहून धुळ्यातील गरीब नवाजनगर येथे आला होता. गेल्या चार वर्षांपासून तो सौदी अरेबियात वास्तव्यास आहे. त्याच्या मुलीचे लग्न असल्याने तो धुळ्यात आला होता. मात्र, येथे आल्यानंतर त्याला त्वचेचा त्रास जाणवू लागला. त्यामुळे तो दि. ३ ऑक्टोबर रोजी हिरे रुग्णालयात तपासणीसाठी गेला.या रुग्णाने हिरे रुग्णालयातील डॉक्टरांना आपला त्रास सांगितला. डॉक्टरांना मंकी पॉक्सची लक्षणे दिसून आल्याने मनपाच्या पथकाने सदर रुग्णाच्या रक्ताचे नमूने घेतले होते. सदर सॅम्पल पुण्यातील एनआयव्हीकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. या रुग्णाचा मंक्सी पॉक्सचा रिपोर्ट पॉझिटीव्ह आला. डॉक्टरांनी शंकेचे निरसन करण्यासाठी पुन्हा रक्ताचे नमूने तपासणीसाठी पाठविले होते.

धुळ्यात आढळलेला मंकी पॉक्सचा रुग्ण हा महाराष्ट्रातील पहिलाच रुग्ण असल्याचे पुण्यातील एनआयव्हीने स्पष्ट केले आहे. मंकी पॉक्समध्ये दोन प्रकारचे व्हेरीयंट आहेत. त्यात क्लायड-१ हा दुर्मिळ व अधिक संसर्गजन्य असतो. भारतात आतापर्यंत याचे ३५ रुग्ण आढळले आहेत. तर महाराष्ट्रातील ही पहिलीच केस आहे. सदर रुणाला डायबेटीज असल्याने बरा होण्यासाठी वेळ लागत आहे. मंकी पॉक्स आजार पसरु नये म्हणून महापालिका व जिल्हाधिकारी यांना कळविले असल्याची माहिती रुग्णालयाने दिली आहे.

## आरक्षण सोडत जाहीर

रुई, माणगाव, कुंभोज हे सहा गण महिला सर्वसाधारण महिलासाठी आरक्षित आहेत.ही सोडत जियान सय्यद व सैफ सय्यद या लहान मुलांच्या हस्ते काढण्यात आली. यावेळी तहसिलदार सुशिल बेल्हेकर, नायब तहसिलदार संदीप चव्हाण, मुख्याधिकारी विशाल पाटील, गटविकास अधिकारी शबाना मोकाशी यांच्यासह तालुक्यातील विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**पंचायत समिती निर्वाचन गणाचे नाव- आरक्षण** नवे पारगांव (सर्वसाधरण), घुणकी (सर्वसाधाण महिला), भादोले (सर्वसाधारण), टोप (सर्वसाधारण), लाटवडे (सर्वसाधारण), कुंभोज (सर्वसाधारण महिला), आळते (अनुसूचित जाती), सावर्डे (ना.मा.प्रवर्ग महिला), नागांव (ना.मा.प्रवर्ग), शिरोली (ना.मा.प्रवर्ग महिला), हेरल (अनुसूचित जाती), रुकडी (अनुसूचित जाती महिला), माणगांव (सर्वसाधारण महिला), रूई (सर्वसाधारण महिला), कोरोची (सर्वसाधरण), तारदाळ (सर्वसाधारण महिला), कबनूर पूर्व (सर्वसाधारण महिला), कबनूर पश्चिम (सर्वसाधारण), प. कोडोली (अनुसूचित जाती महिला), चंदूर (सर्वसाधारण), रेंदाळ पूर्व (ना.मा प्रवर्ग), रेंदाळ पश्चिम (ना.मा प्रवर्ग महिला).

## वीस ओलीसांची सुटका

सर्वप्रथम हमासने सोमवारी आधी ७ आणि त्या पाठोपाठ उर्वरित १३ इस्त्रायली ओलिसांचीही सुटका केली. याशिवाय, २६ मृत बंदिवानांचे मृतदेह देखील सोडले जाण्याची शक्यता आहे.

तेल अवीवमध्ये होस्टेज स्क्वेअर येथे शेकडो नागरिक एकत्र आले होते, जे ओलिसांच्या सुटकेनंतर आनंद व्यक्त करत होते. दुसरीकडे, इस्त्रायली लष्कराने सांगितले की, रेडक्रॉसच्या माध्यमातून गाझामधून बाहेर काढण्यात २० जिवंत ओलिस बाहेर काढण्यात आले. ही सुटका मागील आठवड्यात मिसरमधील शर्म अल-शेख रिसॉर्टमध्ये झालेल्या युध्दविराम कराराच्या पहिल्या टप्प्यातील सर्वांत महत्त्वाच्या भागांपैकी एक आहे.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प सध्या मिडल ईस्ट दौऱ्यावर असून ते इस्त्रायलच्या दौऱ्यावर पोहोचले आहेत. ट्रम्प यांचे एअर फोर्स वन विमान सोमवारी तेल अवीवजवळील बेन गुरियन विमानतळावर उतरले. इस्त्रायलला रवाना होण्यापूर्वी पत्रकारांशी बोलताना ट्रम्प यांनी दावा केला होता की, इस्त्रायल आणि हमासमधील युध्द आता संपुष्टात आले आहे.गेल्या दोन वर्षांत झालेल्या या युध्दामुळे गाझाचा संपूर्णपणे विध्वंस झाले आहे. गाझा सिटीमध्ये राहणाऱ्या जवळपास सर्वच नागरिकांचे घरे उद्ध्वस्त झाली आहेत.अशा पार्श्वभूमीवर, शाश्वत शांततेकडे होणारी प्रगती आता जागतिक बांधिलकीवर अवलंबून आहे.

# जि.प.आरक्षण सोडत;अनेक ठिकाणी महिलाराज

(पान १ वरून)

ही सोडत राज्य निवडणूक आयोगाच्या २०२५ च्या मार्गदर्शन सूचनांनुसार काढण्यात आली. जिल्हा परिषदेचे एकूण ६८ गट असून, त्यापैकी ९ गट लोकसंख्येच्या निकषानुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव करण्यात आले आहेत. त्यापैकी ४ गट अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव आहेत, तर १ गट अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. उर्वरित ५८ गटांपैकी १८ गट नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) यांच्यासाठी राखीव असून, उर्वरित ४० गट सर्वसाधारण प्रवर्गासाठी जाहीर झाले आहेत.

**जिल्हा परिषद गटांसाठी आरक्षण पुढीलप्रमाणे–**

**शाहूवाडी तालुका–** शित्तुर तर्फ वारूण (सर्वसाधारण),सरूड (नागरिकांचा मागास प्रवर्ग),बांबवडे (नागरिकांचा मागास प्रवर्ग),आंबर्डे (सर्वसाधारण महिला).

**पन्हाळा तालुका –** सातवे (सर्वसाधारण), कोडोली (सर्वसाधारण), पोर्ले तर्फ ठाणे (सर्वसाधारण), यवलूज (सर्वसाधारण महिला), कोतोली (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला), कळे (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिल).

**कागल तालुका–** कसबा सांगाव (अनुसूचित जाती महिला), सिद्धनेर्ली (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला), बोरवडे (सर्वसाधारण महिला), म्हाकवे (नागरिकांचा मागास प्रवर्ग), चिखली (सर्वसाधारण महिला), कापशी (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला). **करवीर तालुका–** शिये (नागरिकांचा मागास प्रवर्ग), वडणगे (सर्वसाधारण), उचगाव (सर्वसाधारण), मुडशिंगी (नागरिकांचा मागास प्रवर्ग), गोकुळ शिरगाव (सर्वसाधारण). पाचगाव (सर्वसाधारण), कळंबे तर्फ ठाणे (सर्वसाधारण महिला), पाडळी खुर्द (सर्वसाधारण), शिंगणापूर (सर्वसाधारण महिला), सांगरूळ (सर्वसाधारण महिला), सडोली खालसा (सर्वसाधारण), निगवे खालसा (सर्वसाधारण).

**गगनबावडा तालुका–** तिसंगी (सर्वसाधारण महिला), असळज (सर्वसाधारण).

**राधानगरी तालुका–** राशिवडे बुद्रुक (सर्वसाधारण), कसबा तारळे (सर्वसाधारण महिला), कसबा वाळवे (नागरिकांचा मागास प्रवर्ग), सरवडे (सर्वसाधारण महिला), राधानगरी (सर्वसाधारण).

**भुदरगड तालुका–** गारगोटी (सर्वसाधारण महिला), पिंपळगाव (सर्वसाधारण महिला), आकुर्डे (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला), कडगाव (सर्वसाधारण महिला). **आजरा तालुका–** उत्तूर (सर्वसाधारण), पेरणोली (सर्वसाधारण).

**गडहिंग्लज तालुका–** कसबा नूल (नागरिकांचा मागास प्रवर्ग), हलकर्णी (सर्वसाधारण), भडगाव (सर्वसाधारण), गिजवणे (सर्वसाधारण महिला), नेसरी (सर्वसाधारण). **चंदगड तालुका–** आडकूर (सर्वसाधारण महिला), माणगाव (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला), कुदनूर (सर्वसाधारण महिला), तुडये (नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला).

# तामिळनाडू चेंगराचेंगरी प्रकरण; सीबीआय चौकशीचे आदेश

■ नवी दिल्ली,ता.१३–

**टीव्हीकेने तामिळनाडूतील करूर येथे अभिनेता-राजकारणी विजय यांच्या रॅली दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीची स्वतंत्र चौकशी व्हावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.**

सर्वोच्च न्यायालयाने या याचिकेवर निकाल देत या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. टीव्हीकेने सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीशांच्या देखरेखीखाली चेंगराचेंगरीची चौकशी करण्याची मागणी केली होती. कारण पक्षाने म्हटले होते की, केवळ तामिळनाडू पोलीसांनी स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने जनतेचा विश्वास निर्माण करणार नाही. पक्षाने असाही आरोप केला की,चेंगराचेंगरी ही पूर्वनियोजित कटाचा भाग असू शकते.

टीव्हीकेच्या विनंतीवरून, सर्वोच्च न्यायालयाने करूर चेंगराचेंगरीच्या सीबीआय चौकशीचे निरीक्षण करण्यासाठी समितीचे प्रमुख म्हणून माजी न्यायाधीश अजय रस्तोगी यांची नियुक्ती केली आहे. टीव्हीकेचे सचिव आधव अर्जुन यांनी सर्वोच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली होती. यापूर्वी, मद्रास उच्च न्यायालयाने एक एसआयटी स्थापन केली होती. आणि याला टीव्हीकेने आव्हान दिले होते.

चेंगराचेंगरीनंतर लगेचच वाद आणि आरोपांना सुरुवात झाली. करूर पोलीसांनी गुन्हा दाखल केला होता.ज्यामध्ये टीव्हीकेचे करूर (उत्तर) जिल्हा सचिव मधियाझगन, सरचिटणीस बसी आनंद आणि सहसरचिटणीस सीटीआर निर्मल कुमार यांच्यावर खून, हत्येचा प्रयत्न आणि इतरांचे जीव धोक्यात घालणे यासारखे गंभीर आरोप लावण्यात आले आहेत. चेंगराचेंगरीत गुप्तचर यंत्रणेने कोणताही दोष नसल्याचे पोलीसांचे म्हणणे आहे.

अभिनेता विजय रॅलीत उशिरा पोहोचला आणि लोक अनेक तासांपासून वाट पाहत होते.

पोलीस अधिकाऱ्यांनी आयोजकांना विजयची विशेष रॅली बस नियुक्त केलेल्या जागेच्या किमान ५० मीटर आधी थांबवण्याचे निर्देश दिले होते. पण आयोजकांनी बस नियुक्त केलेल्या जागेवर उभी केली.पोलीसांच्या म्हणण्यानुसार, विजय दहा मिनिटे बसमधून बाहेर पडला नाही. ज्यामुळे गर्दीत असंतोष निर्माण झाला. जनता त्याला पाहण्यास उत्सुक होते.

टीव्हीकेने १०,००० लोकांना सामावून घेण्यासाठी रॅलीसाठी परवानगी मागितली होती. पण सुमारे २५,००० लोक जमले होते. पोलीसांनी सांगितले की, पक्षाने पाणी, सुरक्षा आणि इतर सुविधांसाठी पुरेशी व्यवस्था केली नव्हती आणि परवान्याच्या अटींचे पालन केले नव्हते.

## मत चोरी संदर्भातील याचिका फेटाळली

नवी दिल्ली,ता.१३–

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी कर्नाटक विधानसभा निवडणुकीत अपारदर्शकतेचे आरोप केले होते. या पार्श्वभूमीवर सुप्रीम कोर्टात एक याचिका दाखल करण्यात आली होती, ज्यामध्ये कथित मत चोरी प्रकरणाची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली आहे. तसेच न्यायालयाने स्पष्ट केले की, हा विषय निवडणूक आयोगाच्या अधिकार क्षेत्रात येतो, त्यामुळे याचिकाकर्त्यांनी हे प्रकरण आयोगासमोर मांडावे.

## तारखा झाल्या जाहीर

(पान १ वरून)

होऊन १८ मार्च २०२६ पर्यंत चालेल. या कालावधीत विज्ञान, वाणिज्य, कला आणि व्यावसायिक शाखांच्या विषयांच्या लेखी परीक्षा घेतल्या जातील. व्यावहारिक परीक्षा जानेवारीच्या शेवटी किंवा फेब्रुवारीच्या सुरुवातीला होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनी विषयवार अभ्यासक्रम पूर्ण करून सराव परीक्षा द्याव्यात. दहावी परीक्षा २० फेब्रुवारी २०२६ ते १८ मार्च २०२६ पर्यंत आयोजित केली जाईल. या परीक्षेत गणित, विज्ञान, भाषा आणि सामाजिक शास्त्र यांसारखे प्रमुख विषय समाविष्ट असतील. मंडळाने परीक्षांच्या सकाळ आणि दुपारच्या सत्रांचे वेळापत्रक लवकर जाहीर करण्याचे संकेत दिले आहेत.

## ६ हजार रूपये दिवाळी भेट

(पान १ वरून)

तत्वावर (पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप) एस टी महामंडळाच्या जागांचा विकास करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून ६ हजार रुपये देण्यासाठी शासनाने सुमारे ५१ कोटी रुपये अनुदान देण्याचे मान्य केले आहे. तसेच सन २०२०-२४ दरम्यानच्या वेतन वाढतील फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांना दरमहा वेतना सोबत देण्यात येणार असून यासाठी शासनाने ६५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबरोबरच जे पात्र कर्मचारी सण अग्रीम घेण्यास इच्छुक आहेत त्यांना देखील पूर्वीप्रमाणे १२ हजार ५०० रुपये देण्यात येणार आहेत त्यासाठी शासनाकडे ५४ कोटी रुपयांची मागणी एसटी महामंडळाने केली आहे, असे श्री सरनाईक यांनी सांगितले.

या बैठकीस परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नविन सोना, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओमप्रकाश गुप्ता, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, एस. टी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, सहसचिव राजेंद्र होळकर, विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# पंचायत समितींच्या सभापती पदांचे आरक्षण निश्चित

■ कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्ह्यातील पंचायत समितींच्या सभापती पदांची आरक्षण सोडत जिल्हाधिकारी अमोल येडगे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी काढण्यात आली असून पंचायत समित्यांसाठी पडलेले आरक्षण पुढीलप्रमाणे आहे, असल्याची माहिती महसूल उपजिल्हाधिकारी डॉ. संपत खिलारी यांनी दिली.**

सोमवारी काढण्यात आलेल्या पंचायत समिती सभापती पदासाठीचे आरक्षण पंचायत समितीनिहाय पुढीलप्रमाणे आहे. १) पंचायत समिती शाहुवाडी - सर्वसाधारण महिला २)पंचायत समिती पन्हाळा सर्वसाधारण,३) पंचायत समिती हातकणंगले-अनुसूचित जाती (महिला), ४) पंचायत समिती शिरोळ - अनुसूचित जाती, ५)पंचायत समिती करवीर- सर्वसाधारण ६) पंचायत समिती गगनबावडा - सर्वसाधारण महिला, ७) पंचायत समिती कागल-नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग (महिला),८)पंचायत समिती राधानगरी सर्वसाधारण,९) पंचायत समिती भुदरगड सर्वसाधारण, १०) पंचायत समिती आजरा - नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग (महिला), ११) पंचायत समिती गडहिंग्लज सर्वसाधारण महिला आणि १२) पंचायत समिती चंदगड-नागरिकांचा मागास वर्ग प्रवर्ग.

# सांगलीत बंगल्यात चोरी: चार लाखाचा ऐवज लंपास

■ सांगली,ता.१३(प्रतिनिधी)–

**मिरज तालुक्यातील हरिपूर येथील काळीवाट रस्त्यावरील साई मंदिरपासून काही अंतरावर सुवर्ण कारागीर स्वप्निल बेलवलकर यांच्या बंद बंगल्याला चोरट्यानी सोमवारी भरदिवसा लक्ष केले. दरवाजाचे लॉक उचकटून सव्वा दोन तोळे सोने, दीड किलो चांदी आणि ३० हजारांची रोकड असा सुमारे ४ लाखांचा ऐवज चोरट्यांनी लुटून पोबारा केला. याबाबत बेलवलकर यांनी सांगली ग्रामीण पोलिसात फिर्याद दिली आहे.**

स्वप्निल बेलवलकर हे सुवर्ण कारागीर आहेत. हरिपूरातील काळी वाट रस्त्यावर साई मंदिरपासून काही अंतरावर पाच महिन्यापूर्वी त्यांनी नवीन बंगला बांधला आहे.

काळ्या वाटेपासून आतमध्ये ५० मीटरवर अंतरावर बेलवलकर यांचा बंगला आहे. शेजारी आणखी एका बंगाली कारागीराचा बंगला आहे. दोन बंगले वगळता त्यांच्या शेजारी खुला भूखंड आहे. त्यामुळे रहदारीपासून हे दोन्ही बंगले लांब आहेत. नवीन घरात देवघर आणायचे म्हणून बेलवलकर हे पत्नीसह शिरोळ येथे गेले होते. तर त्यांची आई नोकरीनिमित्त जयसिंगपूर येथे गेली होती.दुपारी बारा ते दुपारी चारच्या दरम्यान चोरट्याने बंद बंगला हेरला. शेजारील बंगल्यात कोणतीही चाहूल लागू दिली नाही. मुख्य दरवाजाला सेंटर लॉक असताना देखील चौकटीतून लॉक उचकटून काढून आतमध्ये प्रवेश केला. आतील लोखंडी तिजोरीचे लॉक उचकटून टाकले. आतील सर्व साहित्य विस्कटले. लॉकरमध्ये ठेवलेले सव्वा दोन तोळे सोन्याचे दागिने, दीड किलो चांदी, ३० हजाराची रोकड घेऊन चोरट्याने पलायन केले. दुपारी साडे चारच्या सुमारास बेलवलकर बंगल्यात परतल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ सांगली ग्रामीण पोलिसांना कळवले. पोलिस निरीक्षक किरण चौगले हे तत्काळ पथकासह धावले. स्थानिक गुन्हे अन्वेषणचे उपनिरीक्षक कुमार पाटील हे देखील पथकासह दाखल झाले. ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. सायंकाळी उशिराने ठसेतज्ज्ञ व श्वान पथकाला पाचारण केले होते.

## दोन अमेरिकन व एका ब्रिटिश प्राध्यापकास अर्थशास्त्रातील नोबेल

■ स्टॉकहोम,ता.१३–

**अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिकाची सोमवारी घोषणा झाली आहे. यंदाचे अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक जोएल मोकिर (यूएसए), पीटर हॉविट (यूएसए) आणि फिलिप अघियन (यूके) यांना प्रदान करण्यात आले आहे.**

नोबेल समितीने म्हटले आहे की, या अर्थशास्त्रज्ञांनी नवोपक्रमामुळे आर्थिक विकास कसा होतो हे दाखवून दिले आहे. तंत्रज्ञान वेगाने बदलते आणि आपल्या सर्वांवर परिणाम करते. नवीन उत्पादने आणि उत्पादन पद्धती सतत जुन्या उत्पादनांची जागा घेतात आणि ही प्रक्रिया कधीही संपत नाही. हा शाश्वत आर्थिक विकासाचा आधार आहे, ज्यामुळे जगभरातील लोकांचे जीवनमान, आरोग्य आणि राहणीमान सुधारते.विजेत्यांना ११ दशलक्ष स्वीडिश क्रोना (₹१०.३ कोटी), सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र मिळेल. हे पुरस्कार १० डिसेंबर रोजी स्टॉकहोममध्ये प्रदान केले जातील.

# महाठग राजेंद्र नेर्लेकर अखेर गजाआड

(पान १ वरून)

**हॉटेलमध्ये लपला होता मास्टरमाईंड**

पोलीस उपअधीक्षक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस हवालदार विजय काळे यांच्या गोपनीय माहितीच्या आधारावर, पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार पोलीस निरीक्षक महेश इंगळे यांच्या नेतृत्वाखाली तातडीने पथक तयार करण्यात आले. या पथकाने अत्यंत शिताफीने आदमापूर येथील हॉटेल त्रिशा येथे लपलेल्या मुख्य आरोपी राजेंद्र नेर्लेकर याला ताब्यात घेतले. पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता आणि पोलीस उपअधीक्षक सुवर्णा पत्की यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेश इंगळे, पोलीस हवालदार विजय काळे, राहुल गायकवाड, रवींद्र गायकवाड, पोलीस शिपाई विपुल माळी आणि चालक सुनील गावडे यांनी ही अत्यंत महत्त्वाची आणि यशस्वी कारवाई पार पाडली.

अटक आरोपींविरुद्ध आणखी काही गुंतवणूकदारांची फसवणूक झाली असल्यास, अशा पीडित गुंतवणूकदारांनी कोणत्याही भीतीशिवाय आर्थिक गुन्हे शाखा, कोल्हापूर येथे त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन आर्थिक गुन्हे शाखा कोल्हापूरने केले आहे.

# मिरज पं.समिती आरक्षणात लाडक्या बहिणींची बाजी

■ मिरज,ता.१३(प्रतिनिधी)–

**मिरज तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ११ मतदारसंघांपैकी ८ मतदारसंघ महिला राखीव झाले आहेत. त्यापैकी ४ मतदारसंघ मागासवर्गीय महिला २ मतदारसंघ खुल्या प्रवर्गातील महिला तर २ मतदारसंघ ओबीसी महिला राखीव झाले आहेत. केवळ दोन मतदारसंघांवर खुल्या प्रवर्गाचे आरक्षण आहे.**

जिल्हा परिषदेच्या जाहीर झालेल्या आरक्षणातून मिरज तालुक्यात महिलांना संधी मिळणार असली तरी या मतदारसंघांमध्ये बांधणी करणाऱ्या पुरुष कार्यकर्त्यांची मात्र निराशा झाली आहे. मिरज तालुक्यात जिल्हा परिषदेच्या भोसे, एरंडोली, आरग, बेडग, मालगाव, कवलापूर, बुधगाव, कसबे डिग्रज, कवठेपिरान, समडोळी, म्हैसाळ या ११ गटांचा समावेश आहे. यापैकी एरंडोली व आरग हे २ गट खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित झाले आहे. म्हैसाळ, मालगाव, बेडग व कवलापूर हे ४ गट मागासवर्गीय प्रवर्गातील महिलांसाठी राखीव झाले आहेत. त्याचबरोबर बुधगाव आणि कवठेपिरान हे दोन गट इतर मागासवर्गीय ओबीसी महिलांसाठी राखीव झाले आहेत. भोसे व कसबे डिग्रज हे खुल्या प्रवर्गासाठी, समडोळी गट इतर मागासवर्गीय आरक्षित झाला आहे.

मिरज तालुक्यातील विशेषतः पूर्व भागातील सर्वच जिल्हा परिषद गटांमध्ये सर्व प्रवर्गातील पुरुष पदाधिकारी, कार्यकर्ते दावेदार होते. त्यांनी त्या त्या मतदारसंघात बांधली सुरू केली होती. यामध्ये एरंडोली, आरग या जिल्हा परिषद गटांचा समावेश आहे. त्याचबरोबर मागासवर्गीय महिलांसाठी राखीव झालेल्या ४ गटांमध्येही मागसवर्गीय प्रवर्गातील पुरुष दावेदार होते. मात्र या गटांवर महिला आरक्षण पडल्याने पुरुष कार्यकर्त्यांची निराशा झाली आहे. तालुक्यात विशेषतः मिरज विधानसभा मतदारसंघात येणारे ४ जिल्हा परिषद गट मागासवर्गीय महिलांसाठी राखीव झाले आहेत. तर पंचायत समितीचे सभापती पदही अडीच वर्षांसाठी मागासवर्गीय महिला राखीव झाले आहे. पंचायत समितीचे टाकळी व कवलापूर हे दोन मतदारसंघ मागासवर्गीय महिला राखीव झाले आहेत. यामुळे मिरज विधानसभा मतदारसंघातून स्थानिक स्वराज्य संस्थेला यावेळी मागासवर्गीय महिलांना पदांची संधी मिळणार आहे.

**चौकट पंचायत समितीचे आरक्षण पुढीलप्रमाणे–**

**नरवाड (मागासवर्गीय); टाकळी,कवलापूर (मागासवर्गीय स्त्री); सोनी, कवठेपिरान (ओबीसी); खटाव, माधवनगर, नांद्रे (ओबीसी स्त्री), भोसे, आरग, बेडग, मालगाव, बामनोली, बुधगाव, कसबे डिग्रज, इनाम धामणी (सर्वसाधारण); एरंडोली, सलगरे, गुंडेवाडी, दुधगाव, समडोळी, म्हैसाळ (सर्वसाधारण स्त्री)**

# कफ सिरप बनवणाऱ्या कंपनीचा परवाना रद्द

■ चेन्नई,ता.१३–

**तामिळनाडू सरकारने कोल्ड्रिफ कफ सिरप बनवणारी कंपनी श्रीसन फार्मास्युटिकल्सचा उत्पादन परवाना पूर्णपणे रद्द केला आणि कंपनी कायमची बंद करण्याची घोषणा केली आहे.श्रीसन फार्मा कारखान्यात ३५० हून अधिक गंभीर अनियमितता आढळल्या आहेत.**

कोल्ड्रिफ सिरप प्यायल्याने मध्य प्रदेशात आतापर्यंत २५ मुलांचा मृत्यू झाला आहे. चेन्नईतील अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) सोमवारी श्रीसन फार्माशी संबंधित सात ठिकाणी छापे टाकले. श्रीसन फार्माचे प्रमुख कर्मचारी आणि तामिळनाडू अन्न आणि औषध प्रशासन (टीएनएफडीए) चे अटक केलेले प्रभारी संचालक पी.यू. कार्तिकेयन यांच्या जागेवरही छापे टाकण्यात आले.कार्तिकेयन यांना जुलै २०२५ मध्ये लाचखोरीच्या प्रकरणात अटक करण्यात आली होती.

भेसळयुक्त कोल्ड्रिफ सिरपच्या उत्पादन आणि विक्रीशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या संदर्भात मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) ईडीची नवीनतम कारवाई केली जात आहे.

सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशननुसार, श्रीसन फार्माला २०११ मध्ये तामिळनाडू फूड अँड ड्रग्ज ॲडमिनिस्ट्रेशनकडून परवाना मिळाला.ही कंपनी कांचीपुरममधील एका लहान लोखंडी शेड कारखान्यात कोल्ड्रिफ सिरप तयार करत होती. ज्याचे क्षेत्रफळ फक्त २००० चौरस फूट आहे.

अनेक राष्ट्रीय औषध सुरक्षा नियमांचे उल्लंघन करूनही कंपनी एका दशकाहून अधिक काळ कोणत्याही निर्बंधांशिवाय कार्यरत होती. राज्य औषध नियंत्रण विभागाच्या तपासणीदरम्यान श्रीसनच्या उत्पादन युनिटला औषध निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या गुणवत्ता मानकांमध्ये असंख्य कमतरता आढळल्या होत्या.



इचलकरंजी – दिवाळीच्या पार्श्वभूमीवर शहरातील मुख्य रस्त्यासह विविध चौकात अनेक लहान मोठे स्टॉल सजू लागले असून खरेदीसाठी गर्दी होवू लागली आहे. (छाया : मयूर चिंदे)

# बाजारपेठेत विविध स्टॉल सजू लागले

## दिवाळी खरेदीसाठी मुख्य रस्त्यावर गर्दी

इचलकरंजी,ता.१३–

**वर्षभरातील सर्वात मोठा दिवाळी सणाला अवघे पाच दिवस शिल्लक राहिले आहेत. शहरातील मुख्य रस्त्यासह विविध चौक रंगीबेरंगी आकाशदिवे, रांगोळ्या, पणत्या, कपड्यांचे स्टॉलनी सजली आहे. तर खरेदीसाठी नागरिक गर्दी करू लागले आहेत. वस्त्रनगरीत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात दिवाळी साजरी केली जाते.त्या दृष्टीने व्यावसायिकांनीही साहित्यांची मांडामाड करून जय्यत तयारी केली आहे.**




इचलकरंजी शहर परिसरात सर्वच सण उत्साहात साजरे केले जातात. गणेशोत्सव नवरात्रौत्सव मोठ्या मंगलमय आणि दिमाखात साजरा केल्यानंतर आता सर्वानाच दिवाळी सणाचे वेध लागले आहेत. घरांची स्वच्छता,रंगकामापासून दिवाळीत लक्ष्मी देवीचे आगमन होणार असल्याने आकाशदिवे पणत्या, रांगोळ्यासह सजावटीच्या साहित्याची बाजारपेठेत चांगलीच रेलचेल सुरू आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर म्हणजे महात्मा गांधी पुतळा ते श्री शिवतीर्थ पर्यंत दोन्ही बाजूने विविध स्टॉल सजू लागले आहेत. दिवाळीतील मुख्य सण लक्ष्मीपूजन मंगळवार,ता.२१ ऑक्टोबरला असल्याने खास लक्ष्मी पूजनाच्या साहित्याची मागणी वाढणार असल्याने त्या दृष्टीने व्यावसायिकांनी तयारी ठेवली आहे. प्लास्टिकचे स्वास्तिक, लक्ष्मीची पावले, गोल्डन रांगोळी, स्टिकर्स रांगोळी, डिझाईन पट्ट्या,शुभ-लाभ असे साहित्य खरेदीसाठी उपलब्ध करण्यात आले आहे.

विविध साहित्याबरोबर लहान मुला-मुलीपासून युवक-युवती,महिला-पुरूष अशा सर्वांसाठी विविध कपड्यांचे स्टॉलसह विविध लहान मोठी दुकाने सजली असून खरेदीसाठी गर्दी वाढू लागली आहे.

वस्त्रोद्योगाचा महत्त्वाचा घटक असलेल्या कामगारवर्गाला पगार व बोनस येत्या दोन दिवसात हातात मिळण्याची शक्यता आहे. त्यानंतर शहरातील बाजारपेठेत खरेदीला गर्दी उसळणार आहे.

**दिवाळीच्या पार्श्वभुमीवर शहरातील मुख्य रस्त्यासह विविध चौकात विविध स्टॉल उभारण्यात आले आहे. त्यामध्ये म.गांधी पुतळा ते श्री शिवतीर्थ पर्यंतच्या रस्त्यावर सायंकाळनंतर खरेदीसाठी मोठी गर्दी होत आहे. त्यामुळे सातत्याने वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तेव्हा शहर वाहतूक शाखेने वाहतुकीचे नियोजन करावे अशी मागणी होत आहे.**

# हयात मतदारांची नावे मयत अशी नोंद

## शहापूर परिसरातील प्रकार; प्रांताधिकाऱ्यांकडे तक्रार

इचलकरंजी,ता.१३–

**शहापुर गावठाणमधील ६४ क्रमांक यादीतील ५ मतदार हयात असताना त्यांची नावे मयत अशी नोंद केल्यामुळे माजी नगरसेवक उदयसिंग पाटील यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी थेट प्रांत कार्यालय गाठले. मतदार हयात असताना अनेकांची नावे वगळण्यात आली असून काहीजणांची नांवे तर चक्क मयत म्हणून नोंदविली गेली आहेत. त्यामुळे संबंधितांना लोकशाहीने दिलेला मतदानाचा अधिकार अबाधित ठेवण्यासाठी मतदार यादीत सुधारणा करण्याची मागणी शिरस्तेदार संजय काटकर यांच्याकडे केली.**

महानगरपालिका हद्दीतील शहापुर गावठाणमध्ये ६४ क्रमांकाची मतदार यादी असून त्याची तपासणी केली असता हयात ५ मतदारांची नावे वगळण्यात आल्याच्या यादीत दाखवली आहेत. २७९-इचलकरंजी विधानसभा मतदार संघात २६४ मतदान केंद्र आहेत. त्यापैकी केवळ एका मतदान केंद्रातील यादीत हयात असताना ५ मतदारांना ते मयत दाखवणे हा गंभीर आणि लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रकार असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे इचलकरंजी कार्याध्यक्ष उदयसिंग पाटील यांनी केला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली संबंधित मतदार आणि भागातील नागरिकांनी प्रांत कार्यालयात येऊन शिरस्तेदार संजय काटकर यांची भेट घेतली.

मतदार हयात असताना अनेकांची नावे डिलीट यादीत दिसत असून सदर मतदार यादीत सुधारुन संबंधितांना लोकशाहीने दिलेला मतदानाचा अधिकार अबाधित ठेवण्याची मागणी केली. तसेच शहरातील अन्य माजी नगरसेवकांसह निवडणुक लढवु इच्छिऱ्यांनीही आपापल्या भागातील मतदार याद्या तपासुन सुधारणा करुन घेण्याचे आवाहनही पाटील यांनी केले आहे. यावेळी नागेश शेजाळे, मच्छिंद्र नगारे, ऋषिकेश सुतार, पुजा लाटवडे, कृष्णाबाई हराळे यांच्यासह भागातील नागरीक उपस्थित होते.



प्रांत कार्यालयातील अधिकाऱ्यांना निवेदन देताना उदयसिंग पाटील, मच्छिंद्र नगारे, नागेश शेजाळे व इतर. (छाया : मयूर चिंदे)

जीएसटी दर कपात = किंमतीत कपात = ग्राहकांचा फायदा

होमिओ लॅबोरेटरीज्‌ची अस्सल व दर्जेदार उत्पादने कमी किंमतीत

तीन पिढ्यांहूनही अधिक काळ अनुभवसिद्ध

डेन-टॉनिक®

बाळाचे दांत सुलभतेने येण्यासाठी उपयुक्त होमिओपाथिक गोळ्या

नकलेपासून सावधान

अस्सल डेन-टॉनिक® घ्या आणि बाळाचे आरोग्य सुरक्षित ठेवा

ऑन-टॉन्सिल®

टॉन्सिल्सच्या विकारांवर गुणकारी होमिओपाथिक गोळ्या

मार्केटिंग : बी. आर. एन्टरप्रायझेस, मुंबई. फोन : 8652756688 / 7219731618

सर्व प्रमुख केमिस्टकडे उपलब्ध

# कोरोचीला दोन जिल्हा परिषद व दोन पंचायत समिती सदस्य लाभणार

## कोरोची जि. प. मतदार संघ सर्वसाधारण महिला
## कोरोची पंचायत समितीसाठी सर्वसाधारण आरक्षण जाहीर

कोरोची,ता.१३ (वार्ताहर)–

**कोरोची जिल्हा परिषद व पंचायत समिती मतदारसंघासाठी आरक्षण सोडत सोमवारी झाले असून कोरोची जिल्हा परिषद मतदारसंघासाठी सर्वसाधारण स्त्री व पंचायत समितीसाठी सर्वसाधारण असे आरक्षण पडले असून कोरोची गावातील दोन वार्ड कबनूर जिल्हा परिषद मतदार संघामध्ये गेले असल्याने कोरोची गावाला दोन जिल्हा परिषद सदस्य व दोन पंचायत समिती सदस्य लाभणार आहेत.**

कबनूर जिल्हा परिषद मतदारसंघासाठी नागरिकांचा मागास प्रवर्ग आरक्षित असून कबनूर पश्चिम पंचायत समिती मतदारसंघासाठी सर्वसाधारण पुरुष असे आरक्षण पडले असून या दोन्ही मतदारसंघात अनेक दिग्गज इच्छुक असून अनेकांची भाऊ गर्दी पाहायला मिळणार आहे.

कोरोची जिल्हा परिषद मतदारसंघात कोरोची, तारदाळ, खोतवाडी ही गावे येत असून कोरोची गावातील दोन वार्ड हे कबनूर जिल्हा परिषद मतदार संघासाठी जोडले असल्याने कोरोची गावाला दोन जिल्हा परिषद सदस्य व दोन तालुका पंचायत सदस्य लाभणार आहेत. कोरोची जिल्हा परिषद मतदार संघासाठी सर्वसाधारण स्त्री आरक्षित असल्याने सौ. समिधा सनी ओहूळकर, सौ. मीनल प्रसाद खोबरे, सौ. दिपाली विनोद कोराने, सौ. प्रेमला दीपक पाटील, सौ. संगीता आनंद शेट्टी, सौ. रेखा अभिनंदन पाटील, सौ .शैलजा शीतल पाटील इच्छुक असून पंचायत समितीसाठी आनंदा शेट्टी ,विजय चव्हाण, सनी ओवळकर, विजय मगदूम, सचिन पवळे ,शितल पाटील इच्छुक आहेत.

कबनूर जिल्हा परिषद मतदारसंघासाठी डॉ. संतोष भोरे, लखन कांबळे, संजय शहापुरे इच्छुक असून कबनूर पंचायत समिती पश्चिमसाठी विजय मगदूम, शितल पाटील, सागर पाटील इच्छुक आहेत.

कोरोची जिल्हा परिषद मतदारसंघात २०२५ -२०३० पंचवार्षिक निवडणुकीमध्ये जि. प. साठी सर्वसाधारण स्त्री व पंचायत समितीसाठी सर्वसाधारण असे आरक्षण असल्याने दमदार व धुवाधार निवडणूक होणार असल्याची चिन्हे दिसून येत आहेत. काही पुरूष नेतेमंडळी जिल्हा परिषद सदस्याची स्वप्ने पाहणाऱ्यांना तालुका पंचायतीची निवडणूक लढवून समाधान मानावे लागणार आहे.

दरम्यान जि. प. साठी - सौ. मीनल खोबरे ,सौ .समिधा ओहूळकर, सौ दिपाली कोराने, सौ .संगीता शेट्टी, सौ. प्रेमला पाटील,सौ. शैलजा पाटील, सौ. रेखा पाटील इच्छुक आहेत तर पंचायत समितीसाठी - आनंदा शेट्टी,विजय चव्हाण, सनी ओहूळकर, विजय मगदूम, सचिन पवळे इच्छुक आहेत.

कबनूर जि. प. साठी - डॉ. संतोष भोरे,लखन कांबळे, संजय शहापुरे इच्छुक आहेत. तर कबनूर पंचायत समिती पश्चिमसाठी - शितल पाटील, विजय मगदूम, सुहास पाटील, सागर पाटील इच्छुक आहेत.

# महेश नवयुवक मंडळाच्या अध्यक्षपदी अखिल बाहेती

इचलकरंजी ,ता.१३ –

**श्री महेश सेवा समिती अंतर्गत कार्यरत श्री महेश नवयुवक मंडळ, इचलकरंजी यांच्या २०२५-२०२८ या कार्यकाळासाठी नवीन कार्यकारणी करण्यात आली आहे. मंडळाच्या अध्यक्षपदी अखिल अशोककुमार बाहेती यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्ष सर्वेश पन्नालाल डालिया,सचिव अक्षय अजय जाखोटीया,कोषाध्यक्ष सीए अमित शंकरलाल राठी,आणि सहसचिव अभिषेक राजेश परताणी यांची निवड करण्यात आले.**



अखिल बाहेती, अक्षय जाखोटिया

तर कार्यकारिणी सदस्य म्हणून आशिष बांगड़, सीए अंकुर भराडिया, पवन दरक, कैलाश जाजू, शिशिर जाजू, हिरक जाखोटिया, सुमित झंवर, विकास रांदड, अभिलाष राठी, मयंक सोमाणी, शुभम भुतडा, गोपाल मोहता यांची निवड करण्यात आली आहे.अध्यक्ष अखिल बाहेती यांनी बोलताना सांगितले की, नवीन कार्यकारिणीचे मुख्य ध्येय समाजातील युवकांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये संघटितपणा, सामाजिक जागरूकता आणि सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणे हे आहे. समाजातील प्रत्येक युवकाला संधी आणि दिशा देणे हीच आमची प्राथमिकता राहील.नव्या कार्यकारिणीचे सर्व समाजबांधवांकडून हार्दिक अभिनंदन करण्यात येत असून,श्री महेश सेवा समितीचे अध्यक्ष द्वारकाधीश सारडा आणि सचिव लक्ष्मीकांत बांगड यांनी नव्या टीमसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.निवड प्रक्रिया निवड अधिकारी नंदकिशोर बाहेती यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



वृत्तपत्र विक्रेत्यांना दिवाळी साहित्याचे वाटप करताना शिवगोंड खोत, अण्णा गुंडे व इतर.

# वृत्तपत्र विक्रेत्यांना दिवाळी साहित्याचे वाटप

इचलकरंजी,ता.१३–

**येथील पुरोगामी विक्रेता संघटनेच्यावतीने विक्रेत्यांना दिवाळीच्या साहित्याचे वाटप अध्यक्ष शिवगोंडा खोत यांच्या हस्ते करण्यात आली.**

यावेळी बोलताना खोत म्हणाले, गेल्या पंधरा वर्षापासून संघटनेच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांच्या घरात दिवाळीचे साहित्याचे वाटप करत असताना समाधान लाभत आहे. मात्र, राज्य सरकारने देखील आता वृत्तपत्र विक्रेत्यांची दिवाळी गोड करण्याची वेळ आली आहे. सरकारने मागच्या दिवाळीपूर्वी वृत्तपत्र विक्रेत्यांचे स्वतंत्र कल्याणकारी मंडळ जाहीर केले. त्यावेळी राज्यातील तमाम विक्रेत्ये बंधू आनंदी झाले होते.मात्र, सरकारने त्यानंतर मंडळ कार्यान्वित करण्यासंदर्भात पाऊले उचलावित असे आवाहन करण्यात आले. संघटनेचे सचिव अण्णा गुंडे यांनी संघटनेचे सभासद बंधू वर्षभर जे पेपर मध्ये ज्या प्रामाणिकपणे जाहिरात घालतात त्यामुळेच संघटना गेली पंधरा वर्ष दिवाळीच्या साहित्याचे वाटप करत असते असे सांगितले. यावेळी संघटनेचे संचालक अमर मुसडे, महेश बावळे, नारायण शिंदे, कृष्णा हजारे, महादेव चिखलकर, विशाल परीट, सुरेश चौगुले, विजय वाइंगडे, भालचंद्र कांबळे, शिवानंद रावळ यांच्यासह वृत्तपत्र विक्रेते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ग्रीन बिल्डिंग विषयावर आज व्याख्यान

## शहरातील आर्किटेक्ट यांचा पुरस्काराने होणार गौरव

इचलकरंजी,ता.१३–

**जागतिक आर्किटेक्चर दिनाचे औचित्य साधत असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स अँड आर्किटेक्ट इचलकरंजी आणि अल्ट्राटेक सिमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने शहर व परिसरातील प्रसिध्द आर्किटेक्ट उदय सावंत, अभय पिसे आणि सचिन बोरा यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.**



आर्कि. प्रमोद चौगुले | आर्कि. उदय सावंत | आर्कि. अभय पिसे | आर्कि. सचिन बोरा

त्याचबरोबर ग्रीन बाबा अशी ओळख असलेल्या आर्किटेक्ट प्रमोद चौगुले यांचे ग्रीन बिल्डिंग अ‍ॅन्ड कम्युनिटीज या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स अँड आर्किटेक्ट इचलकरंजीचे प्रेसिडेंट राजेंद्र खंडेराजुरी, सेक्रेटरी विकास नाईक, अल्ट्राटेक सिमेंटचे डिलर नितीन धुत व घनश्याम सावलानी यांनी दिली.

मंगळवार १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता तोष्णीवाल गार्डन या ठिकाणी हा समारंभ होत आहे. इचलकरंजी शहर परिसरासह विविध ठिकाणी निवासी आणि औद्योगिक क्षेत्रात विविध प्रकल्पांची उभारणी करण्यासह आर्किटेक्ट क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविणाऱ्या आर्किटेक्ट यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तर पर्यावरणाशी नाते जुळलेल्या आणि त्यातूनच ग्रीन बाबा अशी ओळख झालेल्या आर्किटेक्ट प्रमोद चौगुले यांचा यानिमित्ताने विशेष सत्कार अल्ट्राटेक सिमेंटचे विभागीय तांत्रिक हेड शितलराज सिंदखेडे आणि टेरीटरी सेल्स हेड अविनाश जेऊरकर यांची हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी भरत केटकाळे, नितीन शेट्टी, विवेक सावंत, विठ्ठल तोडकर, रवींद्र तोरस्कर, गिरीश मोकाशी, सुहास रुग्गे, प्रकाश मालवीय, अल्ट्राटेक सिमेंटचे हर्षल धुत, रोहित सावलानी, विभागीय तांत्रिक प्रबंधक कोल्हापूर सागर छांगाणी आदी उपस्थित होते.

# मोटार अपघातग्रस्तांच्या कुटुंबियांना ४ कोटीपेक्षा जास्त नुकसान भरपाई

कोल्हापूर,ता.१३–

**कोल्हापूर जिल्हा विधि सेवा प्राधिकरण कोल्हापूर आयोजित लोक अदालतीमध्ये मोटार अपघातातील ४९ प्रकरणे निकाली काढण्यात आली. त्यामध्ये ४ कोटीपेक्षा जास्त नुकसान भरपाई देण्याची मान्यता न्यु इंडिया, आयसीआयसीआय, इ. कंपनीने दिली.सहा महिन्याच्या कालावधीतही पक्षकारांना न्याय मिळाला आहे.**

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती. के.बी. अग्रवाल व न्यायाधीश डी.ए. डोईफोडे यांनी केलेल्या आवाहनास चांगला प्रतिसाद मिळून जलद व सुलभरित्या एकाच दिवशी अपघाताची ४९ खटले निकाली झाले.

वरील सर्व मोटार अपघात दाव्यामधील प्रकरणामध्ये अ‍ॅड. सी.बी. कोरे (रेंदाळकर) यांनी काम पाहिले.

# जयसिंगपूरात घरफोडी

## सोन्या –चांदीचे दागिने लंपास

जयसिंगपूर,ता.१३–

**असलेल्या मगदूम मळ्यामध्ये चोरट्याने कडी कोंयडा उचकटून घरात प्रवेश करून लाकडी कपाट व लोखंडी कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व एक मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली आहे. याबाबत पद्मावती अशोक मगदूम यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे.**

ही घटना सोमवारी सकाळी साडेअकरा ते दुपारी साडेबारा वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. फिर्यादी पद्मावती मगदूम या घराच्या दरवाज्याला कुलूप लावून शेतात जळण अन्याकरीता गेले असता या संधीचा फायदा घेत चोरट्याने चोरी केली आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

अज्ञात चोरट्याने १ तोळ्याची सोन्याची चेन, ३ भार वजनाचा चांदीचा करंडा, १ एकभार वजनाची चांदीची आरती २ नग, रेडमी कंपनीचा मोबाईल असा एकूण ६७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला आहे. जयसिंगपूर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने घटनास्थळी पोहचून पाहणी केली आहे. या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता संशयीत हे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. पुढील तपास महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल अंजना बन्ने करीत आहेत.

रामप्रसाद डी. पाटील

इंजिनिअर्स अ‍ॅण्ड कॉन्ट्रॅक्टर्स

वास्तुकला कन्स्ट्रक्शन

पाहिजेत

सिनिअर इंजिनिअर - ४

बी.ई.सिव्हिल/डिप्लोमा सिव्हिल - अनुभव तीन वर्ष

ज्युनिअर इंजिनिअर - ४

बी.ई.सिव्हिल/डिप्लोमा सिव्हिल - अनुभव एक वर्ष

क्लार्क / टायपिस्ट - १

एमएस-सीआयटी, लेडीज - अनुभव एक वर्ष

पत्ता : फ्लॅट नं. १०३, गोल्डन शॉवर अपार्टमेंट, सांगली नाका, इचलकरंजी - व्हॉटस्‌ अ‍ॅप ९८५०५५३७३१, मुलाखत : १७/१०/२०२५, वेळ : ११.०० ते ४.००



■ संपादकीय ■

# नव्या योजनांचा अन्वयार्थ

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या आठवड्यात एका कृषी संशोधन संस्थेच्या कार्यक्रमात बोलताना देशातील शेतकऱ्यांसाठी नवीन दोन योजनांची घोषणा केली. 'शेतकरी धनधान्य योजना' आणि 'कडधान्य आत्मनिर्भरता योजना' या दोन योजनांचे यावर्षी सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये सुद्धा सुतोवाच करण्यात आले होते. नेहमीप्रमाणे योग्य प्रसंग साधून मोदी यांनी या दोन योजनांची घोषणा केली. नेहमीप्रमाणे या योजनांसाठी मोठ्या प्रमाणात निधीचीही तरतूद करण्यात आली आहे.या दोन योजना मिळून तब्बल ३६००० कोटी रुपये वापरले जाणार आहेत, म्हणजे तशी घोषणा तरी करण्यात आली आहे. पंतप्रधान या योजनांची घोषणा करत असतानाच महाराष्ट्रात गेल्याच आठवड्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी काही आर्थिक पॅकेज जाहीर करण्यात आले आणि या पॅकेजप्रमाणे शेतकर्यांच्या बँक खात्यात मदत जमा व्हायला सुरुवातही झाली आहे. ती मदत योग्य आहे की तुटपुंजी आहे हा चर्चेचा विषय असला तरी किमान शेतकर्यांना दिलासा देण्यास सुरुवात झाली आहे हेसुद्धा कमी नाही. आणखी आठवड्याभरातच दीपोत्सवाला सुरुवात होणार असल्याने ही दिवाळी बळीराजासाठी काही प्रमाणात का होईना गोड होईल असे संकेत यानिमित्ताने मिळायला हरकत नाही. अर्थात,नरेंद्र मोदी यांनी ज्या दोन योजना जाहीर केल्या आहेत. त्यापैकी एका योजनेच्या नावामध्ये शेतकरी कृषी धनधान्य असे शब्द आहेत म्हणजेच धान्याच्या उत्पादनाच्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या पदरी धन पडावे आणि तो समृद्ध व्हावा अशी अपेक्षा या योजनेच्या नावातून समोर येऊ शकते. दुसऱ्या योजनेत डाळींच्या म्हणजेच कडधान्यांच्या उत्पादनामध्ये आत्मनिर्भरता हा विषय हाताळण्यात आला आहे. या योजनांच्या माध्यमातून देशातील काही जिल्ह्यांची निवड करून त्या ठिकाणी या योजनांची प्राधान्याने अंमलबजावणी करण्यात येणार आहे.महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचा विचार करता प्रासंगिक पातळीवर निसर्गाने जो बळीराजाला त्रास दिला आहे त्यातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी ही आर्थिक मदत आहे. तर नरेंद्र मोदी यांनी ज्या योजना घोषित केल्या आहेत त्यामध्ये चिरंतन पद्धतीने शेतकरी समृद्ध व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. पण सध्या बळीराजाची परिस्थिती खूपच लक्षणीय किंवा चांगली आहे असे म्हणता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी जेव्हा प्रथम सत्तेवर आले तेव्हा त्यांनी २०२२ पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट केले जाईल अशी घोषणा केली होती. त्यानंतर नरेंद्र मोदी यांच्या हाती तिसऱ्यांदा सत्ता दिल्यानंतरही अद्याप शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट झालेले नाही हे मान्य करावे लागते. भारतीय शेती अद्यापही दुर्दैवाने बहुतांश प्रमाणात पावसावर अवलंबून असल्याने आणि जलसिंचनाच्या सोयी १०० टक्के प्रमाणात उपलब्ध झाल्या नसल्याने कमी झालेला पाऊस किंवा जास्त झालेला पाऊससुद्धा बळीराजाचे संपूर्ण वेळापत्रक विसकटून टाकतो.एवढेच नाही तर त्याचे आर्थिक नियोजनही बिघडवून टाकतो. महाराष्ट्रासारख्या मोठ्या आणि कृषिप्रधान राज्याप्रमाणे इतर काही राज्यांमध्ये सुद्धा पावसाने जो धुमाकूळ घातला त्यामुळे कृषी क्षेत्राचे वेळापत्रक आणि आर्थिक नियोजन पूर्णपणे बदलून जाणार आहे.तत्कालीन आर्थिक मदत योजनांची घोषणा करून मलमपट्टी केली जात असली तरी अशा प्रकारच्या दुष्काळी किंवा अवकाळी परिस्थितीमधून बळीराजाला सावरण्याचे कायमस्वरूपी बळ देण्याची गरज आहे. नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या दोन ताज्या योजना असोत किंवा गेल्या अकरा वर्षांच्या कालावधीमध्ये जाहीर केलेल्या विविध योजना असोत त्या सर्वांचा एकत्रित परिणाम साधायचा असेल तर या सर्व योजना गंभीरपणे अंमलात आणाव्या लागणार आहेत. 'आत्मनिर्भर भारत' या एका तत्त्वाच्या आधारे जर नरेंद्र मोदी सरकारचा कारभार सुरू असेल तर देशातील शेतकऱ्याला सुद्धा आत्मनिर्भर करण्याची जबाबदारी मोदी सरकारने पार पाडायला हवी. अद्यापही कृषिप्रधान भारत देश अनेक कृषी उत्पादने आयात करतो त्यासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय निधी चलन वापरले जाते. हे जर कमी करायचे असेल तर देशाची गरज भागवणारे कृषी उत्पादन देशातच निर्माण करणे अत्यंत गरजेचे आहे. सरकारने गेल्या ११ वर्षांच्या कालावधीमध्ये जाहीर केलेल्या सर्वच योजनांमध्ये आत्मनिर्भरता हा मध्यवर्ती मुद्दा असला तरी संपूर्णपणे परिणामकारकरित्या अमलात आलेला नाही हे वास्तवही स्वीकारावे लागते. अर्थात,काही का असेना येत्या आठवड्यात सुरू होणारा दीपोत्सव असो किंवा त्यानंतरच्या कालावधीत येणारी प्रत्येक दिवाळी किंवा इतर सण उत्सव असोत, हा प्रत्येक उत्सवच देशातील बळीराजाला गोडी देणारा ठरेल अशा प्रकारचे गंभीर प्रयत्न केंद्रीय पातळीवर आणि महाराष्ट्र राज्य पातळीवरसुद्धा होणे गरजेचे आहे.

# शांततेच्या नोबेलचे राजकारण

**व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांना २०२५ चा नोबेल शांतता पुरस्कार जाहीर झाला आहे. लोकशाही आणि नागरी स्वातंत्र्यासाठी अनेक दशकांपासून तसेच शांततापूर्ण मार्गाने बदलासाठी मचाडो यांनी केलेल्या संघर्षासाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. 'आयर्न लेडी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मारिया मचाडो यांना व्हेनेझुएलामध्ये लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी केलेल्या प्रयत्नाबद्दल हा पुरस्कार देण्यात येत असल्याचे नोबेल पुरस्कार समितीने स्पष्ट केले.**

ओस्लो येथे विजेत्याची घोषणा करण्यात आली. यापूर्वी 'टाईम' मासिकाच्या २०२५ च्या १०० सर्वात प्रभावशाली व्यक्तींच्या यादीतही त्यांच्या नावाचा समावेश होता.२०२५ च्या शांततेच्या नोबेल पुरस्कारासाठी यंदा ३३८ नामांकने प्राप्त झाली होती. २४४ व्यक्ती आणि ९४ संस्थांचा समावेश होता. १९६७ मध्ये जन्मलेल्या मारिया मचाडो यांनी अभियांत्रिकी आणि वित्त क्षेत्रात शिक्षण घेतले आहे. २००२ मध्ये त्यांनी व्हेनेझुएलामध्ये मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांना प्रोत्साहन देण्यासाठी 'सुमारे' या संस्थेची स्थापना केली. २०१० मध्ये त्या विक्रमी मतांनी नॅशनल असेंब्लीवर निवडून गेल्या. संसदीय सदस्य असताना त्यांनी निकोलस मादुरो राजवटीच्या संस्थात्मक गैरवापर, आर्थिक गैरव्यवस्थापन आणि मानवाधिकार उल्लंघनावर कठोर टीका केली.त्यांनी २०१३ मध्ये ' वेंने व्हेनेझुएला' या लिबरल विरोधी पक्षाची सहस्थापना केली. २०१७ मध्ये त्यांनी विविध लोकशाही समर्थक गटांना एकत्र आणणाऱ्या 'सोय व्हेनेझुएला' आघाडीची स्थापना केली.२०२४ च्या वादग्रस्त अध्यक्षीय निवडणुकीत मचाडो यांना निवडणुकीत उभे राहण्यापासून रोखण्यात आले होते. या निवडणुकीला आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी 'फसवणूक'असे संबोधले. राष्ट्राध्यक्ष मादुरो राजवटीच्या धमक्या आणि दडपणामुळे १४ महिन्यांहून अधिक काळ मचाडो या भूमिगत आहेत. त्यांच्यावर देशद्रोह आणि कटाचे आरोप ठेवण्यात आले आहेत. नोबेल पुरस्काराची रक्कम ११ दशलक्ष स्वीडिश क्राऊन्स असून ती १० डिसेंबर रोजी मचाडो यांना प्रदान करण्यात येईल.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यंदाचा नोबेल पुरस्कार आपल्यालाच मिळावा अशी आग्रही मागणी केली होती. जगातील अनेक युद्धे आपण शांत मार्गाने रोखली आहेत असा त्यांनी दावा केला होता.नोबेल



पुरस्कारासाठी डोनाल्ड ट्रम्प डोळे लावून बसले होते. परंतु मचाडो यांना पुरस्कार जाहीर झाल्याने ट्रम्प यांच्या स्वप्नांचा चुराडा झाला.खरे म्हणजे पुरस्कार मागितल्याने मिळत नसतात.त्यासाठी अंगी कर्तृत्व असावे लागते.कदाचित डोनाल्ड ट्रम्प यांना 'कर्मण्ये वाधिकारस्ते....' माहीत नसावे. मारिया मचाडो यांना नोबेल शांतता पुरस्कार जाहीर करताना पुरस्कार समितीने म्हटले की,' अंधार वाढत असताना लोकशाहीची ज्योत तेजस्वी ठेवणारी महिला' म्हणून त्यांचा गौरव करण्यात येत आहे. जगाच्या अनेक भागात हुकूमशाही वाढत असून लोकशाही कमकुवत होत आहे. या संकटाच्या काळात मारिया मचाडो यांच्या लढ्यामुळे नवी आशा जागृत होते. कायम शांततेसाठी लोकशाही आवश्यक आहे. हिंसेच्या माध्यमातून जनतेवर दबाव टाकला जातो, तेव्हा अशा हिंमतबाज लोकांचा सन्मान करणे गरजेचे ठरते. राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांच्या सरकारविरोधातील एकेकाळी विभागलेल्या विरोधी गटांना एकत्र आणणारी महत्त्वाची, एकात्मिक कार्य करणारी व्यक्ती म्हणून मचाडो यांचे कौतुक करण्यात आले, असे नॉर्वेजियन नोबेल समितीचे अध्यक्ष योगेन व्हाने फ्रिडनेस यांनी सांगितले. ५८ वर्षांच्या मचाडो निवडणूक लढवण्यास सज्ज

**दैनंदिनी**

होत्या, मात्र सरकारने त्यांना अपात्र ठरवले. निवडणुकीपूर्वी मोठ्या प्रमाणात दडपशाही, अटक आणि मानवाधिकारांचे उल्लंघन झाले. गत वर्षभरात मचाडो यांना लपून राहावे लागले.त्यांच्या जीवाला गंभीर धोका असतानाही त्या देशातच राहिल्या. त्यांच्या या धैर्याने लाखो लोकांना प्रेरणा मिळाली. जेव्हा हुकूमशहा सत्तेत येतात तेव्हा स्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्यांचा गौरव करणे अत्यंत आवश्यक असते. यंदाचा पुरस्कार हा एका स्त्रीच्या संघर्षाचा सन्मान आहे.स्पेनमध्ये निर्वासित असलेले मचाडो यांचे सहकारी एडमुंडो गोन्झालेझ म्हणाले,हा पुरस्कार आपल्या स्वातंत्र्य आणि लोकशाहीसाठी दीर्घ संघर्ष करणाऱ्या एका स्त्री आणि संपूर्ण जनतेच्या प्रयत्नांचा योग्य सन्मान आहे. ट्रम्प यांना पुरस्कार न मिळाल्याबद्दल व्हाईट हाऊसने नोबेल समितीवर आगपाखड केली आहे. व्हाईट हाऊसचे प्रवक्ते स्टीव्हन चुंग म्हणाले,राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यापुढेही जगभरात शांततेचे करार घडवतील, युद्ध संपवतील आणि जीव वाचवतील. नोबेल निवड समितीने यावेळी शांततेपेक्षा राजकारणाला प्राधान्य दिले आहे. दरम्यान, मादुरो यांच्या विजयाची घोषणा झाल्यानंतर देशभरात दडपशाही आणखी वाढली आहे. देशभरात निदर्शने झाली. ही निदर्शने दडपण्यासाठी सरकारने बळाचा वापर केला. त्यात २० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला.यामुळे अर्जेंटिनासह काही देशांनी व्हेनेझुएलाशी राजनैतिक संबंध तोडले आहेत. नोबेल पुरस्कार हा जगातील अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार असून तो मानवतेवरील श्रद्धेचे प्रतीक आहे. आठ युद्धे थांबवूनही माझी दखल घेतली नाही, अशी खंत ट्रम्प यांनी व्यक्त केली.वस्तुतः फळाची अपेक्षा केल्याने पुरस्काराने त्यांच्याकडे पाठ फिरवली. मचाडो फळाची अपेक्षा न करता कर्म करीत राहिल्या म्हणून त्यांना पुरस्काररूपी फळ मिळाले. □□□

# ई कचऱ्याविषयी जागरूकता हवी



**आज १४ ऑक्टोबर,आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर याबाबत जनजागृती करणे हा या दिवसामागचा उद्देश आहे.२०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला.पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे.**

आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे. उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा. ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्याविषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्याप्रमाणेच करतो.घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ,टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते.यासोबतच महिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशाप्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये

**जागतिक ई कचरा दिन विशेष**

भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा,माती आणि पाण्यात मिसळले की सभोवतालची हवा,पाणी आणि माती दूषित होते. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते.हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात.यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनर्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम,पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात.या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे.ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे.त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅक्चरिंग महत्वाचे आहे.त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील.पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे.ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

■ श्याम ठाणेदार

# भेसळयुक्त मिठाई- लोकांच्या जीवाशी खेळ

नोएडातील सेक्टर ११५ मधील एका मिठाई बनवणाऱ्या युनिटवर दिल्लीच्या अन्न सुरक्षा विभागाने हल्लीच छापा टाकून ११०० किलो भेसळयुक्त मिठाई जप्त करून ती जागेवरच नष्ट केली. याच विभागाने जीबी नगर परिसरात आणखी एका ठिकाणी छापा टाकून १८० किलो भेसळयुक्त मिठाई आणि दुग्धजन्य पदार्थ जप्त केले. जयपूरच्या अन्न सुरक्षा विभागानेही अशाच एका कारवाईत ३५० किलो भेसळयुक्त मिठाई. ६५० किलो बनावट मिल्क केक आणि ५०० लिटर नकली दूध जप्त करून ते नष्ट केले.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर नागपूर विभागातील अन्न आणि औषध प्रशासनाने ''सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा'' मोहिमेच्या अंतर्गत ३६ लाख रुपयांचा तब्बल ३० हजार किलो निकृष्ट आणि भेसळयुक्त अन्नसाठा जप्त केला. दूध, मिठाई, तूप, पनीर,फरसाण यांसारख्या पदार्थांचे नमुने तपासले असता अनेक ठिकाणी भेसळ आढळली.दिवाळी जवळ आली कि मिठाईत भेसळ करून ती चढ्या दारात विकणाऱ्यांचे सर्वत्र पेव फुटते. या दिवसांत प्रशासनाचा अन्न आणि औषध विभाग अलर्ट मोडवर असतो.

कमी खर्चात अधिक उत्पन्न मिळवण्याच्या लोभाने ही भेसळयुक्त मिठाई बनवली जाते. भेसळयुक्त पेढे किंवा मिठाई खाल्यास घशात खवखव होते,खोकला येतो आणि पोटात दुखते. चक्कर येणे, पोटात मळमळणे, उलटी, जुलाब सुरु होणे यांसारखे परिणाम जाणवू लागतात. काविळसारख्या आजाराची लागण होऊ शकते. किडनी आणि यकृतावरही भेसळयुक्त मिठाईचा गंभीर परिणाम होऊ शकतो.इतकेच नाही,तर विषबाधा अधिक झाल्यास खाणाऱ्याचा मृत्यूही ओढावू शकतो. भेसळयुक्त दुधाचे सेवन केल्यास क्षयरोग होऊ शकतो. कृत्रिम दुधात युरियाची भेसळ असल्यास युरियातील नायट्रोजनमुळे मूत्रपिंड, यकृत आणि हृदय निकामी होऊ शकते. मिठाईसाठी वापरण्यात आलेल्या दुधात पाणी आणि दुधाची पावडर मिश्र केल्याचे आढळल्यास २६२ कलमान्वये गुन्हेगारास आर्थिक दंड ठोठावण्यात येतो.असे असूनही प्रतिवर्षी मिठाईत केल्या जाणाऱ्या भेसळीचे प्रमाण कमी न होता दरवर्षी त्यामध्ये वाढच होत आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा महाभागांना खरेतर कठोर शिक्षा होणे अपेक्षित आहे; मात्र अनेकदा ही मंडळी कायद्यातील पळवाटांचा लाभ घेऊन निर्दोष सुटतात किंवा जामिनावर बाहेर पडतात. यामध्ये कायद्याचे भय न राहिल्याने दरवर्षी भेसळयुक्त मिठाई बनवून विकणाऱ्यांमध्ये वाढच होताना दिसत आहे. यांच्यावर कायमस्वरूपी वचक बसण्यासाठी कठोर कायद्यासह जनमानसांत जागृती होणे नितांत गरजेचे आहे. लोकांच्या जीवाचे सोयरसुतक नसणाऱ्यांना खरेतर आता जनतेनेच धडा शिकवायला हवा !

■ सौ. मोक्षदा घाणेकर

## वाचकांचा पत्रव्यवहार

### मुंबईची भुयारी मेट्रो-३ हि आधुनिक तंत्रज्ञानाचा अविष्कार!

मुंबईची आरे-जेव्हीएलआर ते दक्षिण मुंबईचे टोक असलेले कुलाब्याचे कफ परेड अशी संपूर्ण ३३.५ किमीची भुयारी मेट्रो-३ अॅक्वालाईन मार्गिका पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होऊन प्रवाशांच्या सेवेत दाखल झाल्यानंतर पहिल्याच दिवशी एक लाखांहून अधिक मुंबईकरांनी या मार्गिकेला जो उदंड प्रतिसाद दिला तो अपेक्षितच होता. परंतु मुंबई शहरातून वाहणाऱ्या मिठी नदीच्या खाली भूगर्भात सुमारे २५ मीटर (८२ फूट) खालून जाणाऱ्या या अॅक्वालाईन मार्गिकेला बांधकामाच्यावेळी अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागले.बसाल्ट आणि व्होल्कॅनिक ब्रॅसिया अशा टणक खडकावर सहा ते सात मीटर समुद्री चिकणमातीचा थर असलेल्या मुंबईच्या भूगर्भात सुमारे ८० फूट खोल बोगदे खोदणे अतिशय आव्हानात्मक काम होते. मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरीण ताण कमी करणारा हा मेट्रो-३ अॅक्वा लाईन मार्ग देशातील पहिला असून जगातील सहावा सर्वात लांब संपूर्ण भुयारी मेट्रो मार्ग ठरला आहे. अटल सेतू आणि कोस्टल रोड पाठोपाठ मेट्रो-३ अॅक्वा लाईनमुळे मुंबईची शान अधिकच वाढली आहे.

■ प्रदीप मोरे

### औषध कंपन्यांकडून विश्वासार्हतेला तडा

नुकतेच राजस्थान आणि मध्य प्रदेश येथे कफ सिरप या सर्दी खोकल्यासाठीच्या औषधामुळे अकरा लहान मुलांचा मृत्यू झाला. केंद्र सरकारने दोन वर्षांखालील मुलांना कफ सिरप देण्यासाठी सध्या बंदी घातली आहे. पोलिसांनी संबंधित कफ सिरपच्या आस्थापनाच्या विरुद्ध गुन्हा नोंदवून अटक सत्र सुरू केले आहे. विषारी कफ सिरप घेतल्यामुळे ११ निष्पाप जणांना आपले प्राण गमवावे लागले. त्या ११ जणांच्या कुटुंबाचं भविष्य नष्ट केले गेले याची जाण त्या आस्थापनाला नव्हती का?

भारताला फार्मसी ऑफ द वर्ल्ड असे म्हटले जाते ते त्याच्या जगातील सर्वात मोठा जनेरिक औषध उत्पादक देश आणि सर्वात जास्त लसीचा पुरवठादार म्हणून.जागतिक स्तरावर वीस टक्के जेनेरिक औषधे आणि ६० टक्के लसीची मागणी भारत पूर्ण करतो. काही महिन्यापूर्वी आफ्रिका खंडातील गांबीया या देशात भारतीय आस्थापनाच्या कफ सिरपमुळे ७०, कॅमरूनमध्ये सहा आणि उजबेकिस्तानमध्ये १८ मुलांचा मृत्यू झाला त्यामुळे जगभरात भारतीय औषध निर्मिती आस्थापनांकडे संशयाने पाहिले जाऊ लागले.हा विश्वासघाताचा प्रकार आहे असेच विदेशींना भारताविषयी वाटू लागले तर त्यात काय चूक आहे. यामुळे देशाचे आर्थिक नुकसान होत आहे.त्यामुळे कफ सिरपच नव्हे तर प्रत्येक औषधाची कठोरपणे पडताळणी करणे सरकारचे कर्तव्य आहे आणि ही जाणीव सरकारला करून देणे गरजेचे आहे. यासंदर्भात सरकार करत असलेल्या प्रयत्नांना सातत्य आणि कठोरता याचे पाठबळ लाभलं तर आणि तरच अशी भेसळ करून मृत्यूपास निर्माण करणाऱ्या औषधी आस्थापनांना वचक बसेल.

■ लीना गाडगीळ

### मनाचे श्लोक - शीर्षकातून उमटलेला तणाव

'मनाचे श्लोक' या नावाने येणाऱ्या चित्रपटावर सध्या वाद निर्माण झाला आहे.आक्षेप घेणाऱ्यांचे म्हणणे आहे की,हे नाव समर्थ रामदास स्वामींच्या अमर रचनेशी घट्ट जोडलेले आहे. त्यामुळे त्याचा वापर करताना धार्मिक, सांस्कृतिक आणि भावनिक संवेदनशीलता राखणे आवश्यक होते. परंतु दुसरीकडे, असा आक्षेप चित्रपटाची प्रक्रिया सुरु असताना म्हणजे सेन्सॉरपूर्व टप्प्यात घेतला असता तर तो अधिक योग्य ठरला असता.चित्रपट प्रदर्शित होण्याच्या काही दिवसांपूर्वी निर्माण झालेला वाद केवळ वादासाठी वाद वाटू शकतो. चित्रपटकर्त्यांनीही 'मनाचे श्लोक' हे शीर्षक निवडताना त्याची पार्श्वभूमी, समाजातील भावनिक आदरस्थान आणि त्यातून उद्भवणाऱ्या प्रतिक्रियांचा विचार करायला हवा होता. शेवटी,कलात्मक स्वातंत्र्य आणि सांस्कृतिक संवेदनशीलता यांच्यात तोल राखणे दोन्ही बाजूंसाठी तितकेच आवश्यक आहे.

■ दीपक गुंडये

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**मंगळवार ता.१४.१०.२०२५**, विक्रमसंवत २०८१, शिवशक ३५२, शालिवाहन शके १९४७, विश्वावसुनाम संवत्सरे दक्षिणायणे, शरद ऋतो, अश्विन मासे, कृष्ण पक्षे, अष्टमी तिथी,११.१० नंतर नवमी तिथी, पुनर्वसु नक्षत्र, ११.५५ नंतर पुष्य नक्षत्र, कर्क रास, सिद्ध योग, २८.११ नंतर साध्य योग, कौलव करण ११.१० नंतर तैतिल करण २२.४७ पर्यंत, दिनमान ११.४२,सुर्योदय ६.२८, सुर्यास्त १८.१०, (कोल्हापूरचे) राहू काळ सायं.३ ते ४.३०, काळोजी महाराज पु.दि.जरंडा, घबाड ११.१० ते ११.५५, मध्यम दिवस सकाळी ११ पर्यंत, धान्य संग्रह, औषध घेणे, दुपारी १२ नंतर सोने खरेदी.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष-** व्यवसायातील परिस्थिती चांगली राहील. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे मार्गदर्शन मिळेल. आर्थिक लाभ होईल. कामाव्यतिरिक्त दुसऱ्या गोष्टींना प्राधान्य देऊ नका.

**वृषभ-** धनाने जोडलेल्या काही गोष्टींतून मार्ग निघू शकतो आणि तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. आर्थिक नियोजन मार्गी लागेल. राजकीय क्षेत्रात जबाबदारी घ्यावी लागेल.

**मिथून-** सुयोग्य कर्मचाऱ्यांना नोकरीत बढती किंवा आर्थिक फायदा मिळेल. अमर्याद सर्जनशीलता आणि उत्साह तुम्हाला अधिक फायदेशीर दिवसांकडे घेऊन जाईल.

**कर्क-**आर्थिकदृष्ट्या बचत करणे योग्य राहील. मित्र-मैत्रिणींबरोबर करमणूक होईल.घरगुती वातावरण चांगले राहील. जोडीदाराचा आदर कराल. आरोग्य ठीक राहील.

**सिंह-** आज तुम्हाला चांगल्यापैकी पैसा मिळणार आहे . आज तुम्ही निवांत वेळी काही नवीन काम करण्याचा विचार कराल परंतु, या कामात तुम्ही इतके व्यतीत होऊ शकतात.

**कन्या-** अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा. व्यावसायिक भागीदार चांगला आधार देतील, आणि तुम्ही दोघे मिळून प्रलंबित कामे पूर्ण कराल.

**तुळ-**दीर्घकाळ प्रलंबित असणारी थकबाकी आणि येणे अंतिमतः प्राप्त होईल. कुटुंबातील सदस्यांच्या आनंदी स्वभावामुळे घरातील वातावरण प्रफूल्ल होईल.

**वृश्चिक-** पैशाची किंमत तुम्ही चांगल्या प्रकारे जाणतात म्हणून आजच्या दिवशी तुमच्या द्वारे वाचवलेले धन तुमच्या खूप कामी येऊ शकते.

**धनु-** नोकरदार वर्गाला वरिष्ठांच्या मर्जीने काम करावे लागेल. आर्थिक बाबतीत सतर्क राहा. राजकीय क्षेत्रात हस्तक्षेप करू नका.घरगुती वातावरण चांगले राहील.शारीरिक स्वास्थ्य जपा.

**मकर-** सकारात्मक विचार करा.व्यवसायातील चढउतार वेळीच लक्षात घ्या.आज या राशीतील काही लोकांना नोकरी मिळू शकते ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारेल.

**कुंभ-** आज तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. तुमचे मामा किंवा आजोबा तुमची आर्थिक मदत करण्याची शक्यता आहे. वरिष्ठांचे सहकार्य चांगले मिळेल.

**मीन-** आर्थिक बाबतीत समाधानी राहाल. केवळ पैशाचा फायदा पाहू नका कारण नजिकच्या काळात तुम्हाला या बढतीचा उपयोग होईल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई-दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री.दि.पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# भाजपकडून निवडणूक आयोगाचा गैरवापर

## खास.प्रियंका जारकीहोळी यांचा आरोप

चिकोडी,ता.१३(प्रतिनिधी)-

**भाजप निवडणूक आयोगाचा गैरवापर करीत असून लोकशाहीला मारक असल्याचा आरोप चिकोडीच्या खासदार प्रियंका जारकीहोळी यांनी केला. त्या चिकोडी येथील पीडब्ल्यूडी सभागृहात चिकोडी जिल्हा काँग्रेस समिती व चिकोडी जिल्हा काँग्रेस महिला आघाडीच्यावतीने आयोजित वोट चोर गद्दी छोड सही अभियान कार्यक्रमाचे उद्घाटन करून बोलत होत्या. प्रारंभी स्वाक्षरी अभियान व रोपट्याला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.**



रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करताना खास.प्रियंका जारकीहोळी, लक्ष्मणराव चिंगळे, महिला काँग्रेस राज्य प्रधान सचिव सुमती एस, महावीर मोहिते व मान्यवर.

खास.जारकीहोळी पुढे म्हणाल्या की, कुठे मतचोरी झाल्याचे निदर्शनास आल्यास कळवावे. राज्यात गॅरंटी योजना यशस्वीपणे राबविण्यात येत आहे. महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळी रजा जाहीर करून चांगला निर्णय घेतला आहे. डिजिटल सदस्यत्व करावे. सर्व शासकीय योजना सर्वसामान्यपर्यंत पोचविण्याचे काम करूया असे सांगितले. चिकोडी जिल्हा काँग्रेस अध्यक्ष लक्ष्मणराव चिंगळे म्हणाले, राहुल गांधींनी पुराव्यासहित मतचोरी उघडकीस आणले. सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राहुल गांधी झटत आहेत. चिकोडीत मतचोरीच्या विरोधात युवा काँग्रेसकडून व आता महिला काँग्रेसकडून जनजागृती कार्यक्रम झाला.पुढील काळात आणखीन एक कार्यक्रम केला जाईल. या मतचोरी अभियानात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.

महिला काँग्रेस राज्य प्रधान सचिव सुमती एस.म्हणाल्या,राष्ट्रीय नेते राहुल गांधींनी बेंगळूर येथून मतचोरी अभियानाला सुरुवात केली.पुढील आगामी सर्व निवडणुकीत मतचोरी रोखण्यासाठी काम करावे,असे सांगितले. प्रमुख पाहुणे केपीसीसी सचिव महावीर मोहिते म्हणाले, निवडणुकांपूर्वी अनेक एजन्सी सर्व्हे अहवालानुसार देशात काँग्रेस सत्तेवर येण्याची गरज होती. कर्नाटकात लोकसभेच्या १६ जागा येण्याची शक्यता होती पण केवळ ९ जागा काँग्रेसला मिळाल्या. याविषयी काँग्रेसचे नेते राहुल गांधींनी सर्व्हे केले असता भाजपने मतचोरी केल्याचे उघडकीस आणले. यावेळी चिकोडी शहर परिसरातील रस्त्यावर व्यापार करणाऱ्या छोट्या व्यापाऱ्याना सतीश जारकीहोळी फाउंडेशन यांच्याकडून दहा हजार छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी निर्मला पाटील, रोहन साळवे, एच.एस.नसलापुरे,अर्जुन नाईकवाडी, प्रभाकर कोरे, नामदेव कांबळे, राजकुमार कोटगी, प्रतिभा कांबळे, सुधाकर बडीगेर, मल्लिकार्जुन राशिंगे, मल्लिकार्जुन गस्ती, इरफान,हाजी मुल्ला,दिलीप जमादार यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते व महिला, पदाधिकारी उपस्थित होते. सिद्धार्थ शिंगे यांनी स्वागत तर महादेव कवलापूरे यांनी आभार मानले.

# कोगनोळीत बिरदेव यात्रेनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

कोगनोळी,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील श्री बिरदेव यात्रा कमिटी, सर्व ग्रामपंचायत सदस्य, सर्व संस्थांचे पदाधिकारी, तरुण मंडळे व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री बिरदेव यात्रेनिमित्त बुधवार ता.१५ ते रविवार ता.१९ ऑक्टोबर अखेर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**



बुधवार ता.१५ रोजी कर बांधणे, गुरुवार ता. १६ रोजी वालंग, शुक्रवार ता.१७रोजी पहिली भाकणूक, शनिवार ता.१८ रोजी नैवेद्य, भर यात्रा, भाकणूक व महाप्रसाद असे धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. रविवार ता. १९ रोजी सकाळी ९ वाजता भव्य विविध प्रकारच्या शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शर्यतीचे उदघाटन होणार असून प्रमुख अतिथी म्हणून माजी ऊर्जामंत्री वीरकुमार पाटील, सुजय काकासो पाटील, बुडाचे अध्यक्ष लक्ष्मण चिंगळे, माजी जिल्हापंचायत उपाध्यक्ष पंकज पाटील, माजी तालुका पंचायत सदस्य प्रितम पाटील, हालसिद्धनाथ दूध संघाचे संचालक बाळासो पाटील, मराठा मंडळ ट्रस्टचे सचिव के.डी.पाटील, आश्रय समितीचे सदस्य बाळासो कागले, ग्रामपंचायत अध्यक्षा आक्काताई खोत, उपाध्यक्षा कल्पना आवटे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

भव्य जनरल बैलगाडी शर्यतीसाठी १ लाख १ हजार १ रुपये व निशाण, ७१ हजार १ रुपये व निशाण, ५१ हजार १ रुपये व निशाण अशी प्रथम ते तृतीय क्रमांकाची बक्षिसे देण्यात येणार आहेत. दुसा-चौसा बैलगाडी शर्यतीसाठी अनुक्रमे ७ हजार १ रुपये, ५ हजार १ रुपये, ३ हजार १ रुपये. घोडागाडी शर्यतीसाठी अनुक्रमे १५ हजार १ रुपये व निशाण, १० हजार १ रुपये व निशाण, ७ हजार १ रुपये व निशाण. एक घोडा-बैल शर्यतीसाठी अनुक्रमे ७ हजार १ रुपये व निशाण, ५ हजार १ रुपये व निशाण, ३ हजार १ रुपये व निशाण. घोडेस्वार शर्यतीसाठी अनुक्रमे ५ हजार १ रुपये व निशाण, ३ हजार १ रुपये व निशाण, २ हजार १ रुपये व निशाण अशी आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. ती इच्छुकांनी संपर्क साधावा, असे आवाहन यात्रा कमिटीतर्फे करण्यात आले आहे.

# सीमा न्याय हक्क परिषद घ्या; अन्यथा आंदोलन

## मराठी भाषिकांचा इशारा;काळा दिन पाळण्याचे आवाहन

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**सीमावासियांसाठी महाराष्ट्र शासनाने १० ते २० नोव्हेंबरपर्यंत सीमा न्याय हक्क परिषद घ्यावी; अन्यथा मुंबई येथील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्याचा इशारा येथील महाराष्ट्र एकीकरण समिती, शिवसेनेसह मराठी भाषक कार्यकर्त्यांनी दिला.**

शिवाय १ नोव्हेंबरला निपाणीसह परिसरात काळा दिन पाळण्याचे आवाहन करण्यात आले. त्यासाठी येथील डॉ.अच्युत माने यांच्या निवासस्थानी बैठक झाली.

बैठकीत कार्यकर्त्यांनी दिलेली माहिती अशी, १ नोव्हेंबरला काळ्या दिनाला विरोध करता येणार नसल्याचे कर्नाटक उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तरीही बेळगावच्या जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशाला न जुमानता १ नोव्हेंबरला विरोध केला आहे.खरेतर याबद्दल आणि सीमाभागातील २० लाख मराठी भाषिकांबद्दल महाराष्ट्र शासनाने कठोर निर्णय घेण्याची गरज आहे. दोन महिन्यांपूर्वी खासदार धैर्यशील माने, राज्यसभा सदस्य धनंजय महाडिक यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन सीमाभागात सीमा न्याय हक्क परिषद घेण्याची विनंती अर्जाद्वारे केली होती.तशी मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.मात्र, अजून त्याबद्दल निर्णय झालेला नाही. सीमावासीयांसाठी ही परिषद घ्यावी; अन्यथा आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल.

यावेळी महाराष्ट्र एकीकरण समिती निपाणी विभागाचे अध्यक्ष जयराम मिरजकर, डॉ.अच्युत माने, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब खांबे, उदय शिंदे, संजीवकुमार शितोळे, नारायण पावले,बाळासाहेब हजारे,प्रमोद कांबळे, लक्ष्मीकांत पाटील, संतराम जगदाळे, प्रताप पाटील, बाबासाहेब मगदूम,राजू मेस्त्री,रमेश निकम यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## जनता गृहतारण संस्थेकडून बोनस वाटप

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)-

**शंभर कोटी रुपयेच्यावर ठेवी असलेल्या जनता सहकारी गृहतारण संस्था गारगोटी शाखेच्या वतीने कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस व दिवाळी भेटवस्तूचे वाटप चेअरमन आनंद चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सभासदांना शेअर्स सर्टिफिकेटचे वाटपही करण्यात आले.**

यावेळी बोलताना चेअरमन आनंद चव्हाण यांनी कर्मचाऱ्यांना संस्थेच्यावतीने १६.६६ टक्के दिवाळी बोनस देण्यात आला आहे.यावेळी डॉ .संजय देसाई,एम. एस. मोरूस्कर, दत्तात्रय शिंदे, अरविंद देसाई, ओमकार पाटील, राहुल सुतार आदी उपस्थित होते.

# निरोगी आरोग्यासाठी रानभाज्या आवश्यक-सौ.मंडलिक

मुरगूड,ता.१३(प्रतिनिधी)-

**मानवी जीवनामध्ये चांगल्या आरोग्यासाठी रानभाज्यांची आवश्यकता असून आहारात कायमपणे त्याचा वापर करावा, असे प्रतिपादन सौ. संजना विरेंद्र मंडलिक यांनी केले.**



मंडलिक महाविद्यालयात रानभाज्या प्रदर्शन व पाककला स्पर्धेचे उद्घाटन करताना सौ.संजना मंडलिक,सोबत प्रा.डॉ.शिवाजी होडगे व अन्य.

सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड येथील पर्यावरण संशोधन केंद्र आयोजित कोल्हापूर जिल्ह्याचे लोकनेते खास. सदाशिवराव मंडलिक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या रानभाज्या प्रदर्शन व पाककला स्पर्धेचे उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या.प्रा.दादासाहेब सरदेसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. परीक्षक म्हणून डॉ.शहाजी कुरणे यांनी विविध रानभाज्यांची औषधी गुणधर्मासह सविस्तर माहिती दिली. तसेच त्यांनी रानभाज्यांचे आयुर्वेदिक महत्व सांगितले. प्राचार्य डॉ.शिवाजी होडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजी पोवार, डॉ. माणिक पाटील, संत गाडगेबाबा महाराज कॉलेज कराडचे प्रा.टी.डी.पाटील, तानाजी सातपुते, डॉ.गुरुनाथ सामंत, डॉ.दिपाली सामंत, दयानंद कांबळे, नितेश रायकर, सुहास गोरुले इत्यादी प्रमुख उपस्थित होते.

सदर स्पर्धेचे परीक्षण डॉ.शहाजी करणे व प्रा. समृद्धी मोरे यांनी केले. सूत्रसंचालन सौ.अर्चना कांबळे व सौ.मनीषा सावेकर यांनी केले.यावेळी विविध महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक वर्ग तसेच प्रशासक सेवक उपस्थित होते. आभार विनोद प्रधान यांनी मानले.

## थोडक्यात

### विभागीय कुस्ती स्पर्धेत देवचंद कॉलेजचे सुयश

निपाणी,ता.१३(प्रतिनिधी)-

**अण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले, येथे नुकत्याच शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोल्हापूर विभागीय कुस्ती(पुरुष) स्पर्धा संपन्न झाल्या. सदर स्पर्धेत देवचंद महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंनी यश प्राप्त केले. विजयी खेळाडूंची जैताळ येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेकरिता निवड झाली आहे.**



यामध्ये सातप्पा जयसिंग हिरगुडे- एम.ए.भाग -२, (फ्रीस्टाईल प्रकारात ७९ किलो वजनी गटात सुवर्णपदक विजेता), आदित्य अनिल दिवटे बी.बी.एस्सी भाग-१, (ग्रीको रोमन प्रकारात ८७ किलो वजनी गटात कांस्यपदक विजेता) यांचा समावेश आहे.विजयी खेळाडूंना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशिष शाह, उपाध्यक्षा डॉ.तृप्ती शाह, खजिनदार सुबोध शाह, प्राचार्या डॉ.जी .डी.इंगळे, प्रमुख डॉ.पी. डी.शिरगावे यांचे प्रोत्साहन लाभले.तसेच जिमखाना प्रमुख डॉ.रवींद्र चव्हाण,क्रीडाशिक्षक निरंजन जाधव, जिमखाना कर्मचारी वैभव सोनार, शिवदास चव्हाण, अनंत घोळवे यांचे मार्गदर्शन लाभले.

### जावडेकर शिक्षण शास्त्र महाविद्यालयात गुणगौरव समारंभ संपन्न

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)-

**येथील आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालयात गुण गौरव समारंभ पार पडला. या कार्यक्रमासाठी रिझर्व्ह बँकेचे निवृत्त डायरेक्टर डॉ.यशवंतराव थोरात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.**

महाविद्यालयाच्या विकासात योगदान देणारे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे प्रशिक्षणार्थी, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त विद्यार्थी, आदर्श विद्यार्थी,शिवाजी विद्यापीठ परिक्षेत महाविद्यालयात प्रथम येणारा विश्वयोगी पुरस्काराचा मानकरी विद्यार्थी ,द्वितीय क्रमांक ,तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी, पीएच.डी.पदवी प्राप्त प्रशिक्षणार्थी, पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेले विद्यार्थी,सेट, नेट, टीईटी सीटीईटी परीक्षांमध्ये उत्तीर्ण विद्यार्थी, महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच महाविद्यालयात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल प्रशिक्षणार्थींचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सरुवात मौनी विद्यापीठ, गारगोटीचे महासंचालक डॉ. यशवंतराव थोरात, चेअरमन श्मधुकर आप्पा देसाई, डॉ.पी. बी.पाटील, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.पी.एस.देसाई, डॉ.पी.बी.दराडे, प्रो.डॉ. शेळके यांच्या हस्ते रोपास पाणी घालून करण्यात आली. प्रास्ताविक प्राचार्या प्रो.डॉ.पी.एस.देसाई यांनी केले. मान्यवरांचा परिचय व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या कामकाजाचा आढावा डॉ.पी.बी.दराडे यांनी करुन दिला. यावेळी चेअरमन मधुकर देसाई यांचेही भाषण झाले. आभार डॉ.आर.के.शेळके यांनी मानले.

# शिरगुप्पी शुगर वर्क्सचे १२ लाख मे.टनाचे उद्दिष्ट

## कल्लाप्पण्णा मगेण्णावर ; कारखान्याचा गाळप हंगामाचा शुभारंभ उत्साहात

कागवाड,ता.१३(वार्ताहर)

**कागवाडच्या शिरगुप्पी शुगर वर्क्सच्या यंदाच्या २०२५-२६ गाळप हंगामाचा बॉयलर अग्नीप्रदिपन करुन गवाणीत ऊसाची मोळी टाकून गाळप हंगामाचा शुभारंभ निडसोसीचे प.पू.पंचमश्री शिवलिंगेश्वर महास्वामीजींच्या सानिध्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.**



कागवाड: शिरगुप्पी शुगर वर्क्सच्या गाळप हंगामाचा शुभारंभ ऊस गवाणीत टाकून करताना अध्यक्ष मगेण्णावर सह मान्यवर.

कारखाना स्थळावर आयोजीत शुभारंभ कार्यक्रमात कारखान्याचे अध्यक्ष कल्लापण्णा मगेण्णावर बोलताना म्हणाले, यंदाच्या गाळप हंगामात बारा लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट आहे.यंदाचा चौदावा गळीत हंगामाचा शुभारंभ करण्यात आला. यंदाही शेतकऱ्यांनी अधिकाधिक ऊस पुरवठा करून सहकार्य करावे, असे सांगून ते पुढे म्हणाले, यंदाच्या गाळपास येणाऱ्या ऊसाला शासनाने जाहिर केलेल्या एफआरपी प्रमाणे चांगला दर देऊन ऊस दराची कोंडी फोडण्यास आपण प्रयत्न करू,असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमास कारखाना मुख्य व्यवस्थापक अरुण फरांडे, महावीर सुगण्णावर,राजगौंडा सुगण्णावर,पोपट मगेण्णावर, जगदीश एच.एन.,सागर मंगसुळे, कौतुक मगेण्णावर, महावीर बिरनाळे, सह कर्मचारी,शेतकरी उपस्थित होते.

# नवलाई महिला दूध संस्थेकडून भेटवस्तू वाटप

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)-

**भाटिवडे (ता.भुदरगड) येथील श्री नवलाई महिला सहकारी दूध संस्थेच्या वतीने दूध उत्पादक सभासदांना दिवाळी निमित्त भेटवस्तू व ७ टक्के रिबेटच्या रकमेचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या चेअरमन सौ. वनिता महादेव मोरूस्कर यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले.**

यावेळी या सालात संस्थेला सर्वाधिक दूध पुरवठा करणाऱ्या अलका आश्राप्पा आकणूरकर, जनाबाई नलवडे, सौ.आक्काताई गुरव यांना प्रोत्साहनात्मक अनुक्रमे रुपये २०००/, रुपये १५०० व रुपये ११००/-बक्षीस देण्यात आले.

यावेळी संस्थापक महादेव मोरूस्कर यांनी वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी प्रकाश कडव यांचा शैक्षणिक साधन निर्मितीत जिल्हास्तरावर निवड झालेबद्दल व सौ.प्रभावती कडव यांचा सेवानिवृत्तीनिमीत्त सत्कार करण्यात आला. यावेळी सौ. कृत्तिका शेट्टी, अनिता सुतार, सुनंदा इंदुलकर, अस्मिता गुरव, सौ.सुरेखा कडव, दत्तात्रय कडव, कृष्णात शेट्टी, अमोल गोजारे, बाबुराव गोजारे, अनिल गुरव, प्रथमेश पाटील,महादेव मोरे, विनायक इंदुलकर उपस्थित होते.

# मंजुर घरकुलांचे काम डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करा

## मंत्री आबिटकर यांचे जिल्हा प्रशासनाला आदेश

निढोरी,ता.१३(प्रतिनिधी)-

**कोल्हापूर जिल्ह्यातील ५० हजार मंजुर घरकुलांचे काम येत्या डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश पालकमंत्री नाम.प्रकाश आबिटकर यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.**

मंजुर घरे व अपूर्ण घरे पूर्ण करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा जिल्हा परिषद सि.ओ. यांना ता.१८ ऑक्टोबर पूर्वी जे लाभार्थी नोटीस देऊन सुध्दा बांधकाम सुरू करणार नाहीत. त्यांचे घरकुल रद्द करण्यात येईल व ते फेरमंजुर होणार नाही अशा सुचना स्थानिक पातळीवरील लाभार्थी वर्गाला नोटीसीव्दारे प्राप्त झाल्या आहेत.

सध्या पावसाळा संपला असून लाभार्थी वर्गाने आपल्या हक्काचे घर बांधणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील शासकीय कर्मचारी, ग्रामसेवक, सरपंच, ग्रा.पं.कर्मचारी लोकांना भेटून मंजुरी प्राप्त घरे वेळेत बांधण्यासाठी सुचना, मार्गदर्शन करताना दिसत आहेत. तर बांधकाम पूर्ण झालेल्या घरकुल ई मस्टराचा निधी रोजगार हमी योजना यंत्रणेकडुन निधी अभावी रखडले असल्याचे कार्यालयाकडून सांगण्यात येत आहे. निधी प्राप्त होताच तो योग्य प्रकारे वितरीत होईल. मात्र राज्यातील सरकारने घरकुल वाढीव निधी रुपये ५० हजार देण्यात येणार आहे, असे जाहीर सांगितले होते. परंतु सध्या असंख्य लाभार्थींची घरकुले पूर्ण झाली खरी तरी उर्वरित निधी मिळणार की नाही अशा चर्चा सर्वत्र लाभार्थी करीत आहेत.

# मुदाळ प्राथमिक शाळेला देवमामांची मदत

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)-

**आपण समाजाचे काही देणं लागतो आणि आणि ते आपले कर्तव्य आहे, अशी मानसिकता मनाशी सतत बाळगून व निःस्वार्थी सेवाभाव जोपासत चंदगड तालुक्यातील आसगोळी (ता.चंदगड) येथील देवमामा पांडुरंग मारुती गुरव यांनी श्रद्धा आणि सेवाभावाची अनोखी सांगड घालत भुदरगड तालुक्यातील मुदाळ येथील विद्या मंदिर प्राथमिक शाळेला तब्बल दोन लाख रुपयांची देणगी दिली आहे.**



मुदाळ शाळेला मदतीचा धनादेश देताना देवमामा पांडुरंग गुरव.

गुरुवर्य शिवाजी आळवेकर यांचे शिष्य असलेले गुरव यांनी आई यल्लमा देवीचा जोगवा मागून जमा केलेल्या रकमेतील ही देणगी देत समाजासमोर आदर्श ठेवला आहे.

मुदाळ येथील विद्या मंदिर प्राथमिक शाळेला या देणगीतून मैदान बरोबरच शैक्षणिक साधनसामग्री, ग्रंथालय व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्याचा शाळा व्यवस्थापनाचा मानस आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अधिक चांगले शैक्षणिक वातावरण लाभणार आहे.शाळा सुधार समितीचे प्रमुख,सदस्य,ग्रामस्थ, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालकांनी देवमामांच्या या समाजहितैषी कृतीचे मनःपूर्वक कौतुक केले आहे.

# करनूर येथे समरजित घाटगे गटाला खिंडार

## ग्रामपंचायत सदस्यांसह अनेक कार्यकर्त्यांचा मुश्रीफ गटात प्रवेश

कागल,ता.१३(प्रतिनिधी)-

**करनूर (ता.कागल) येथील ग्रामपंचायत सदस्यसह समरजित घाटगे गटाच्या कार्यकर्त्यांनी मुश्रीफ गटात जाहीर प्रवेश केला. यामध्ये आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य व घाटगे गटाच्या कार्यकर्त्यांचा समावेश आहे.**



करनूर येथे नाम.हसन मुश्रीफ गटात प्रवेश केलेल्या ग्रामपंचायत सदस्यांसह कार्यकर्त्यांचे स्वागत करताना नामदार हसन मुश्रीफ.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी या कार्यकर्त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात स्वागत केले.येथील ग्रामपंचायत सदस्य सतीश धनगर हे २ नंबर वॉर्डातून समरजीत घाटगे गटातून निवडून आले होते. त्यांनी समरजीतसिंह घाटगे गटाला पूर्णविराम देऊन नामदार हसन मुश्रीफ गटात जाहीर प्रवेश केला आहे. ग्रामपंचायत सदस्य सतीश धनगर, विठ्ठल धनगर, गणपती धनगर, बाळू धनगर, सोमा धनगर, कृष्णात धनगर, रामा धनगर या कार्यकर्त्यांनी समरजित घाटगे यांच्या कारभाराला कंटाळून मुश्रीफ गटात जाहीर प्रवेश केला आहे.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांचा आमच्या गटात सन्मान केला जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रवेश प्रसंगी रंगराव पाटील, वजीर नायकवडी, महमद शेख, रावसाहेब चौगुले, तानाजी कुंभार, इम्रान नायकवडी, प्रवीणकुमार कर्णिक, संभाजी पाटील,सौ. संगीता जगदाळे, बाळासाहेब पाटील, बाबुराव धनगर, विश्वास चव्हाण, सुरेश परीट,काकासो चौगुले, समीर शेख, राजमहमद शेख, बाळासो धनगर, राजू शेख, युवराज शिंदे, शिवाजी गुरव, दयानंद कांबळे, दादासो कदम, विक्रांत कोरे, भगवान चव्हाण,शरद चव्हाण,जयवंत चव्हाण,रामराव भोसले,रोहित पाटील, नागेश जमदग्नी, वैभव गुरव, संभाजी नलवडे, शैलेश कांबळे, कृष्णात धनगर,रोहन पाटील, गणेश घुणके, निसार शेख, तौसिफ शेख, शौकत शेख, उदय पाटील, अल्ताफ शेख, निहाल शेख, प्रदीप जगदाळे, सौरभ पाटील आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मनावर चांगले संस्कार होण्यासाठी चांगली संगत केली पाहिजे-तळसकर महाराज

कोगनोळी,ता.१३(प्रतिनिधी)-

**या संसारात राहून मनाची अवस्था अतिशय चंचल झालेली आहे. आदीच म्हणजे स्वभावातच मन चंचल आहे. विषयाच्या संगतीने अधिक चंचलता निर्माण झाली, तेव्हा त्या मनाला स्थिर केले पाहिजे. त्याला भगवत चिंतनाची सवय लावली पाहिजे. त्या मनावर चांगले संस्कार होण्यासाठी चांगली संगत केली पाहिजे असे विचार मरळी (ता.पन्हाळा) येथील संदीप तळसकर महाराज यांनी व्यक्त केले.**



कोगनोळी (ता.निपाणी) येथील वैकुंठवासी पांडुरंग काजवे महाराज यांच्या कृपाशीर्वादाने पूर्णानंद नगरातील श्री वैष्णव मंदिर मूर्तीस्थापना वर्धापन दिनानिमित्त आयोजित प्रवचन सेवेत ते बोलत होते. यावेळी मारुती वाघवेकर, मधुकर मुळे, संगाप्पा बोते, सुतार-वरणगेकर, पांडुरंग सुतार, संजय भिकाप-पाटील, शाहीर संभाजी माने, सुनिल अब्दागिरे, हरी साळुंखे, नेमगोंडा माणगावे यांच्यासह वारकरी, भाविक उपस्थित होते.

**पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत**

## * खरेदी विक्री *

**किड्स वेअर-** टीशर्ट, शर्टस, जीन्स, लेटेस्ट फॅन्सी होलसेल दर, शांती गारमेंट. गुरू चित्रमंदिर जवळ, इचलकरंजी. ७०२०१५५७६६

**फार्म हाऊस विकणे आहे.** जागा साडे दहा गुंठा, पुणे डेव्हलप, २ बीएचके, स्विमिंग पूल, लॉन, गार्डन. पत्ता-राजमाने हायस्कूलमागे, रूई. मो. ९८६०४०५७०४

**प्लॉट विकणे आहे.** (यड्राव) पोद्दार इंटरनॅशनल स्कूल लगतचे फॉर्च्युन द पार्क या स्किममधील एनए प्लॉट विकणे आहेत. संपर्क-८८५६८८८२७६, ८४८३८८७४२९

**घरगुती व हॉटेलसाठी** स्पेशल चहाचे गुळाच्या चहाचे प्रीमिक्स विक्रीसाठी मिळेल. संपर्क-९८३४४०७४७७

**मारुती ८००-**१९८७ डिझेल ओरीजनल पेंटस पूर्णकाम केलेली टॉप कंडिशन आरसी बुक नोंद विकणे आहे. संपर्क-९६८९७२४८९९

**शहापूरमध्ये** २५.५०X७८ कलेक्टर एनए प्रॉपर्टी विकणे आहे. संपर्क-९८३४४०७४७७

**१ गुंठ्यात** आरसीसी ९०० स्क्वे. फूट बांधकाम-४ खोल्या १ बीएचके विकणे आहे. गंगानगर गल्ली नं. ४. संपर्क-९४२२४१६३८३

**७९९९ रूपयात** एलईडी टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, स्वस्त मिळण्याचे एकमेव ठिकाण, भारत इलेक्ट्रॉनिक, एस.टी. स्टॅण्डजवळ, स्टेडियम गाळा नं. ११, इचलकरंजी. ७५१७९६९६८०

**२ बीएचके फ्लॅट विकणे-**लिफ्ट, २४ तास पाणी, सोलरसह, रेडी पझेशन स्वामी समर्थ प्लाझा, जवाहरनगर, इचलकरंजी. मो. ९८९०११६१६१

**कपड्याच्या दुकानातील** MS कौंटर विकणे आहे. संपर्क-७४१०५२६१७४, ७४२०९८८७२२, इचलकरंजी.

**कोरोची येथे** १५००० स्क्वे. फूट जागेमध्ये ११,००० स्क्वे. फूट बांधकामसह विकणे व स्वामी मळ्यामध्ये ३०० स्क्वे. फूट गाळा भाड्याने देणे आहे. संपर्क-९४२२५११४५९

**१० पैसे पिकाने** ३३ पीसी माल चालवणे आहे. ६८ इंची मागवाल्यांनी संपर्क साधावे. संपर्क-९१५८४५२११०, ९९७०६३७००७०

**४८ पॉवरलूमची** आरसीसी शेड विकणे/भाड्याने देणे. पत्ता- मराठा चौक, कोरोची-शहापूर रोड, इचलकरंजी. ९४२२४२३५७६

**३०X७४ वीट, माती** बांधकाम असलेले कौलारू २ मजली १४ रूम असलेले घर विकणे आहे. विक्रमनगर गल्ली नं.३, बालाजी कॉलेजजवळ. ९८६०६४१७८६

**आपल्या घरी येवून** सोफा क्लिनिंग (शांपोईंग) करून देवू. संपर्क-८९७५९७४१०७, ८७९३९८४६९४

**कोरोचीमध्ये** कलेक्टर एनए बिगरशेती प्लॉटस ११५० ते १४०० स्क्वे. फूटापर्यंत विकणे आहे. भैरवनाथ केअर हॉस्पिटलजवळ, कोरोची. संपर्क-९१२७१११७७७. ८०८७८०२२८५

**१ बीएचके** सर्व सोयीनियुक्त फ्लॅट विकणे आहे. पत्ता- श्रीराम अपार्टमेंट, रामजानकी हॉलसमोर, नदीवेस, इचलकरंजी. संपर्क-७४९९१७३१३४

**प्लॉट विकणे आहे.** कोनार्क पार्क, कबनूर- संपर्क-८८८८०६१८८९, ९६६५३२४५५५

**जुने व नवीन** पॉवरलूम घेवू व देवू तसेच फवारा, कांडीमशीन, डक्टींग घेवू व देवू. संपर्क-८३१७२९१००८

## कर्ज विषयक

**ऑफर!ऑफर!ऑफर** ० लॉगिन फी. नामवंत बँकमधून कर्ज उपलब्ध. स्थावर तारण कर्ज, बी.टी. टॉपअप. (सरळ बँक ते ग्राहक) मो. ९३२५५३७५९९

**छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद**

## * नोकरी विषयक *

**कपड्याच्या दुकानात** दिवाळीनिमित्त काम करण्यासाठी मुले व मुली पाहिजेत. सिद्धेश्वर ड्रेसेस, लक्ष्मी मार्केट, इचलकरंजी. संपर्क-९७६६८०१२२९

**Ladies Teachers** are required for play class. Nursery Junior K.G. Senior K.G. and ladies P.E. teacher. Contact-9890618297

**Urgently Requirement** Accountant-2. Telecaller-2. Counsellor-2. Marketing Executive-2. Fresher Experienced Salary+Incentive. Contact No. 8485038383, 9822658476

**टू व्हिलर शोरूमकरिता** अनुभवी अकौंटंट पाहिजे. बायोडाटा व्हॉटस् ॲप करणे. ७६२०४५२२८८

**श्री महालक्ष्मी** वधु-वर टेलिकॉलिंगसाठी मुली हव्या आहेत. वय-१८-३० वर्षे. शिक्षण-१२ वी पुढे.-८८३०२४०२४२६

**पाहिजेत.** २ ते ३ वर्षे अनुभवी व DME Holder-१) डिझाईन इंजिनिअर-Auto CAD व Solidworks मध्ये अनुभव. २) वर्क्स मॅनेजर- इंजिनिअरींग वर्कशॉप व Assembly ची माहिती. ३) Fitter-ITI. संपर्क-९५४५४७१२००

**निर्व्यसनी व अनुभवी** ड्रायव्हर हवा. वय-२५ ते ४० वर्षे. संपर्क-९०२११६७३०१

**३ ते ५ वर्षे** अनुभवी व MBA पदवीधर डिजीटल मार्केटिंग हेड पाहिजे. संपर्क-९०२११६७३०१. Email-sbghotane-srujanmc@rediffmail.com

**डी.टी.पी. ऑपरेटर पाहिजे.** प्रिटींग प्रेसमधील कामाचा अनुभव असणे आवश्यक. फोटोशॉप व कोरल ड्रॉ येणे आवश्यक. मो. ९८२३७१९७१२

**बाराचाकी ट्रक** ड्रायव्हर पाहिजे. आकर्षक पगार+भत्ता, रूट-इचलकरंजी व परिसर १०० किमी. संपर्क-९६२३९५६०७८

**मनोविकास क्लिनिकमध्ये** ट्रेन्ड असलेले डे साठी लेडीज स्टाफ पाहिजे. संपर्क-गावभाग, गुजरी पेठ, विठ्ठल मंदिरशेजारी, इचलकरंजी. फोन-९८८१८११३३

**गॅस एजन्सीमध्ये** ड्रायव्हर पाहिजेत. छोटा हत्ती, दोस्त, आयशर सहा चाकी गाडी, ESIC सुविधा लागू. संपर्क-९९२२४९९६४९, इचलकरंजी.

**दवाखान्यात कामासाठी** मावशी पाहिजे. कामाची वेळ- ८ ते ४ व १२ ते ८. संपर्क-८१४९५०५१०३

**पेट्रोल पंपावर** लेडीज/जेंटस कामगार पाहिजे. संपर्क-८३८०८१११८८

**स्वयंपाकासाठी** लेडीज पाहिजे. शाकाहारी स्वयंपाक करणेसाठी लेडीज पाहिजे. संपर्क-९०४९९५४४२४, ९५५२५५८९८६

**हॉस्पिटलमध्ये** सफाई कामाकरिता फूलटाईम मावशी तसेच अनुभवी एक्सरे टेक्नीशियन रिशेप्सनिस्ट व सिस्टर्स पाहिजेत. संपर्क-९२२६७८१७९७- महाडिक आर्थोपेडिक हॉस्पिटल, इचलकरंजी.

**अण्णाज फॅशन** या शॉपमध्ये सेल्ससाठी मुले/मुली पाहिजे. पगार-८०००-१००००. पत्ता-अण्णाज फॅशन, यड्राव फाटा, इचलकरंजी. ८८८८९३२७२७

**२० ते ३० वयापर्यंत** ऑफिसबॉय पाहिजे. ऑफिस काम/किरकोळ साफसफाई व परिसरात बाहेर फिरण्याची तयारी असावी. आकर्षक पगार. ७३८७६३५५०४

**We are hiring-** JR.Accountant-B.Com, M.Com, Exp.-2-3 years must Knowledge of Tally Prime (M/F) Back Office Executive (F) Contact-7090969801

**Mechanical** Design Engineer Required- ITI Draftsman/Diploma/B.E. Mech. Fresher/Experienced in Fixture Design/SPM Design. 8087870870. hr@carlinetech.in

**कॉम्प्युटर ऑफिसमध्ये** ऑफिस कामासाठी मुली पाहिजेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क-९७६७४९६९२२

**इचलकरंजीमधील** नामांकित संस्थेमध्ये ऑफिसबॉय/क्लार्क पाहिजे. संपर्क-७७२००१८४०६

**पार्वती इस्टेट जवळील** टेक्स्टाईल मिलमध्ये एअरजेट लूमकरिता अनुभवी विव्हर पाहिजेत. ८ तास ड्युटी-१० जागा, आकर्षक पगार व ESIC सुविधा उपलब्ध. संपर्क-७७२००१८४०६

**बारसाठी** अनुभवी वेटर पाहिजेत. पार्टटाईम/फूलटाईम व साफसफाईवाला पाहिजे. समक्ष भेटा. मो. ९७६७४९९५४०

**ऑफिस कामासाठी** मुली पाहिजेत. अकौटींगचे ज्ञान आवश्यक. संपर्क-सहारा एन्टरप्राईजेस. मो. ९५९५०५७०७०, ९७४३२५५५८०

**अर्जंट नेमणे आहे.** फोर व्हीलर मेकॅनिक, डेंटर, पेंटर, कॉम्प्युटर ऑपरेटर (टॅलि येणे आवश्यक) अनुभवींस प्राधान्य. संपर्क-मारूती ऑथोराईज्ड सर्व्हीस स्टेशन. सांगली रोड, इचलकरंजी. ९६३७९५१७५६

**पाहिजे.** गॅस एजन्सीमध्ये कामासाठी ऑफिसस्टाफ व अकौंटंट पाहिजे. डेक्कन, शहापूर रोड खणीजवळ, एचपी गॅस गोडाऊन, इचलकरंजी. ९५४५८२३३४४

**अर्जंट पाहिजे.** Management Representative (MR) ISO व IATF चा पूर्ण अनुभव. QMS Activity स्वतंत्रपणे हाताळले पाहिजे. Lead Auditor कोर्स पूर्ण झालेला. ५-८ वर्षे अनुभव. मशीनिंग डेव्हलपमेंट इंजिनिअर-१ जागा अनुभव ४-५ वर्षे. शिफ्ट सुपरवायझर-२ जागा. अनुभव ३-४ वर्षे. CNC ऑपरेटर-७ जागा. VMC ऑपरेटर-४ जागा. लाईन इन्स्पेक्टर-२ जागा. हेल्पर-३ जागा. ड्रायव्हर (जीतो EV)-१ जागा. योग्य उमेदवारास आकर्षक पगार देण्यात येईल. संपर्क-९७६५९९१२३७, ९१४८७३२१३२

**URGENT REQUIRMENT-** लक्ष्मी सल्फेटस टाकवडे कंपनीमध्ये खालील पदे भरणेचे आहे. १) फीटर. २) ज्युनियर अकाऊंटंट (लेडीज/पुरूष). ३) बी.एस.सी. केमिस्ट. मो. ८०८७३३६५७९/ ९३२५६७८१११

**पीयुसीकरीता** कॉम्प्युटरचे ज्ञान व १२ वी शिक्षण झालेला चारचाकी गाडी येणारा मुलगा पाहिजे. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हींग स्कूल, इचलकरंजी. मो. ८१८००३२००५

**ऑफिस कामासाठी** १२ वी टायपिंग ३० व संगणक ज्ञान असणारी मुलगी पाहिजे. श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, इचलकरंजी. मो. ८१८००३२००५

**सांगली नाका परिसर** आईस्क्रीम पार्लरमध्ये पार्टटाईम/फूलटाईम कामगार पाहिजे. संपर्क-९५०३७०४०३०

**प्रोडक्शन मॅनेजर** प्रोग्रॅमिंग सुपरवायझर, क्वॉलिटी इन्पेक्शन,ऑपरेटर, लेथ ऑपरेटर पाहिजेत. संपर्क-९३०९९२४५८८, ७७९८०२७८९०

**नामवंत मॉलमध्ये** स्टाफ पाहिजे. अनुभवी/शिकावू. आकर्षक पगार. संपर्क-९८८१८०००५४, ९२८४४०२२२४

**जॉकी शोरूममध्ये** सुशिक्षित सेल्समन पाहिजेत. पगार-१० हजार ते १५ हजार. भेटा-व्यंकटराव हायस्कूल रोड, युनियन बँकेसमोर, इचलकरंजी.

**पिटर इंग्लंड** रेडिमेड शोरूममध्ये पार्टटाईम/फूलटाईम सुशिक्षित मुले/ मुली पाहिजेत. व्यंकटराव हायस्कूल रोड, युनियन बँकेजवळ, इचलकरंजी.

**11th & 12th** Science Class मध्ये Physics, Chemistry, Mathematics & Biology विषयाकरीता अनुभवी व तज्ञ शिक्षक पाहिजे. संपर्क-७५५९३०६२३८, ९७६२६२६२३८

**रिपेअरी वर्कशॉपमध्ये** लेथ मशिनवर हुशार टर्नर व हेल्पर पाहिजेत. (आकर्षक पगार) संपर्क-९९२२४९९५१४, ९२०९०६०१४३, डेक्कनच्या पाठीमागे.

**कामगार पाहिजे.** वेळ दुपारी ४ ते ९ फूलटाईम कामगार पाहिजे. राजेश किराणा स्टोअर्स, गांधी पुतळा, जवाहर बेकर्सशेजारी, इचलकरंजी. ९४२१२८८८२६.

**बार व हॉटेलमध्ये-** वेटर व मॅनेजर पाहिजे. संपर्क-तारा परमिट रूम, एस.टी. स्टँडजवळ, हातकणंगले. ८८३०३४८१६१

**कोरोची आणि शहापूर** येथे अनुभवी/शिकाऊ VMC ऑपरेटर-२ व मशिन फिटर-२ पाहिजेत. संपर्क-९८५००४६५०१

**ऑटोलूम ट्रेडिंग कंपनीसाठी** कॉम्प्युटरचे ज्ञान असलेला दिवाणजी कामासाठी अनुभवी पुरूष पाहिजे. C-8-1 बीजेपी मार्केट, इचलकरंजी. संपर्क-८५९१४५०५२०

**होलसेल औषध दुकानात** कामासाठी १०/१२ झालेली व अकाऊंटसाठी ग्रॅज्युएशन झालेली मुले/मुली पाहिजेत. पत्ता-सुशिल फार्मा LLP नाईट कॉलेजजवळ, इचल. (संपर्क-११ ते१) फोन-९०९६२६१२७२

**पाहिजेत.** सिव्हील इंजिनिअर व ऑफिस कामासाठी अकौंटंट पाहिजेत. किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक. संपर्क-९८२२१८७१९९

## * भाड्याने देणे/घेणे *

**भोने माळ,** सरस्वती हायस्कूलजवळ भारत गॅस एजन्सीजवळ ९।।X१६ दुकानगाळे व ८५X५९ मोकळी जागा कंपौंड केलेली भुई भाड्याने देणे. ९६८९७२४८९९

**कबनूर गावभाग,** महादेव मंदिरशेजारी केटकाळे वाडा १ बीएचके रूम्स सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. संपर्क-९६८९७२४८९९

**२ बीएचके** प्रशस्त सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे. स्वामी समर्थ कॉलनी, योगाश्रमजवळ, शहापूर. संपर्क-७४९९५८८०८०-राकेश सस्ते.

**१२X११ गाळा** अर्जंट भाड्याने देणे आहे. पत्ता-मेनरोड, बालाजी चौक, विक्रमनगर. संपर्क-९९२१४९३०५०, ९०९६०५१२९६

**भाड्याने देणे-** मेन रोडवर १६X१६ स्क्वे. फूट व १०X२५ स्क्वे. फूट व पोटमाळा १८० स्क्वे. फूट सर्वसोयीनियुक्त. संपर्क-चैतन्य आयुर्वेदिक दवाखाना, थोरात चौकच्या पुढे, शहापूर. ९४२००१०१५०, ९१७५१०६८२९

**नोकरदार स्त्रिया,** पुरूष आणि विद्यार्थी, मुले व मुलींसाठी सर्व सोयीनी सुसज्ज आणि हवेशीर आरोग्यपूर्ण वातावरण असलेले पार्किंग सुविधांसह पी.जी. होस्टेल मिळेल. संपर्क-९५७९८९०१९८

**भाड्याने देणे-** सर्व सोयीनियुक्त हॉस्पिटलसाठी जागा भाड्याने देणे आहे. के.पी. कॉम्प्लेक्स, राणीबागेसमोर, इचलकरंजी. संपर्क-९४२२०४३६७६, ९७६६९१२३३७

**भाड्याने देणे-** १ बीएचके शाकाहारी कुटूंबासाठी रामनगर, माई बालविद्यामंदिर समोर, इचलकरंजी. फोन-७२७६३०५७६२

**सर्व सोयीनियुक्त** आरसीसी बिल्डींग कमर्शियल युजसाठी भाड्याने देणे आहे. पत्ता- नवीन कोल्हापूर नाका, कोल्हापूर रोड, इचलकरंजी. संपर्क-९८६०००५५१२

**फ्लॅट भाड्याने देणे-** १ बीएचके सर्व सोयीनियुक्त बाबासाहेब खंजिरे सोसायटी स्वामी अपार्टमेंटसमोर, जवाहरनगर, इचलकरंजी. फोन-९८२३९५७०९५

**मध्यवस्तीत** साखरपे हॉस्पिटलसमोर १७०० स्क्वे. फूट शेड, १००० स्क्वे. फूट शेड व सिंगल अटॅच रूम (महिला, ऑनलाईन क्लासेस इतर) भाड्याने देणे आहे. संपर्क-७९७२९३४८२१

**३ बीएचके फ्लॅट** सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. स्वामी समर्थ मंदिर, पॅराडाईज कॉलनी, इचलकरंजी. ९४२३२८६०९३, ९८५०२८६०९३

**पाहिजे.** नॉनव्हेज कुटूंबासाठी २ बीएचके घर/फ्लॅट भाड्याने पाहिजे. कार पार्किंग सुविधेसह. संपर्क-९९३०७६९०९९

**इचलकरंजी परिसरात** हॉटेल/ढाबा चालविण्यास पाहिजे. संपर्क-९५७९४५६८८८

**भाड्याने देणे-** इचलकरंजीत मुख्य रस्त्यालगत आकर्षक लोकेशनवर, प्रतिक प्लाझा येथे इलेक्ट्रीक टू-व्हिलर कंपनी शोरूम, रेडिमेड कपडे, साडी दुकान, स्वीटमार्ट, बेकरी, गोल्ड शॉप, बँक ऑफिस, पिझ्झा हट, आईस्क्रीम पार्लर इत्यादी अन्य व्यवसायासाठी, हॉस्पिटलसाठी तसेच बंदिस्त गोडाऊन, जिम, क्लासरूमसाठी दुकानगाळे भाड्याने देणेचे आहेत. संपर्क-८४४६८५१२५७

**१५०० स्क्वे. फूटाचे** शेड भाड्याने देणे आहे. पत्ता- मु.पो. माणगाव. संपर्क-९८८१८६३४६३, ९०१११७५२५१

**गाळा भाड्याने देणे-** १७X४० पहिला मजला, स्टेशन रोड, इचलकरंजी. फोन-७७०९९३७३८६

**दुकानगाळा भाड्याने देणे-** ३३० स्क्वे. फूट पोटमाळा व बाथरूमसह तिरूपती अपार्टमेंट कागवाडे मळा, इचलकरंजी. संपर्क-९४२२०३२४०४

**३५०० स्क्वे. फूटामधील** बिल्डींग भाडेने देणे आहे. सर्व सोयीनियुक्त घर, ऑफिस आणि हॉल. बँक, फायनान्स, शोरूम, पतसंस्था करीता योग्य. पत्ता- बंगला रोड, राणी बागेसमोर, एचडीएफसी बँक शेजारी. इचलकरंजी. संपर्क-९२५६५७२७२७

**भाड्याने देणे-** एलपीजी गॅस पंप सर्व सोयीनियुक्त चालू स्थितीत चालवण्यास देणे आहे. रविराज हॉटेलजवळ, कबनूर. संपर्क-८४८४०४४७६३, ८७९६२९८२२२

**भाड्याने पाहिजे.** १२,१४ किंवा १६ लुमचा कारखाना शेडसह भाड्याने पाहिजे. योग्य भाडे व डिपॉझिट दिले जाईल. संपर्क-९६२३७९०३७०

**शेड भाड्याने देणे-** ५००० स्क्वे. फूट व रिटर्न एअरसह प्लॉट रूम सुस्थितीत लूमसाठी किंवा गोडाऊनसाठी शेड भाड्याने देणे आहे. पत्ता-दि इचलकरंजी इंड. इस्टेट, खंजीरे नगर, शहापूर, इचलकरंजी. फोन-९७६४७१२२७५, ७५०७५२०५५३

**१२०० स्क्वे. फूट** आरसीसी गाळा २१X६० भाड्याने देणे आहे. बँक, पतसंस्था, होलसेल मेडिकल, अकॅडमी, क्लासेस, ऑफिससाठी उपयुक्त. भोने माळ, इचलकरंजी. संपर्क-९८५०३७४०७६

**हॉल भाड्याने देणे-** १६०० स्क्वे. फूट, सांगली नाकासमोर, बालाजी पतसंस्थेच्यावर, इचलकरंजी. संपर्क-७४४७४५५७५१

**२८X६० आरसीसी** शेड भाड्याने देणे. सर्व सोयीनियुक्त ५ एचपी लाईटसह, ज्ञानेश्वर नगर, तारदाळ. ९५५२९१६८६५

**२५०० स्क्वे. फूटाचे शेड** मेन रोडटच तीनबत्ती चौकात आरसीसी कमर्शियल युजसाठी भाड्याने देणे आहे. संपर्क-९१७२९२२६०७

**गोडावूनसाठी** किंवा गारमेंटसाठी आरसीसी शेड सर्व सोयीनियुक्त भाड्याने देणे आहे. १५०० स्क्वे. फूट वर्धमान चौक, इचलकरंजी. संपर्क-९९२३०७२१०३

**ग्राऊंड फ्लोअर** ६०० स्क्वे. फूट चा हॉल पहिला व दुसरा मजल्यावर ९०० स्क्वे. फूटचे तीन हॉल सर्व सोयीनियुक्त प्राईम लोकेशनची जागा भाड्याने देणे. ऑफिस, बँक, मेडिकल, क्लासेससाठी उपयुक्त मंगलमुर्ती टॉकीजसमोर, राधाकृष्ण चौक, इचलकरंजी. संपर्क-९४२२४१६२६०

## बोअरवेल विषयक

**चौगुले बोअरवेल-** ४३ वर्षांची अखंड परंपरा आमचेकडे १ दिवसात ४।।। व ६।। इंची बोअरींग करून सबमर्सिबल पंप बसवून मिळेल व रिपेअरी करून मिळेल. संपर्क-डॉ. संजय चौगुले-९३२५१४६८८४, ९४०४७४६८८४

**चौगुले बोअरवेल जयसिंगपूर-** घरासाठी ४।।। इंची व शेतीसाठी ६।। इंची बोअर मारून मिळेल. संपर्क-९९६०१०५४२१

## यात्रा सहल विषयक

**शिवभक्त ट्रॅव्हल्स-**२४ ऑक्टोबर-अष्टविनायक-३ दिवस, १ नोव्हेंबर-कुरवपूर, पिठापूर-९ दिवस, १० नोव्हेंबर-दक्षिण भारत कन्याकुमारी रामेश्वर, २० नोव्हेंबर-काशीयात्रा-१० दिवस, १३ जानेवारी-गंगानगर कलकत्ता, नेपाळ. शाळा, कॉलेज सहलीसाठी भेटा. ९८३४०६१७४४/ ९९२२४७३३४६

**दक्षिण भारत** केरळसहित २६ ऑक्टोबर म्हैसूर, तिरूपती, रामेश्वर, कन्याकुमारी, मदुराई, श्रीशैल्य १७ दिवस बसने कोजागिरी-९४२०५९२५२४, ९४०३९५३४१२

## आरोग्य विषयक

**मानसिक आजार-** व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या, स्किझोफ्रेनिया, बायपोलर, मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ.सी.डी. मंत्राळेपणा. इ. मानसिक आजारसाठी दारू, तंबाखू, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री. इ. व्यसनमुक्तीसाठी शिघ्रपतन, नपुंसकता, विर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी व वृध्द लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रूषा केंद्र व नातेवाईकांशिवाय ॲडमिट करण्याची सोय. निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज (सांगली) संपर्क-८०८३६०८०८३, ९९२२६४६५६६

## बांधकाम विषयक

**वास्तुशास्त्रानुसार-** जलद, स्वस्त, उत्तम दर्जाचे बांधकाम करून देवू, तेहतीस वर्षे अनुभवी इंजिनिअर, वास्तुशास्त्रतज्ञ, ज्योतिषप्रविण. मो. ९८९०६९०८३१

## आरोग्य विषयक

**बिग बझार व्हिंकीज पार्लर-** हायड्रा फेशियल-५९९/-, हेअरकट अॅन्ड वॅक्सींग-९९. संपर्क-८२०८२६६६४९

## व्यवसाय विषयक

**शेअर मार्केट बेसिक** ते ॲडव्हॉन्स-माफक फीमध्ये परफेक्ट शिका. प्रॉफिट फर्स्ट. कल्पना टॉकीजसमोर. ९६६५४०८८२८, ७७६८९५००२१

## वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

## प्रवेश 'कादंबरी उत्तम साहित्यकृती

**मिरज,ता.१३(प्रतिनिधी)-** **लेखकाला आत्मभान आणि समाजभान असावे लागते, चांगला लेखक हा चांगला माणूस असावा लागतो. स्व. राहुल पाटील यांच्या ठायी या गोष्टी होत्या. त्यामुळेच त्यांची 'प्रवेश ' ही लघु कादंबरी सर्वार्थाने उत्तम साहित्यकृती झाली आहे. ही कादंबरी शिक्षण क्षेत्रातील वास्तव मांडणारी असून परिवर्तनाचा संदेश देणारी आहे. असे प्रतिपादन साहित्यिक दि. बा. पाटील यांनी केले.**

यावेळी ॲड.कृष्णा पाटील, सुधाकर इनामदार, दीपा पाटील, धैर्यशील राहुल पाटील उपस्थित होते. ज्येष्ठ साहित्यिक विजय जंगम यांनी 'प्रवेश' या लघुकादंबरीतील मर्मस्थाने आणि समकालीन वास्तव या अनुषंगाने भाष्य केले. सूत्रसंचालन प्रा. संतोष काळे यांनी तर गजानन पाटील यांनी स्वागत केले. आनंदहरी यांनी प्रास्ताविक केले.जस्मिन शेख यांनी आभार मानले.



लायन्स क्लबतर्फे आयोजित शिबिराच्या उदघाटनप्रसंगी डॉ.संध्या ढवळे, डॉ.प्रिया कुलकर्णी, डॉ.संतोष पोळ, संदीप सुतार आदी.

## लायन्सतर्फे आशा सक्षमतेची दिव्यांग आरोग्य शिबिर यशस्वी

**इचलकरंजी,ता.१३-** **येथील लायन्स क्लब इचलकरंजीतर्फे'आशा सक्षमतेची' या उपक्रमांतर्गत लायन्स ब्लड सेंटर(दाते मळा, इचलकरंजी) येथे दिव्यांग मुलांसाठी मेंदूचा पक्षाघात या आजाराची प्राथमिक आरोग्य तपासणी शिबिर झाले.**

शिबिरासाठी फिजिओथेरपिस्ट डॉ.संध्या ढवळे व अस्थिरोग तज्ञ डॉ.प्रिया कुलकर्णी यांचे सहकार्य लाभले. यावेळी इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयाचे मुख्य आरोग्य अधिक्षक डॉ.संतोष पोळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.विवेकानंद पाटील, डॉ.भास्कर उरूणकर व डॉ. सर्जे उपस्थित होते. मुलांचे व पालकांचे समुपदेशन संगीता सारडा, भारती चंगेडिया व हेमा डाळ्या यांनी केले. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष संदीप सुतार, सचिव सचिन येलाजा, अमित पोद्दार, क्लब प्रशासक लिंगराज कित्तूरे, मनोज चंगेडिया, अनिल भुतडा, दिनेश बिर्ला,गजानन होगाडे, ब्रिजमोहन मर्दा, सुरेश पाटील, समीत काबरा, अरुण पाटील, कविता भुतडा, अंजु बिर्ला यांसह सदस्य उपस्थित होते.शिबिर यशस्वीतेसाठी सुभाष तोष्णीवाल यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कर्मचाऱ्यांना योग्य वागणूक दिल्यास कंपनीची प्रगती शक्य : स्वामी

**कसबा सांगाव,ता.१३(वार्ताहर) -** **आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कष्ट आणि गुणवत्ता हेच खरे महत्त्वाचे घटक आहेत. आपल्या ग्राहकालाच आपला प्रचारक बनवा. कंपनीचे कर्मचारी हे केवळ कर्मचारी नसून ते कंपनीचे भागीदार असतात. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करा, त्यांच्या सुख दुःखात सहभागी व्हा आणि त्यांना घरातील सदस्यासारखी वागणूक द्या. त्यामुळे कंपनीची सर्वाधिक प्रगती होईल, असा प्रेरणादायी सल्ला कॉर्पोरेट प्रशिक्षक आणि मोटिव्हेशनल स्पीकर उमेश स्वामी (मुंबई) यांनी दिला.**

'पॅटर्न बदलून यश मिळवा' या विषयावर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कागल - हातकणंगले (मॅक) तर्फे आयोजित १८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते.

ते म्हणाले की, कामात आनंद शोधणारा कर्मचारी हा निर्मितीक्षम आणि सर्जनशील असतो. कर्मचाऱ्यांवर विश्वास दाखवल्यास आणि त्यांच्या कल्पनांना प्रोत्साहन दिल्यास ते संस्थेच्या यशात अधिक योगदान देतात.स्वामी यांनी उदाहरणे देत सांगितले की, संस्थेतील सकारात्मक वातावरण, संघभावना आणि संवाद या गोष्टींमुळे ग्राहक समाधानी राहतात आणि समाधानी ग्राहक हेच कंपनीचे खरे ब्रँड ॲम्बेसेडर ठरतात. यावेळी मॅकचे पदाधिकारी, उद्योगपती आणि कर्मचारी उपस्थित होते.



मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (मॅक) च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना मॅक चे अध्यक्ष मोहन कुशिरे, व्यासपीठावर अन्य मान्यवर.

## शिरोळ नगराध्यक्षपदाची निवडणूक श्वेता काळे लढवण्याची शक्यता

**शिरोळ,ता.१३ (प्रतिनिधी)-** **शिरोळ नगरपालिकेचे नगराध्यक्ष पदाचे आरक्षण अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. शहरातील जनतेच्या आग्रहास्तव आणि स्वाभिमानी शिरोळकरांच्या दबावामुळे नगराध्यक्ष पदाची निवडणूक श्वेता विश्वास काळे लढवण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या दृष्टीने त्यांचे पती विश्वास उर्फ दादासाहेब काळे शिरोळच्या जनतेची मते आजमावून घेत आहेत. स्वाभिमानाची लढाई म्हणून मतदारांच्या पाठिंब्यावर त्या ही निवडणूक लढवतील अशी शक्यता आहे.**



मुळातच दादा काळे चळवळीच्या मुशीतून घडलेले आहेत. त्यांनी आजवर गेल्या तीस वर्षात अनेक शेतकरी आंदोलनातून शेतकरी प्रश्नांना न्याय देण्याची भूमिका घेतली. कर्जबाजारी शेतकरी व जनतेच्या पाठीशी खंबीर उभे राहून सुलतानी कर्जवसुलीला विरोध करत चाबूकफोड आंदोलन केले, जे संपूर्ण महाराष्ट्रात गाजले होते. शिरोळ तालुक्यामध्ये आजही शेतकऱ्यांची जप्ती वसुली, लिलाव आदी प्रकार होत नाहीत.तालुक्यातील अनेक सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी वेळोवेळी आंदोलन केली आहेत. कित्येकदा या आंदोलनाची झळ बसून वेळप्रसंगी तुरुंगवासही भोगावा लागला आहे.

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात कोणत्याही पदाविना ते कार्यरत राहून नागरिकांच्या सुख दुःखात सहभागी असतात. शिरोळकरांच्या भावनेचा आदर राखत नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत श्वेता काळे उतरतील असा राजकीय अभ्यासकांचा अंदाज आहे.

## कागल पालिकेच्या निवडणूक प्रारूप मतदार यादीत घोळ

### आवर न घातल्यास फौजदारी दाखल करू : दीपक मगर

**कागल,ता.१३( प्रतिनिधी)** **होऊ घातलेल्या कागल नगरपालिकेच्या निवडणूक प्रारूप मतदार यादीतून नावे वगळणे, मतदारांच्या प्रभागात फेरबदल करणे, कुटुंबाची संख्या मर्यादित असताना एकाच घरातील सोयीस्कररित्या संख्या वाढविणे, काही ठिकाणी चक्क बोगस नावे घुसडणे, या सर्व बाबी लाजिरवाणी आहेत. पालिकेच्या बीएलओंनी झोपा काढल्या आहेत का , मयत लोकांची नावे कमी का केली नाहीत ? या सर्व बाबींना वेळीच आवर घाला अन्यथा फौजदारी दाखल करू, असा इशारा समरजितसिंह घाटगे गटाचे प्रमुख कार्यकर्ते दीपक मगर यांनी दिला. कागलमधील राजे विक्रमसिंह घाटगे बँकेच्या कार्यालयात सोमवारी पत्रकार बैठक झाली.**



कागल नगरपालिकेच्या मतदार यादीवर प्रकाशझोत टाकत त्यांना भेसळणाऱ्या प्रश्नाबाबत प्रसंगी मगर यांनी न्यायालय, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी,कागलचे मुख्याधिकारी यांचा दरवाजा ठोठावला आहे. यावेळी राजे बँकेचे माजी चेअरमन राजेंद्र जाधव, आप्पासो भोसले,विद्यमान व्हा. चेअरमन उमेश सावंत,दूधगंगा डेअरीचे चेअरमन प्रमोद कदम, अजितसिंह घाटगे सरकार, संजय कदम,मदारे सर,कालेकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रभाग १०मधील त्रुटीबाबत मगर म्हणाले,बुथ क्रमांक ३० मध्ये २७३ मतदारांची नावेच प्रारूप मतदार यादीतून गायब झाली आहेत. क्रमांक एक ते ११ प्रभाग निवडणुकीसाठी तयार केले आहेत. आगामी कागल नगरपालिकेच्या निवडणुकीत प्रारूप मतदार यादीत ८२२ नावे दुबार आहेत.८ ऑक्टोबर २०२५ मध्ये प्रसिद्ध झालेल्या यादीवर प्रकाशझोत टाकला असता प्रभाग दहाच्या यादी मधून मयत मतदार डिलीट केले आहेत. एकूण मतदार संख्येच्या आंकडेवारीबाबत ते म्हणाले,एकूण प्रभाग ११, एकूण मतदान २८ हजार ४१३ पैकी पुरुष मतदार १३८६४,महिला मतदार १४५४८, इतर- ०१,मयत संख्या ४५०, दुबार संख्या ८२२, ट्रान्सफर संख्या ३२१, बोगस मतदान १०० अशी आकडेवारी आहे. प्रभाग १० मधून ३४२ नावे गायब कशी होतात.यामागचे गौडबंगाल काय,असा सवाल करीत न्यायालय,कागल नगरपालिकेचे मुख्याधिकारी, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केल्यानंतर पालिकेचे प्रशासन खडबडून जागे झाले आहे.प्रशासनाने जागे होऊन अंतिम यादी प्रसिद्ध करताना सर्व त्रुटी दूर कराव्यात व पारदर्शकतेची यादी मतदारांसमोर ठेवावी अशी सूचना मगर यांनी कागल नगरपालिकेच्या प्रशासन अधिकाऱ्यांकडे केली आहे.यावेळी राजे गटाचे कार्यकर्ते, इंडिया आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



मिरज शासकीय रुग्णालयातील सुबोध ऊर्जा पार्क येथे वृक्षारोपण करताना आ. सुरेश खाडे, उपायुक्त स्मृती पाटील, डॉ. रुपेश शिंदे, सुधीर गोरे, राकेश तामगावे व मान्यवर.

## मिरजेत सुबोध ऊर्जा पार्क येथे वृक्षारोपण

■ मिरज,ता.१३(प्रतिनिधी)–

**योगकर्मी सुबोध ऊर्जा पार्क सिव्हिल हॉस्पिटल मिरज या ठिकाणी माजी मंत्री आ. डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते पेरूचे वृक्ष लावण्यात आले.**

यावेळी महापालिका उपायक्त स्मृती पाटील, मिरज सिव्हिलचे अधिक्षक डॉ. रुपेश शिंदे, जीवन रक्षक बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सुधीर गोरे, संस्थेचे उपाध्यक्ष राकेश तामगावे, खजिनदार भालचंद्र आठवले, सदस्य महेश जोशी, अजिंक्य हंबर, चैतन्य भोकरे, पत्रकार दिगंबर शिंदे, अभिजित गौराजे, राकेश शिंदे, अमित पिसे, अतुल पिसाळ तसेच इतर वृक्षप्रेमी व निसर्गप्रेमी उपस्थित होते.

## पन्हाळगडावर १७ रोजी 'एक सांज पन्हाळगडावर'उपक्रम

■ कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**गेली तेरा वर्षे कोल्हापूर हायकर्स फाउंडेशन आयोजित'' एक सांज पन्हाळगडावर'' हा एक अनोखा दीपोत्सवाचा उपक्रम यावर्षी १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ६:०० ते रात्री ११:०० या वेळेत पन्हाळगडावरील शिव मंदिर (सज्जा कोटी) येथे आयोजित करण्यात आला आहे.**

दरवर्षी वसुबारसच्या संध्याकाळी पन्हाळगडावर हजारो दीप प्रज्वलित करून गड उजळवण्याचा हा उपक्रम कोल्हापूर हायकर्स सातत्याने आयोजित करत आहेत. स्वराज्याचे वैभव, गडकोटांचे सांस्कृतिक महत्व आणि शिवकालीन इतिहास यांचे स्मरण जपण्यासाठी हा दीपोत्सव गेली तेरा वर्षे साजरा केला जातो. यावर्षी विशेष व्याख्यानासाठी प्रसिद्ध इतिहास संशोधक व लेखक आणि व्याख्याते इंद्रजित सावंत यांचे 'महाराणी ताराबाईसाहेबांचा दिल्लीपती औरंगजेबाशी लढा' याविषयी व्याख्यान असणार आहे. तसेच कोल्हापुरातील वीरभद्र मर्दानी आखाडा यांच्यामार्फत शिवकालीन मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक: व युद्धकला सादरीकरण होणार असून हजारो दीपांनी उजळणारा पन्हाळगडाचा मनोहारी नजारा सर्वांसाठी खुला आणि मोफत असल्याचे कोल्हापूर हायकर्स चे अध्यक्ष व कोल्हापूर डिस्ट्रिक्ट मोंटिनिअरिंग असोसिएशन सचिव सागर श्रीकांत पाटील व कोल्हापूर हायकर्सच्या परिवाराने कळविले आहे.

## रोटरी सेंट्रलच्यावतीने शिक्षकांचा सन्मान

■ कोल्हापूर,ता.१३ (प्रतिनिधी)–

**रोटरी क्लब कोल्हापूर सेंट्रलच्या वतीने टीचर्स एक्सलन्स अवॉर्ड देऊन शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते आणि क्लबचे अध्यक्ष अभिजीत भोसले यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.**

एखाद्या राष्ट्राची प्रगती होण्यासाठी अनेक घटकांचा सहभाग असणे गरजेचे असते. त्यामध्ये भावी पिढी घडविणाऱ्या शिक्षकांचे योगदान महत्त्वाचे ठरते, असे प्रतिपादन डॉ. शिंदे यांनी केले.यावेळी डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजीचे मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. सुनील रायकर, जिल्हा परिषद कावळटेक विद्यामंदिर शाळेचे शिक्षक जीवन मिठारी,सुधाताई कुलकर्णी,मिलिंद यादव, सुनिल कुदळे आणि प्रा. जयंती गायकवाड यांना गौरविण्यात आले. अध्यक्ष अभिजित भोसले यांनी क्लबच्या उपक्रमांचा आढावा घेतला.प्रास्ताविक डॉ.महादेव नरके यांनी केले. सूत्रसंचालन संदीप साळोखे यांनी केले. यावेळी सचिव निलेश पाटील, खजानिस संग्राम शेवरे यांच्यासह रोटेरीयन उपस्थित होते.

## भाजप निवडणुकांसाठी सज्ज–फडणवीस

अमरावती,ता.१३–

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शक्य आहे, तिथे महायुतीमधील मित्रपक्षांसोबत युती करण्याचे संकेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ते अमरावतीत बोलत होते.**

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संपूर्ण महाराष्ट्रात विभागनिहाय आमचे दौरे लावलेत. राज्यात लवकरच महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, नगरपंचायतीच्या निवडणुका आहेत. या निवडणुकांचा आढावा घेण्यासाठी या बैठका लावण्यात आल्या आहेत. आम्ही यापूर्वी मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण, पश्चिम महाराष्ट्र या ४ विभागांचा आढावा घेतला.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

मिळकतीचे वर्णन : मौजे हातकणंगले येथील क. ग.नं.२१० क्षेत्र १ हे. ६८ आर, आकार ३ रु. ३७ पै. यापैकी अंतिम मंजुर नकाशाप्रमाणे औद्योगिक बिगरशेती भुखंड क्र. १ याचे क्षेत्र २६३५–० चौ. मी. म्हणजेच २८३५२–६० चौ. फुट यासी चतुः सिमा पुर्वेस– प्लॉट नं.२ ची मिळकत, पश्चिमेस– गट नं.२११ ची मिळकत, दक्षिणेस– गट नं.२११ ची मिळकत, उत्तरेस– सरकारी रस्ता.

येणेप्रमाणे चतुः सिमेतील मिळकत ही मे. स्प्रूस एंटरप्राईजेस प्रा. लि. इचलकरंजी यांचे मालकी वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिलांना खरेदी देणेचे ठरवून संचकारदाखल रक्कम स्विकारुन तसे करारपत्र करुन दिले आहे. ठरलेप्रमाणे लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणेत येणार आहे. सदर मिळकत निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असलेचा निर्वाळा व कायदेशीर पणन योग्य हक्क असलेचा भरवसा मिळकत मालकांनी दिला आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही गहाण, दान, कर्ज, करार, खरेदी, बक्षीस, इजमेंट वगैरे कसलाही बोजा अगर हक्क,हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत त्याबद्दल लेखी माहिती कागदपत्रासह पटवून द्यावी. येणेप्रमाणे न केलेस असा कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध वा तक्रार नाही अथवा असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून तक्रार चालणार नाही. म्हणून प्रसिध्द केली नोटीस.

ता.१३/१०/२०२५

**ॲड.गिरीश एन.मुदगल**
**१२/१७८, काँग्रेस कमिटी मागे,**
**इचलकरंजी, मो.नं.९३२५४९३९४६**

# कुरुंदवाड पाणीपुरवठ्याचा प्रश्न लवकरच मार्गी लागणार

## आम. राजेंद्र पाटील-यड्रावकर यांची ग्वाही

■ कुरुंदवाड,ता.१३(प्रतिनिधी)–



**जनतेला दिलेल्या शब्दाप्रमाणे कुरुंदवाड शहरातील सर्वच विकास कामे मार्गी लागलेली आहेत. मात्र, गेल्या पंधरा वर्षांपासून रखडलेल्या कुरुंदवाड शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत मी खोलात जाणार नाही, मात्र हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे आणि तो येणाऱ्या काही दिवसात मीच मार्गी लावणार आहे, अशी ठाम ग्वाही आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी दिली. ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांनी करावे, पण या राजकारणात नागरिकांचे हाल होऊ देणार नाही, असेही ते म्हणाले.**

पत्रकारांशी बोलताना आमदार यड्रावकर म्हणाले, कुरुंदवाड शहराच्या उशाला दोन नद्या असूनही, पंधरा वर्षांपासून नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही ही शोकांतिका आहे. नगरोत्थान योजनेतून या प्रकल्पासाठी निधी मंजूर झाला होता, मात्र ठेकेदार आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे योजना रखडली. मी दोषारोपाच्या राजकारणात न पडता नागरिकांच्या हितासाठी या योजनेला गती देणार आहे.

ते पुढे म्हणाले, पूर्वीच्या ठेकेदाराने न्यायालयीन बाब दाखल केली आहे, त्याच्याशीही चर्चा सुरू आहे. सुधारित प्रस्ताव तयार करून तांत्रिक मंजुरी घेतली आहे. मात्र, निधीअभावी काम थांबले होते. या संदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाली असून अर्बन डेव्हलपमेंट इन्फ्रास्ट्रक्चर फंडातून सुमारे ५० कोटींची मागणी केली आहे. काही दिवसांतच प्रस्ताव मंजूर होईल आणि कुरुंदवाडकरांना पाणीपुरवठ्याचा दिलासा मिळेल.

दरम्यान, त्यांनी सांगितले की, जयसिंगपूर आणि शिरोळप्रमाणे कुरुंदवाड शहरातही भुयारी गटार योजनेचा प्रस्ताव तयार करण्याचे आदेश नगरपालिका प्रशासनाला दिले आहेत. पाणीपुरवठा आणि गटार योजना एकत्रितपणे राबविल्यास रस्त्यांची हानी होणार नाही, याची विशेष काळजी घेतली आहे.

कुरुंदवाडमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाबाबत ते म्हणाले, मी राजकारणात पडणार नाही. माझे लक्ष फक्त नागरिकांच्या प्रश्नाच्या समाधानाकडे आहे. येणाऱ्या काही दिवसांत पाणीपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लागेल आणि ही योजना मीच पूर्णत्वास नेणार आहे, असे ठाम विधान आमदार यड्रावकर यांनी केले.

जनतेला दिलेल्या शब्दाप्रमाणे कुरुंदवाड शहरातील सर्वच विकास कामे मार्गी लागलेली आहेत. मात्र, गेल्या पंधरा वर्षांपासून रखडलेल्या कुरुंदवाड शहराच्या पाणीपुरवठा योजनेबाबत मी खोलात जाणार नाही, मात्र हा नागरिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे आणि तो येणाऱ्या काही दिवसात मार्गी लावणार आहे, अशी ठाम ग्वाही आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी दिली. ज्यांना राजकारण करायचे आहे त्यांनी करावे, पण या राजकारणात नागरिकांचे हाल होऊ देणार नाही, असेही पत्रकारांशी बोलताना आमदार यड्रावकर म्हणाले.

# श्री सद्‌गुरू बहुउद्देशीय संस्थेचा दशकाहून अधिक समाजसेवेचा प्रवास

## गो-सेवा प्रकल्पाला सुरुवात

■ हुपरी,ता.१३(वार्ताहर)–

**महाराष्ट्रातील सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या श्री सद्‌गुरू बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, हुपरी यांनी समाजसेवेचा नवा अध्याय सुरू केला आहे. संस्थेच्या कार्यातील महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या पंढरपूर स्वच्छता अभियानाने नुकतेच १० वर्षांचे दैदीप्यमान पर्व पूर्ण केले आहे.**



गेले एक दशक संस्थेने आषाढी–कार्तिकी वारीसह प्रत्येक एकादशीच्या काळात चंद्रभागेचे वाळवंट आणि परिसराची स्वच्छता अविरतपणे केली. केवळ धार्मिक ठिकाणाची स्वच्छता न राखता, या अभियानातून अनेक गरजूंना सेवाप्रवाहात आणून त्यांच्या व त्यांच्या कुटुंबाचे कल्याण साधले आहे, हे या कार्याचे मोठे यश आहे. संस्था गेली अनेक वर्षे अनाथ आश्रम व वृद्धाश्रमाना मदत, माणुसकीची भिंत संकल्पनेतून गरजूंपर्यंत वस्तू पोहोचवणे, रक्तदान शिबिरांचे आयोजन आणि मंदिरे स्वच्छता अभियान असे विविध उपक्रम राबवत आहे.

संस्थेने आता भारतीय संस्कृती आणि गोसंवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. हुपरीमध्ये प्रथमच संस्थेच्या माध्यमातून स्वदेशी गाईचे गोपालन, गोपोषण आणि गोसंरक्षण करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. गोशाळेच्या बांधकामाला वेगाने सुरुवात झाली असून, हा प्रकल्प देशी गोवंश संवर्धन, शाश्वत शेती आणि पर्यावरणपूरक समाज निर्मितीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणार आहे.

रविंद्र गायकवाड, नरेंद्र गायकवाड, कृष्णात कोल्हापुरे, बाळासो जाधव, चंद्रकांत व्हटकर, सुरेश खोत, संग्राम माने, महादेव खैरे आदी निष्ठावान सेवेकरी कोणत्याही फळाची अपेक्षा न ठेवता हे कार्य पुढे नेत आहेत.

## नांदेड,नायगाव तालुक्यात भूगर्भातून आवाज

■ नांदेड,ता.१३–

**नायगाव तालुक्यातील टाकळी या गावात भूगर्भातून आवाज येऊन जमीन हादरली असल्याची माहिती ग्रामस्थांनी प्रशासनाला दिली.**

मात्र, कोणताही भूकंप नाही असा खुलासा जिल्हा प्रशासनाने केला आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये असे त्यांनी सांगितले आहे.राष्ट्रीय भूकंप विज्ञान केंद्राच्या संकेतस्थळावर तपासले असता या आवाजाची/ धक्क्याची कुठलीही नोंद झाली नसल्याचे आढळून आले. तरीही अजून सूक्ष्म अभ्यास करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अर्थ सायन्स विभागाचे प्राध्यापक डॉ. टी. विजयकुमार यांना देखील माहिती घेण्यास सांगितले आहे. या धक्क्यामुळे कुठलीही जीवित व वित्त हानी झाली नसल्याबाबत तहसीलदार नायगाव यांनी जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रास कळविले आहे.

# नशामुक्त रॅलीत पाच हजारांहून अधिक नागरिकांचा सहभाग

■ कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**रविवारी सकाळी ६:३० वाजता कोल्हापूरच्या पोलीस परेड मैदानावर रन अँड वॉक च्या माध्यमातून उत्साहाचा धबधबा अवतरला. जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या नशामुक्त भारत अभियान अंतर्गत 'नशामुक्त कोल्हापूर' या रन–वॉक रॅलीत ६ ते ६० वयोगटातील तब्बल ५ हजारांहून अधिक बालक, महाविद्यालयीन विद्यार्थी, वयोवृद्ध नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.**

या रॅलीला जिल्हाधिकारी अमोल येडगे आणि जिल्हा पोलीस अधीक्षक योगेश कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. यांनी हिरवा झेंडा दाखवत शुभारंभ केला.

या रॅलीचा मार्ग पोलीस परेड ग्राऊंड (कसबा बावडा) येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत आणि पुन्हा परत पोलीस परेड ग्राऊंड असा होता. ही दौड सर्व वयोगटांसाठी खुली आणि मोफत होती. आरोग्य, फिटनेस आणि नशाबंदीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यापूर्वी २८ सप्टेंबर रोजी अतिवृष्टीमुळे ही रॅली रद्द झाली होती,ती आज यशस्वीपणे पूर्ण झाली.रॅलीपूर्वी शाहीर डॉ.आजाद नाईकवाडी यांच्या महाराष्ट्र गीताने आणि निवेदक गायत्री कुलकर्णी यांच्या निवेदनाने स्पर्धकांचा उत्साह द्विगुणित झाला. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी कोल्हापूरच्या समृद्ध क्रीडा संस्कृतीचे कौतुक करत, युवकांनी ती जोपासावी आणि नशामुक्तीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन केले. पोलीस अधीक्षक योगेश कुमार गुप्ता यांनी रात्रीच्या मित्रांऐवजी सकाळचे मित्र जोडा असा मार्मिक सल्ला दिला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितांना नशामुक्तीची शपथ दिली.

या प्रसंगी अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे, सहाय्यक पोलीस अधीक्षक धीरज कुमार, रविकांत अडसूळ, संजय तेली, बाबासाहेब वाघमोडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.रॅलीत जिल्ह्यातील शाळा–महाविद्यालयांचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, क्रीडा व सामाजिक संघटना तसेच प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले. या रॅलीने कोल्हापूरच्या नशामुक्तीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले असून, नागरिकांमध्ये नशाबंदी आणि आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली आहे.

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन– खोतवाडी येथील गट नं. ९३ पैकी भूखंड नं. १२० क्षेत्र १२३.९७ चौ.मीची खुली मिळकत यांसी चतु:सिमा– पूर्वेस – तारदाळ–खोतवाडी मुख्य रस्ता, पश्चिमेस – सौ. शमशाद काले यांची उर्वरीत शिल्लक मिळकत, दक्षिणेस–२० फूट रस्ता व उत्तरेस– कुळवमोडे यांची मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमेतील खुली प्लॉट मिळकत.

वर नमूद मिळकत ही सौ. शमशाद मेहबुब काले, रा. सदलगा यांचे मालकी वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगून रक्कम स्विकारुन आमचे अशिलांचे लाभात करारपत्र करुन दिले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध असलेस त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

ता. १३/१०/२०२५

**ॲड. शफीक एस. मुजावर**
**५/१०००, तारदाळ,**
**ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**
**मो. नं. ९४२२४१८१४४**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना कळविणेत येते की,

जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकंणगले पैकी मौजे खोतवाडी हद्दीतील, गट नं. १०६ पैकी क्षेत्र २५६.५ चौ.मी. चे २७६० चौ.फु. ची बिगरशेती खुली जागा मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस– प्लॉट नं. ३२ ची मिळकत, पश्चिमेस– प्लॉट नं. ३५, दक्षिणेस –२० फुटी रस्ता, उत्तरेस– चौगुले, येणेप्रमाणे नमुद चतुःसिमेतील मिळकत ही श्री. ऐनुद्दीन मौलाली लाडखान व इलाई मौलाली लाडखान रा. कबनूर यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची असून त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असलेचा स्पष्ट निर्वाळा आमचे अशिल यांना देवून संचकार दाखल रक्कम स्वीकारून सदरची मिळकत कायम खुष खरेदी देणेचे मान्य केलेले आहे.

सबब नमुद मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, दावा, कुळ, अग्रहक्क वगैरे हितसंबंध तसेच हरकत असलेस त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून लेखी स्वरूपात सात (०७) दिवसाचे आत खाली नमूद पत्यावर कागदपत्रासह खात्री पटवून द्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस ता. १३/१०/२०२५

**ॲड.रियाज बी. मुल्ला**
**गाळा नं. २, राजाराम स्टेडियम जवळ, ट्रॅफिक ऑफिसच्या पाठीमागे, इचलकरंजी.**
**मो. ७२७६२३००५६**

## जाहीर नोटीस

वकीलांचे नाव ॲड.एम.एस.कुलकर्णी

**कोल्हापूर येथील में. महसुल न्यायाधिकरण यांचे कोर्टात**

टेनन्सी रिव्हिजन अपील केपी/६५/१९९३
रिव्हीजन अर्जदार

१) श्रीराम भिमय्या स्वामी गुरव वगैरे २

**विरुध्द**

१/२) सौ. मालुताई हनमंत घोरपडे रा. कोल्हापूर.
२ अ) बाबुराव ज्ञानदेव देसाई रा.हुपरी
२ ब) शामराव ज्ञानदेव देसाई रा. हुपरी
२ क) १) जयश्री सर्जेराव देसाई रा.हुपरी
२ क) २) दिग्विजय सर्जेराव देसाई, रा. हुपरी
२ क) ३) स्नेहलता सुजित माने,रा.रुकडी
२ इ) बेबी ज्ञानदेव देसाई रा. हुपरी
३ ब) सदाशिव भाऊसो देसाई रा.हुपरी
३ ड) बाबासो भाऊसो देसाई रा. हुपरी
३ इ) १) संताजी बाळासो देसाई रा.हुपरी
४ अ) हौसाबाई देवराज देसाई रा.हुपरी
५ फ) चंपाबाई विलास पाटील रा.बेळगांव
५ ग) शोभाताई कृष्णात भोसले रा.हुपरी
५ ह) सुंदराबाई यशवंत देसाई रा.हुपरी
६ ड) पुष्पलता आण्णासाहेब चव्हाण रा.रेंदाळ
६ इ) शुभांगी सुरेश देसाई रा.घोसरवाड
७ क २अ) स्मिता विशाल घोरपडे रा.शिरोळ
७ क २ ब) प्रियवर्धन विशाल घोरपडे,रा.शिरोळ
८) रमेश दत्तात्रय गुरव रा.हुपरी

रिव्हिजन वि.प.

ज्याअर्थी यातीत रिव्हीजन अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज श्री अंबाबाई देव, श्री कल्लेश्वर देव, श्री मारुती देव या देवस्थानचे हुपरी येथील गट नं. २२८,२२९,२३०/१, २३०/२, २३१, २४३, २४४या मिळकतींचे संदर्भात मुंबई कुळवहीवाट कायदा १९४८ चे कलम ८८/ब प्रमाणे दाखला मिळणेकरिता दाखल केले आहे. त्याअर्थी या जाहीरनाम्याद्वारे प्रसिध्द करणेत येते की, सदर कामातील वर नमूद रिव्हीजन वि.प. तसेच रिव्हीजन वि.प. नं. २अ) मयत व रिव्हीजन वि.प.नं.२ब) व रिव्हीजन विप नं ८) हे मयत असून मयत यांचे जर कोणी कायदेशीर वारस असतील तर त्यांनी दि. १३/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. महसुल न्यायाधिकरण, कोल्हापूर यांचे न्यायालयात स्वतः अगर वकीलांचे मार्फत योग्य त्या कागदपत्रांसह उपस्थित राहून आपले म्हणणे सादर करावे तसे न झाल्यास सदर कामी योग्य ते आदेश करणेत येतील.

शिक्का

सही
**उप–प्रबंधक**
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण
कॅम्प कोल्हापूर

**सुनावणीचे ठिकाण :– महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, कॅम्प कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात, नागाळा पार्क,कोल्हापूर.**
**दि.:–१०–१०–२०२५**

## कॅनडाच्या परराष्ट्रमंत्र्यांनी घेतली मोदींची भेट

**नवी दिल्ली,ता.१३–**

कॅनडाच्या परराष्ट्रमंत्री अनीता आनंद यांनी सोमवारी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्याशी भेट घेतली. या भेटीत द्विपक्षीय संबंधांना नवी ऊर्जा देण्यावर भर देण्यात आला.पंतप्रधान मोदी यांनी आनंद यांचे स्वागत करताना सांगितले की, त्यांचा हा दौरा भारत–कॅनडा संबंधांना नवी दिशा आणि गती देईल.

## पेपर गहाळ झालेबाबत नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. १०२५ पैकी गायरान प्लॉट नं. ४९८ ची मिळकतधारक श्री. कुमार गुरुपाद मगदूम, रा. तारदाळ हे कायदेशीर गरजा भागविणेकरीता विक्री करीत आहेत. सदर विक्रीचा व्यवहार करीत असताना अस्सल सनद शोधाशोध केली असता ती त्यांचे मानसिक स्थितीमुळे कोठे गहाळ झाली याबाबत समजून येत नाही. परंतु, श्री. कुमार गुरुपाद मगदूम हे ता. १०/ ०२/ २०२५ इ. रोजी सन्मती हायस्कूल ते तारदाळ रोडने त्यांचे दुचाकीने जात असताना सदरची सनद असलेली पिशवी गहाळ झालेली आहे. त्याबाबत शोधाशोध करुन देखील आजअखेर सदरचे सनद असलेली पिशवी अगर त्यातील सनद सापडून आले नाहीत. तरी सदरची सनद कोणाला सापडले असलेस त्यांनी त्याचा गैरवापर करु नये ही विनंती.

ता.१३/१०/२०२५

**ॲड.शफीक एस.मुजावर**
**५/१०००, तारदाळ,**
**ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.**
**मो. नं. ९४२२४१८१४४**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांचे माहितीकरीता प्रसिध्द करणेत येते की,

खालील नमूद परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **सौ.आशा राजु दाबदे,** रा. हाऊस नं. २४९, लास्ट बस स्टॉप जवळ, न्यु वाडम वास्को साऊथ गोवा यांचे स्वसंपादीत समाईक मालकी हक्काची व कब्जा वहिवाटीची मिळकत असून ती त्यांनी नोंद खरेदी दस्त नं.३३१९ ता. २३/०८/२०२२ इ. रोजीचे नोंद खरेदी दस्तान्वये श्री.गौरव प्रमोद सांगले रा. वॉर्ड नं. ९ घर नं. ३१३, इचलकरंजी यांचेकडुन कायमखुष खरेदी घेतलेली मिळकत असुन त्यानुसार त्यांचे नावाची नोंद सदर मिळकतीचे ७/१२ पत्रकी मालक कोष्टकी झालेली आहे. सौ. आशा राजु दाबदे यांनी सदरची मिळकत आमचे अशिलांना निर्वेध, निष्कर्जी व निर्जोखमी असलेचा निर्वाळा देवून आमचे अशिलांचेकडून संचकार दाखल रक्कम स्विकारून सदर मिळकती संदर्भात आमचे अशिलांचे लाभात संचकार चिठ्ठी पुर्ण करून देवून सदरची मिळकत आमचे अशिलांना कायम खुष खरेदी देण्याचे ठरविले असून त्यानुसार ठरले अटी व शर्तींची पुर्तता झालेनंतर आमचे अशिल लवकरच सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीपत्र पुर्ण करणार आहेत.

सबब,सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्कसंबंध, तारणगहाण, दान, बोजा, बक्षिस, पोटगी, दावा, चालू दावा, कुळ, इजमेंट, ॲटॅचमेंट, आरक्षण, संपादन, अग्रहक्क वगैरे हितसंबंध असलेस तो त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत खाली नमूद पत्यावर सर्व अस्सल कागदपत्रांसह –लेखी कळवावा.मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार अगर हरकत न आलेस सदरची मिळकत निर्वेध, निष्कर्जी, निर्जोखमी आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूरा करतील. मुदतीनंतर येणाया तक्रारींचा विचार केला जाणार नाही. म्हणून प्रसिध्द केली जाहीर नोटीस सही ता. १२/१०/२०२५.

**– परिशिष्ट –**

**मिळकतीचे वर्णन –** जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी व तालुका हातकणंगले, मा.सह दुय्यम निबंधकसो, श्रेणी २, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील **मौजे शहापुर** येथील **क.ग.नं.६४** क्षेत्र हे. १.२५ आर, पो.ख. क्षेत्र हे. ०.०१ आर, आकर रु.०.९५ पैसेची मिळकत च्या मिळकतीपैकी मा. उपविभागीय अधिकारीसो, इचलकरंजी विभाग इचलकरंजी यांचेकडील गुंठेवारी आदेश क्रं. गुंठेवारी/अ.आ.आ/एस.आर/६८/०७ता. २४/०५/२००४इ. रोजीचे गुंठेवारी आदेशानुसार क्षेत्र ३७१.७० चौ. मी. याचा इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी यांचेकडील उपविभागणी आदेश क्रं. जा.क्र.टी.पी/३१८७/१३–१४ ता. २१/१०/२०१३ इ. रोजीचे आदेशाप्रमाणे **भुखंड क्रं. अबकड – १** क्षेत्र १८३.८० चौ.मी. याचे १९७७.६८ चौ. फुटाची खुली प्लॉट मिळकत याची मोजमापे पुर्व बाजु– १०.४५ मी, पश्चिम बाजु – १०.४५ मी, दक्षिण बाजु – १७.९९ मी, उत्तर बाजु १७.९९ मी अशी असून यासी चतुःसिमा पूर्वेस– यड्राव हद्दीमधील श्री. शिंदे यांची मिळकत, पश्चिमेस–सरकारी रस्ता, दक्षिणेस–श्री.डुबुले यांची मिळकत, व उत्तरेस–सरकारी रस्ता. येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत त्यातील तदंगभूत वस्तूसह व इजमेंटरी हक्कासह सर्व.

**ॲड.पवनकुमार अ.उपाध्ये**
**९/६३/११, दिपश्रेय, महालक्ष्मी व्हिलेज,**
**साळुंखे मळा, आमराई रोड,**
**इचलकरंजी.मो.नं.– ९८२२४४३११७.**

# दिपावली खरेदीसाठी कोल्हापूरची बाजारपेठ नागरिकांनी गजबजली

## ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी दुकानदारांकडून विविध ऑफर जाहीर

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

.............................

**अवघ्या चार दिवसावर येऊन ठेपलेल्या दिपावली सणाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूरच्या बाजारपेठेत सणासुदीच्या खरेदीसाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली असून शहरातील सर्वच बाजारपेठा हाऊसफुल्ल झाल्या आहेत. दिपावली सणानिमित कोल्हापुर शहरातील बाजारपेठामध्ये खरेदीची मोठी उलाढाल होऊ लागली आहे. दिपावली फराळासह कपडे तसेच वाहने, इलेक्ट्रॉनिकसह संसारोपयोगी वस्तूंच्या खरेदीवर नागरिकांचा भर आहे.**



दिपावलीच्या खरेदीसाठी बाजारपेठेत झालेली नागरिकांची गर्दी.

दिपावली सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्वच दुकानदारांनी आपापल्या दुकानावर ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नवनव्या सवलती तसेच ऑफर जाहीर केल्या आहेत. दुकानांवर आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने सारं शहर प्रकाशमय बनले आहे. शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने रात्री उशिरापर्यंत सुरु ठेवल्यामुळे रात्री उशिरापर्यंत ग्राहक खरेदीसाठी बाजारपेठा गाठत आहेत. काही दुकानदारांनी तर ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नवनव्या शक्कल लढवून ऑफरची जाहिरात केली आहे. काही दुकानांमध्ये फिक्स रेट तर काही दुकानदारांनी १० टक्के , २० टक्के , ३० टक्के तर काही ठिकाणी ४० टक्के सवलत योजना जाहीर केल्या आहेत. वाहन तसेच इलेक्ट्रॉनिक्स वस्तुच्या खरेदीवर दुसऱ्या वस्तु देण्याचीही ऑफर जाहीर केली आहे.

दिवाळीच्या खरेदीसाठी नागरिक घराबाहेर पडल्याने कोल्हापूर शहर तसेच उपनगरेही गर्दीने भरली आहेत. शुक्रवारी वसूबारस, शनिवारी धनत्रयोदशी, सोमवारी नरक चतुर्दशी, मंगळवारी लक्ष्मी कुबेरपूजन, बुधवारी दीपावली पाडवा आणि गुरुवारी भाऊबीज अशा या दीपावली सणासाठी कोल्हापूरकर सज्ज झाले असून सर्वत्र खरेदीचा व दीपावलीचा फराळ तयार करण्याचा माहोल आहे. कामगार वर्गाचा बोनस होऊ लागल्याने बाजारपेठेत खरेदीसाठी तोबा गर्दी झाली आहे. रेडिमेड कपडे, इलेक्टॉनिक्स वस्तु, विद्युत रोषणाईसाठी विविधरंगी बल्ब, लाईटच्या माळा, आकर्षक आकाशदिवे, रांगोळी,पणत्या विविध प्रकारचे सेंट, अत्तर ,सुगंधी अगरबत्या,तेल, साबण, उटणे,तसेच दीपमाळाच्या खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी झाली आहे.बालचमु तर किल्ले तयार करण्यासाठी माती व अन्य साहित्यांची जमवाजमव करु लागले आहेत. सर्वत्र बालचमुंचा किलबिलाट दिसू लागला आहे. शहरातील मिठाईची दुकाने नाना प्रकारच्या मिठाईने सजली असून फराळाचे सर्व प्रकारचे पदार्थ विक्रीसाठी दुकानामध्ये ठेवण्यात आले आहेत. दीपावली सणामुळे नगरिकांनी घराघरात तसेच दुकानामध्ये आकर्षक विद्युत रोषणाई केली असल्याने सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. कोल्हापूरतील प्रमुख बाजारपेठामध्ये विशेषत: महाद्वार रोड, ताराबाई रोड,ज्योतिबा रोड,मिरजकर तिकटी, लक्ष्मीपुरी,भाउसिंगजी रोड,राजारामपुरी, शाहुपुरीसह उपनगराबरोबरच गांधीनगर बाजारपेठामध्ये तोबा गर्दी झाली आहे. एकूणच कोल्हापूरातील घरातील प्रत्येकामध्ये दीपावली सणामुळे आनंद, उत्साह आणि जल्लोष ओसंडून वाहत आहे.



क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री प्रकाश आबीटकर,व्यासपीठावर प्रमुख मान्यवर.

## सिद्धगिरी नर्सिंग इन्स्टिट्यूट येथे क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

.....................................

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक आणि सिद्धगिरी नर्सिंग इन्स्टिट्यूट, कणेरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय आंतर विभागीय निवड चाचणी क्रीडा स्पर्धा २०२५ या भव्य स्पर्धांचा समारोप उत्साहात झाला. या स्पर्धा १० व ११ ऑक्टोबर २०२५ रोजी श्री क्षेत्र सिद्धगिरी मठाच्या पावन सानिध्यात प्रारंभ झाला.**

या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन श्री. सिद्धगिरी महासंस्थान मठाचे ४९ वे मठाधिपती परमपूज्य श्री काडसिद्धेश्वर स्वामीजी आणि राज्याचे आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते झाले. प्रारंभी दीपप्रज्वलन करून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर अतिथींचा सत्कार आणि स्वागत समारंभ पार पडला. यावेळी पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी डॉ. देवेंद्र पाटील, राजकुमार पाटील, एम.डी.पाटील, विजय सनगर, यशोवर्धन बारामतीकर, गुंडोपंत वड, विवेक शेट्ये, निशांत पाटील तसेच राज्यातील विविध वैद्यकीय आणि नर्सिंग महाविद्यालयांचे शिक्षक, विद्यार्थी व क्रीडा शिक्षक उपस्थित होते. या सोहळ्याचे सूत्रसंचालन विवेक सिद्ध यांनी केले, तर डॉ. वर्षा पाटील यांनी आभार मानले.



तारदाळ येथे यशस्वी खेळाडूंचा सन्मान करताना सी.जी.तेरदाळे, पी. बी.शेट्टी, अविनाश चौगुले आदी.

## सन्मति विद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत सुयश

तारदाळ,ता.१३(वार्ताहर)

.........................

**बाहुबली विद्यापीठ संचलित सन्मति विद्यालय तारदाळ येथे १७ वर्षाखालील शासकीय मैदानी क्रीडा स्पर्धेत अनेक खेळाडूंनी सुयश मिळवले. यामध्ये श्रद्धा ठोमके हिने ३००० मीटर धावणेमध्ये प्रथम तर पंधराशे मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला तसेच अथर्व पाटील याने गोळा फेक मध्ये तृतीय क्रमांक पटकावला.**

१४ वर्षाखालील शासकीय मैदानी स्पर्धेत आरोही खोत हिने ५०० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम, संचिता जाधव हिने ४०० मीटर धावणे द्वितीय, संजीवनी विभूते हिने २०० मीटर धावणे प्रथम क्रमांक पटकावला. यशस्वी खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख अविनाश चौगुले यांच्यासह मुख्याध्यापक सी.जी.तेरदाळे ,पर्यवेक्षक पी.बी.शेट्टी व अध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.



## आंतरभारती विद्यालयात दीपावली अभ्यास पुस्तिकेचे प्रकाशन

इचलकरंजी,ता.१३

.....................

**येथील आंतरभारती विद्यालयाने सर्व विषयाचा समावेश असलेली नवीन शैक्षणिक धोरणानुसार व अध्ययन निष्पत्ती वर आधारित अशी दीपावली अभ्यास पुस्तिका तयार केली आहे.**

त्याचे प्रकाशन आंतरभारती शिक्षण मंडळ या संस्थेचे अध्यक्ष शामराव नकाते, संस्थेचे सेक्रेटरी गणपतराव फाटक,संचालिका श्रीमती भागवत, हेमंत कोडुलकर, एस.एन.पाटील यांच्या शुभहस्ते तसेच मुख्याध्यापिका सौ. व्ही.सी.फाटक, पर्यवेक्षक के. एम. कोळी, एस. एल.जाधव व सर्व संस्था पदाधिकारी यांच्या उपस्थितीत विद्यालयात करण्यात आले. यावेळी दीपावली अभ्यास पुस्तिकेचे संकल्पक एस. व्ही.नेवसे यांनी पुस्तिकेची वैशिष्ट्ये सांगितली. श्रीमती भागवत यांनी या कार्याचे कौतुक केले. मुख्याध्यापिका सौ.व्ही.सी.फाटक यांनी आभार मानले.

# कुंभार गट आगामी निवडणुका ताकदीने लढवणार

### रजनीताई मगदूम

हातकणंगले,ता.१३(प्रतिनिधी)–

.....................................

**दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार पंचगंगा साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या माध्यमातून कुंभार गटाचे कार्यकर्ते सक्रीय झाले असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हापरिषद , पंचायत समितीच्या निवडणुका ताकदीने लढवणार असल्याने कुंभार गटाच्या समर्थकांनी कामाला लागावे, असे आवाहन रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या कन्या व पंचगंगा कारखान्याच्या मा. चेअरमन रजनीताई मगदूम यांनी केले आहे.**



दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार गटाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलताना रजनीताई मगदूम, शेजारी आम.अशोकराव माने व अन्य मान्यवर.

हातकणंगले, शिरोळ, कागल व कर्नाटकातील कुंभार गटाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीचे आयोजन दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार मागासवर्गीय सुतगिरणी येथे करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या. या बैठकीस आ.डॉ. अशोकराव माने, यांची प्रमुख उपस्थिती होती .यावेळी बोलताना आ. डॉ. अशोकराव माने म्हणाले, आण्णांनी आपल्या हयातीत समाजहितासाठी एखादी मागासवर्गीय सुतगिरणी सुरु करावी अशी कल्पना सुचली होती. त्यावेळी मी स्वत: अण्णांच्या नावे सुतगिरणी सुरु करावी, असा प्रस्ताव ठेवला होता.पण अण्णांनी तो प्रस्ताव नाकारुन शिरोळ तालुका मागासवर्गीय सुतगिरणी सुरु करावी, असा ठाम निर्धार केला आणि सुरु केली.त्यांच्या निधनानंतर सुतगिरणीला दे.भ.रत्नाप्पाण्णा कुंभार मागासवर्गीय हे नाव देऊन त्यांचे स्वप्न साकार केले. यावेळी कबनूरचे अशोक पाटील यांनी, पंचगंगा निवडणुकीतील काही मुद्दे स्पष्ट केले. त्यामध्ये सभासदांचा ऊस नेला नसल्याचा,साखर कमी करण्यात आल्याचा, वारस नोंदणीचा मुद्दा नोंदवला. तसेच हातकणंगले, शिरोळ तालुका,कागल, कर्नाटकमध्ये कृती समिती नेमून या तीन मुद्द्यांना सभासदांपर्यंत पोहचवण्याचा निर्धार केला. यावेळी महादेवराव धनवडे, महादेव कुंभार, बाळासो कुंभार, रायगोंडा पाटील, शामराव कांबळे, दिलीप शेलार, बडेसाब इनामदार, राजेंद्र माने,आण्णासो मळवाडे, महावीर पाटील,सदाशिव कदम, अविनाश पाटील, पंडीत खाडे , संतोष आवटी, सुकुमार गडगे यांच्यासह दे.भ. रत्नाप्पाण्णा कुंभार प्रेमी उपस्थित होते. आण्णासाहेब शहापूरे, यांनी आभार मानले.

## अभिषेक निषाद याची निवड

कोल्हापूर,ता.१३(प्रतिनिधी)–

.............................



**कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा प्रतिभावान गोलंदाज अभिषेक निषाद याची कर्नल सी. के. नायडू ट्रॉफीसाठी २३ वर्षांखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली आहे.**

ही स्पर्धा चारदिवसीय साखळी पद्धतीने पार पडणार असून, सामने १६ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहेत.स्पर्धेत महाराष्ट्र,सौराष्ट्र, तामिळनाडू, मध्य प्रदेश,त्रिपुरा, पाँडिचेरी,आंध्र प्रदेश, दिल्ली या राज्यांचे संघ सहभागी होणार आहेत.

# सरस्वती हायस्कूलचे क्रीडा स्पर्धेत नेत्रदीपक यश

इचलकरंजी,ता.१३–

......................

**क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व क्रीडा व युवक सेवा संचालनालय कोल्हापूर व इचलकरंजी महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शूटिंग बॉल स्पर्धा १७ वर्ष मुले, मुली व १९ वर्षाखालील मुले/मुली या वयोगटात जयहिंद मंडळ, इचलकरंजी या ठिकाणी संपन्न झाल्या.**



सरस्वती हायस्कूलच्या यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे पदाधिकारी व शिक्षकवृंद.

या स्पर्धेमध्ये १९ वर्षाखालील मुलींच्या गटात प्रथम क्रमांक व १७ वर्षाखालील मुलांच्या गटात द्वितीय क्रमांक सरस्वती हायस्कूलला प्राप्त झाला. तसेच वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये १७ वर्षाखालील मुलींच्या गटात अर्पिता सवाईराम हिचा प्रथम क्रमांक व १९ वर्षाखालील गटात हतिका वास्कर हिचा प्रथम क्रमांक आला. या सर्व खेळाडूंची विभागीय स्तरावर निवड झाली आहे.

जिल्हा क्रीडा कार्यालय पुणे, जिल्हा क्रीडा कार्यालय कोल्हापूर जिल्हा परिषद व इचलकरंजी महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय योगासन स्पर्धा १४/१७/१९ वर्ष मुले / मुली या वयोगटात हत्ती चौक योग भवन या ठिकाणी योगासन स्पर्धा संपन्न. या स्पर्धेतही खेळाडूंनी यश मिळवले आहे. विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अमरसिंह माने,सेक्रेटरी शिवाजी जगताप, पृथ्वीराज माने, संस्थेचे सर्व सदस्य यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.रेखा जाधव, पर्यवेक्षक महावीर कांबळे, पर्यवेक्षक अरुण मोरे, क्रीडाशिक्षक संदीप हिरेमठ, संजय परीट, मंगेश खोत, प्रशांत शिंगाडे, सुनील दिवटणकर, उदय झपाटे, सूरज माने, संगणक विभाग, पालक विनायक वास्कर व विनायक सवाईराम,योगा कोच निलेश कागिनकर यांच्यासह राष्ट्रीय खेळाडू सन्मती सगरे, सानिका जाधव, प्रज्ञा गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.

## शिरोळ तालुक्यातील २४ गावातील पाणंद रस्त्यांना मंजुरी-आम.पाटील

जयसिंगपूर,ता.१३(प्रतिनिधी)–

.............................

**शेतकऱ्यांच्या शेतात जाण्याचा त्रास कमी करून त्यांच्या शेती विकासाला गती मिळावी, या उद्देशाने शिरोळ तालुक्यातील २४ गावांसाठी ५१ किलोमीटर पाणंद रस्त्यांना शासन मान्यता मिळाली आहे.**



ही मंजुरी मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अंतर्गत देण्यात आली असल्याची माहिती आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर यांनी दिली. शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या या योजनेंतर्गत शिरोळ तालुक्यात २४ गावे आणि हातकणंगले तालुक्यात २ गावातील ७ किमी पाणंद रस्त्यांचा समावेश आहे. याआधीही आमदार यड्रावकर यांनी शिरोळ तालुक्यासाठी ३९६ किलोमीटर पाणंद रस्त्यांना मंजुरी मिळवली होती. त्या कामांना सध्या गती मिळाली असून, आता नव्या टप्प्यात आणखी ५१ किमी रस्त्यांची भर पडली आहे.या मंजुरीबद्दल आमदार यड्रावकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि रोजगार हमी मंत्री भरतशेठ गोगावले यांचे आभार मानले आहेत.

श्रीहरी
शुक्रवार, ता.१०/१०/२०२५ पासून
दुपारी १.०० वा.
ओरिजीनल हिंदी
इचलकरंजीत प्रथमच
घरवाली
प्रौढांसाठी
सायं.४ व ७ वा.
A मिलन की मस्ती A

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १० पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
व्हॅर्च्युअल गर्ल्स
A शहरात प्रथमच * फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी
DOLBY DIGITAL PLUS 7.1
गुरुवार ता.२ पासून
अॅडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरु राहील
ऑनलाईन बुकींग bookmyshow
अधिक माहितीसाठी संपर्क : 9623150103
रोज ४ खेळ *१२ *३ *६ *९ वा.



५६ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
भाग्यरेखा
DOLBY DIGITAL
गर्दीचा २ रा आठवडा
आता पहा नवीन डॉल्बी डिजीटल साऊंड सिस्टीम मध्ये
रोज ४ खेळ *१२ *३ *६*९ वा.



कल्पना
लेजर प्रोजेक्टरसहीत
गुरुवार ता.२ पा
दु.१२ वा., दु.३ वा.
सायं.६.१५, रात्री.९.१५ वा
पहिल्या भागापेक्षाही जबरदस्त दुसरा भाग



गुरु
शुक्रवार ता. १० पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.१५*३.३०*६.३० व ९.३० वा.
महिलांच्या प्रचंड गर्दीचा २ रा आठवडा



RK CINEMA
3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070
bookmyshow


"कांतारा: चॅप्टर 1" (हिंदी)
11:00 AM, 12:30 PM
02:00 PM, 03:30 PM
06:30 PM, 09:45 PM
10:30 PM
"ट्रॉन: एरेस 3D" (हिंदी)
10:00 AM, 05:00 PM
"सनी संस्कारी की तुलसी कुमारी" (हिंदी)
07:30 PM
FOLLOW OUR SOCIAL MEDIA
चित्रपटाचा भरघोस आनंद घ्या आमच्या नवीन खाद्य प्रकारासह, खासकरून पिज्जा, पास्ता, सँडविच, गार्लिक ब्रेड आणि बरिस्ता एक्सप्रेसो कॉफी इचलकरंजीत प्रथमच

फोर्च्युन सिनेफ्लेक्स
इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow
OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क
+91 88 88 01 51 11

कांतारा २ (HIN) (U/A)
09.45am, 01.00, 02.45, 04.15, 06.00, 07.30, 09.15, 10.45pm
कांतारा २ (KANNAD) (U/A)
12.45, 04.00, 07.15, 10.30pm
ट्रॉन: एरेस (3D) (HIN) (U/A)
09.45pm
सनी संस्कार की तुलसी कुमारी (HIN) (U/A)
12.00pm
आज कांतारा चित्रपट पहा खास कमी केलेल्या दरात

# भुदरगडमधील जि.प.,पं.समिती मतदारसंघात महिलाराज

## तालुक्यातील गारगोटी,कडगाव,पिंपळगाव पुन्हा सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित

गारगोटी,ता.१३(प्रतिनिधी)–

**कोल्हापूर जिल्हा परिषदेचे सदस्य निवडण्यासाठी आज आरक्षण जाहीर करण्यात आले. भुदरगड तालुक्यातील सर्व चार जागा महिलांसाठी आरक्षित झाल्याने गेल्या सहा महिन्यांपासून शड्डू ठोकून निवडणुकीची तयारी करणाऱ्या मल्लांची मात्र आता गोची झाली आहे. आज जाहीर झालेले भुदरगड पंचायत समितीचे सभापतीपद सुद्धा सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित झाले आहे.**

आज पंचायत समितीच्या सभागृहात सदस्य पदासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले. भुदरगडच्या तहसीलदार डॉ.अर्चना पाटील यांनी हे आरक्षण जाहीर केले. प्रांताधिकारी हरेश सूळ यावेळी उपस्थित होते. कोल्हापूर जिल्हा परिषद सदस्यांसाठी आज जिल्हाधिकारी यांनी आरक्षण जाहीर केले.भुदरगड तालुक्यात जिल्हा परिषदेचे चार गट आहेत, गारगोटी, पिंपळगाव, आकुर्डे आणि कडगाव असे हे चार गट आहेत. त्यामध्ये गारगोटी गत वेळी सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित होते.यंदा या निवडणुकीसाठीही गारगोटी गट महिलांसाठी आरक्षित झाला आहे.काँग्रेसचे राहुल देसाई यांच्या पत्नी सौ. रेश्मा राहुल देसाई या गारगोटी गटाच्या प्रतिनिधित्व करत आहेत.

तालुक्यातील पिंपळगाव मतदार गट गेल्या वेळीही सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित होता, यावेळी हा गट महिलांसाठी आरक्षित झाला आहे.पालकमंत्री नाम.प्रकाश आबिटकर यांच्या भावजय व जिल्हा बँकेचे संचालक अर्जुन आबिटकर यांच्या पत्नी सौ रोहिणी अर्जुन आबिटकर हे या पिंपळगाव गटाचे प्रतिनिधित्व करत आहेत.



भुदरगड तालुक्यातील प.स.सदस्यांचे आरक्षण सोडत जाहीर करताना तहसीलदार डॉ.अर्चना पाटील, प्रांताधिकारी हरेश सूळ.

तालुक्यातील कडगाव जिल्हा परिषद गट गेल्या वेळीही सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित होता, यावेळी सुद्धा कडगाव जिल्हा परिषद गट सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षित झाला आहे.माजी आ. स्व. दिनकरराव जाधव यांच्या सुनबाई व काँग्रेसचे बिद्री साखर कारखान्याचे संचालक सत्यजित जाधव यांच्या पत्नी सौ.स्वरूपाराणी सत्यजित जाधव हे या गटाचे प्रतिनिधित्व करत आहेत. आकुर्डे जिल्हा परिसद मतदार गट गेल्या वेळी सर्वसाधारण गटासाठी होते. या गटात काँग्रेसचे जीवन पाटील प्रतिनिधित्व करत आहेत, यावेळी कूर मतदार संघ नागरिकाचा मागास प्रवर्ग महिलासाठी आरक्षित झाला आहे.भुदरगड पंचायत समिती सदस्य आरक्षण आज गारगोटी येथे पंचायत समिती सभागृहात काढण्यात आले.यावेळी माजी सभापती नंदकुमार ढेंगे,संग्राम सावंत, सुनिल निंबाळकर,पी. एस. कांबळे, अरुण शिंदे, ग्राम महसूल अधिकारी श्रीकांत पोरे,राजन शिंदे,माजी सभापती नंदकुमार ढेंगे, नायब तहसीलदार संतोष आढारी, जयंत मगदूम,मंडल अधिकारी सुरेश जंगली, प्रणाम भगले, संतोष पाटील, सरपंच बाळासाहेब जाधव, आर.एस. कांबळे, विष्णू केसरकर, सचिन पाटील,धनाजी ऐकल, तलाठी फारूक भटारे,अजित बेलवेकर, विवेक पिचड, विनायक नाईक व भुदरगड तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

**भुदरगड तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य आरक्षण**

गारगोटी–सर्वसाधारण महिला
पिंपळगाव–सर्वसाधारण महिला
कडगाव–सर्वसाधारण महिला
कूर–ना. मा. प्र.महिला

**पंचायत समिती सदस्य आरक्षण**

मडिलगे –सर्वसाधारण महिला
गारगोटी–सर्वसाधारण महिला
पिंपळगाव–ना. मा. प्र.
पुष्पनगर–सर्वसाधारण महिला
कूर–सर्वसाधारण
आकुर्डे–अनु.जात.
मठगांव–सर्वसाधारण
कडगाव–ना.मा.प्र.महिला


सांगली शहरासह लिंगनूर,कवलापूर,बेळंकी,सलगरे येथील मान्यवरांनी समित कदम यांच्या उपस्थितीत जनसुराज्यमध्ये प्रवेश केला.

## मिरज तालुक्यातील अनेकांचा जनसुराज्य पक्षात प्रवेश

मिरज,ता.१३(प्रतिनिधी)–

**मिरज येथे जनसुराज्य शक्ती पक्षात योगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली लिंगनूर, कवलापूर, बेळंकी, सलगरे, मिरज येथील प्राध्यापक, शिक्षक, युवक, पदाधिकारी कार्यकर्ते यांनी जनसुराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष समित कदम यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.**

या पक्ष प्रवेशामध्ये मिरज येथील प्रा.नवीन बिरादार, प्रा.राजन मेटकरी, प्रा.सुरेश बंडगर, लिंगनूर येथील प्रा.जितेंद्र मोरे, प्रा.सद्राया चौगुले, बेळंकी येथील प्रा.स्वप्निल कोरे, सलगरे येथील शहाजी कुंडले, कपिल कुंडले, मिरज येथील राहुल मोरे, अक्षय पवार,सलगरेचे अक्षय कुंडले, प्रवीण हाके, प्रशांत मोरे, सौरभ मोरे, शुभम गावडे, प्रणंद पाटील यांचा समावेश आहे. यावेळी सेवासदनचे सर्वेसर्वा योगेश पाटील, ज्येष्ठ नेते महादेव कुरणे,जिल्हाध्यक्ष आनंदसागर पुजारी, सांगली शहर जिल्हाध्यक्ष डॉ. पंकज म्हेत्रे, नाना घोरपडे, संजय पाटील, ताहीर शेख, राजू सपकाळे आदी उपस्थित होते.

## सहस्त्रचंडी दुर्गामाता याग सोहळ्याची सांगता

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)–

**येथील श्री पंचपाळी हौद दुर्गा माता मंदिर ट्रस्टच्या वतीने आयोजित केलेल्या सहस्त्रचंडी दुर्गा माता याग सोहळ्याची सांगता रविवारी संपन्न झाली. या यागाच्या महाप्रसाद सोहळ्यासाठी रविवारी दुपारी बारा वाजल्यापासून सातारकर भक्तांनी मंदिर परिसरात आयोजित केलेल्या भोजन मंडपात महाप्रसाद घेऊन या सोहळ्याची सांगता केली.**

ट्रस्टचे अध्यक्ष धनंजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अहोरात्र महिला स्वयंसेवक तसेच पुरुष स्वयंसेवक झटत आहेत. मंगळवार ता. १४ ऑक्टोबर रोजी कर्करोग तपासणी मोफत शिबिर तसेच विविध आजारांबाबत आरोग्य महाशिबिर,रक्तदान महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे.बुधवार ता.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा ते पाच या वेळेत रक्तदान महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

# शाहुपुरीवासियांकडून पूरग्रस्तांसाठी मदत

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)–

**सोलापूर,धाराशिव,बीड, लातूर या जिल्ह्यात शेतकरी व सर्वसामान्य माणसाचे अतिवृष्टीमुळे प्रचंड प्रमाणात झालेले नुकसान सर्वश्रुत आहे.**

असेच एक आपत्तीग्रस्त हिंगणगाव,(ता.परांडा,जिल्हा-धाराशिव) येथील आपत्तीग्रस्तांना मदत करण्यासाठी शाहूपुरी येथून स्थानिक पातळीवर आपत्तीग्रस्तांसाठी एक हात मदतीचा याप्रमाणे भारत भोसले आणि सहकाऱ्यांनी आवाहन केल्यानुसार अगदी अल्प काळात काडीपेटी पासून गव्हाचे पिठ,बेसन पिठ,तांदूळ, तूरडाळ, शेंगदाणे, साखर,तेल, चटणी,मिठ, बिस्कीट पुडे अशा स्वरुपातील प्रापंचिक साहित्यासह विद्यार्थ्यांसाठी सॅक,वह्या,पेन, पेन्सिल, खोडरबर असे शैक्षणिक साहित्य याशिवाय दिपावलीच्या पार्श्वभूमीवर पणत्या, उटणे,साबण, सुगंधी तेल तसेच ब्लँकेटस, साड्या आदी साहित्याची जमा झालेली मदत प्रत्येक बाधित कुटुंबांच्या घरी रविवारी ता.१२ ऑक्टोबर रोजी जाऊन त्यांचे हाती सुपूर्द करण्यात आली.


पूरग्रस्तांना मदत रवाना करताना उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.

शाहूपुरी माध्यमिक विद्यालयातील संस्कार वर्गाचे माध्यमातून गेले अनेक वर्षे संस्कार वर्गातील गोरगरीब विद्यार्थ्यांची दिवाळी आनंदाची व्हावी या हेतूने मुष्ठिफंड योजनेद्वारे दिवाळीचा शिधा गोळा करून त्यांना वाटप करण्यात येते. विद्यार्थ्यांनी या आपत्तीग्रस्तांच्या मदतीसाठी एक मूठ– मूठ तूरडाळ, साखर, शेंगदाणे अशा स्वरूपाचे साहित्य गोळा केले.

यावेळी सुध्दा संवेदनशील मनाने समाजातून अनेक हातांनी जवळपास १,१०,००० रुपये किंमतीचे साहित्य स्वरुपातील मदत गोळा झाली.अध्यक्ष राजेंद्रकुमार मोहिते, सौ.शोभाताई केंडे,श्रीमती वाळिंबे, सौ.माधवीताई शेटे,सेवानिवृत्त प्राचार्य प्रा. व्हि.जे. मिसाळ, प्रा.डॉ. सुजित जाधव,महेश जांभळे,सौ.पूजा घाटगे, सुरेश शेटे,राम रेवाळे, मुंबई परिसरातून विद्यालयाची माजी विद्यार्थी क्रांती गरड,शंतनु पवार,रोहण पवार आदींचा हातभार लागला.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून जि.प.शाळांची पाहणी

सातारा,ता.१३(प्रतिनिधी)–

**जिल्हा परिषद व नगरपालिकांतर्गत शाळांच्या भौतिक सुविधा तपासणीअंतर्गत सातारा तालुक्यातील, सांबरवाडी, येवतेश्वर व अंबाणी येथील जिल्हा परिषद शाळांना जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी भेट देऊन शाळेची पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी शाळेच्या भौतिक सुविधा, शिक्षणाची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला.**


विद्यार्थ्यांशी संवाद साधताना जिल्हाधिकारी संतोष पाटील.

पाहणीप्रसंगी त्यांच्या सोबत शिक्षणाधिकारी (योजना) शबनम मुजावर,बांधकाम विभागाचे उप अभियंता आकाश पाटील, पोलीस उपनिरीक्षक अनिता जगताप, शिक्षण विस्तार अधिकारी दत्तात्रय गिरी, शिक्षण विस्तार अधिकारी विजय जाधव, केंद्र प्रमुख छाया कदम आदी उपस्थित होते. पाहणी दरम्यान, शाळेच्या भौतिक सुविधा जसे की, वर्गखोल्या, स्वच्छतागृहे, ग्रंथालय आणि खेळाचे मैदान यांची समितीमार्फत तपासणी करण्यात आली. शिक्षणाच्या गुणवत्तेचा आढावा घेण्यासाठी शिक्षकांच्या अध्यापन पध्दती, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि शैक्षणिक साहित्याची उपलब्धता यांचे निरीक्षण केले. याशिवाय जिल्हाधिकारी श्री.पाटील यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या शैक्षणिक प्रगती व अडचणींबाबत माहिती घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले.

शासनाकडून शाळांना पूरविण्यात आलेल्या स्मार्ट टी.व्ही. व इतर शैक्षणिक साहित्याच्या वापराबाबत तसेच स्वच्छतागृहांची स्वच्छता व दुरुस्ती, पुरेशा पाण्याची व्यवस्था इ. बाबत सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. शैक्षणिक बाबतीतही शिक्षकांना मार्गदर्शनही जिल्हाधिकारी श्री. पाटील यांनी केले.


मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना ॲड.चिमणभाऊ डांगे.

## चिमणभाऊ डांगे राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

इस्लामपूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**कराड शहरातील शिवाजी स्टेडियम समोरील वेणूताई चव्हाण सभागृह येथे अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणीक विकास ट्रस्ट यांच्यावतीने धनगर समाज महासंघाचे प्रदेशाध्यक्ष ॲड. राजेंद्र ऊर्फ चिमणभाऊ डांगे यांना राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार सन्मानपूर्वक बहाल करण्यात आला.**

प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक ट्रस्टचे संस्थापक, अध्यक्ष प्रविण काकडे यांनी केले.याप्रसंगी डॉ. इंद्रजित मोहिते, प्राचार्य डॉ.भारत बल्लाळ, रविंद्र कोकरे,उल्लास वाघमोडे,धोंडीराम जाधव, प्रा.साहेबराव चौरे, विश्वासराव मोरे, प्रा.डॉ.मच्छिंद्र गोफणे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.पुरस्कार विरतण समारंभास अशोकराव देसाई, पांडूरंग पाटील, सुभाषराव पाटील, बजरंग कदम, डी. वाय. तांदळे, प्रकाश कणप,जयकर निकम,उमेश गावडे,अभिजित नांगरे,विजय कवठेकर, कृष्णात शेळके, अर्जुन धोत्रे, जालिंदर कोळी, सचिन देसाई, संपतराव तांदळे, रघुनाथ बोते,उमेश गावडे,महादेव वाघमोडे, शरद कोळेकर, मंगेश लवटे, एम.के.पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादीची सांगली जिल्हा कार्यकारिणी जाहीर

इस्लामपूर,ता.१३(प्रतिनिधी)–

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सांगली जिल्हा (ग्रामीण) च्या जिल्हा कार्यकारिणीला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस आम. शिवाजीराव गर्जे यांनी नुकतीच मंजुरी दिली असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सांगली जिल्हा (ग्रामीण)चे जिल्हा अध्यक्ष निशिकांत भोसले–पाटील यांनी दिली.**

या जिल्हा कार्यकारिणी कार्याध्यक्षपदी माजी आ. विलासराव जगताप, माजी आ. राजेंद्र देशमुख यांची उपाध्यक्ष पदी धैर्यशील मोरे, दत्ताजीराव पाटील, राजेंद्र वाघ, हणमंतराव कदम यांची तर सरचिटणीसपदी नरेंद्र दिक्षीत, शशिकांत देठे, तम्मनगौडा रवी–पाटील, तात्यासाहेब नलावडे यांची कोषाध्यक्षपदी रणजीत माने यांची, चिटणीसपदी राजेश लोखंडे, बळवंत मोरे, रंगराव संकपाळ, शरद पाटील, शिवाजीराव नांगरे,जितेंद्र शिंदे यांची, संघटक सचिवपदी त्र्यंबक तांदळे, मोहन पाटील, पांडुरंग पाटील, प्रफुल्ल देशमुख यांची, सदस्यपदी शशिकांत साळुंखे, राजेंद्र जाधव, दत्ताजीराव माने, प्रकाशराव पाटील, मोहन जाधव, सुरेश पवार, आदित्य देशमुख, शिवाजी सावंत, अशोक मोरे, शामराव पाटील, रावसाहेब पाटील, मुकेश जगताप, शिवाजी तोरणे,श्रीरंग कदम,भाऊसो गायकवाड, प्रमोद सावंत, नसीर मुल्ला, सहदेव कायापुरे, संभाजी पाटील, युवराज खामकर, प्रदिप शिंदे, हिम्मतखान येलूरकर, संतोष काळे आदींची निवड करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांनी 'भोगावती'ला ऊस पाठवून सहकार्य करावे

## चेअरमन प्रा.शिवाजीराव पाटील;कारखान्याचा बॉयलर अग्निप्रदीपन

भोगावती,ता.१३(प्रतिनिधी)–

**भोगावती सहकारी साखर कारखाना अडचणीतून वाटचाल करत असला तरी काटकसरीचा व पारदर्शक कारभार करत ऊस उत्पादक व कर्मचाऱ्यांना न्याय द्यायचा प्रयत्न केला आहे.**

कारखाना आर्थिकदृष्ट्या सुदृढ होण्यासाठी साडेपाच ते सहा लाख टन ऊस गाळप होणे गरजेचे आहे. कारखाना प्रगतिपथावर आणण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. त्यामुळे आगामी हंगामात आपला संपूर्ण ऊस कारखान्याला पाठवून सहकार्य करावे, असे आवाहन कारखान्याचे चेअरमन प्रा. शिवाजीराव पाटील यांनी केले. शाहूनगर परिते, (ता. करवीर )येथील भोगावती साखर कारखान्याच्या आगामी हंगामातील बॉयलर अग्निप्रदीपन समारंभप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले,कारखान्याने गेल्या


भोगावती कारखान्यात बॉयलर अग्निप्रदीपन करताना संचालक ए.डी.चौगले,संजीवनी चौगले,राहुल पाटील–सडोलीकर आदी.

वर्षी उसाची संपूर्ण बिले, तोडणी–ओढणी बिले व अन्य देणी वेळेवर भागवली आहेत. आगामी काळातही जास्तीत जास्त गाळप केल्यास कारखाना आर्थिकदृष्ट्या स्थिर होणार आहे,असे त्यांनी सांगितले.

के. बी. पाटील यांनी भोगावती कारखाना हा दोन तालुक्यांच्या विकासाचा केंद्रबिंदू असून, हा कारखाना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. प्रारंभी कारखान्याचे संचालक प्रा. ए. डी. चौगले व त्यांची पत्नी संजीवनी चौगले यांच्या हस्ते बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले. कार्यकारी संचालक सागर पाटील यांनी भोगावतीच्या प्रगतीत ऊस उत्पादक व कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले

यावेळी जि. प.चे माजी अध्यक्ष राहुल पाटील–सडोलीकर, क्रांतिसिंह पवार–पाटील, उपाध्यक्ष राजाराम कवडे, संचालक मंडळ, भोगावती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष दिगंबर मेडसिंगे, उपाध्यक्ष मोहन पाटील, सुभाष पाटील, शिवाजी भाट, प्रमोद पाटील,मारुतराव जाधव, शिवाजी तळेकर, जनरल मॅनेजर संजय पाटील, सचिव उदय पाटील, सागर पाटील, पी.डी. चौगले यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी व सभासद, जनसंपर्क अधिकारी राजेंद्र पाटील,व्हा. चेअरमन राजाराम कवडे उपस्थित होते.

## कराड दक्षिणच्या रस्त्यांसाठी १२ कोटी रूपयांचा निधी-डॉ.भोसले

कराड ,ता.१३(प्रतिनिधी)–

**कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील तब्बल २६ गावांतील ६० किलोमीटरच्या पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणास १२ कोटींच्या निधीस शासनाने मंजुरी दिली आहे. भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.डॉ.अतुल भोसले यांच्या विशेष प्रयत्नामुळे १२ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीसाठी यंत्रसामग्री शेतापर्यंत नेण्यासाठी व शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला शेतीमाल बाहेर काढण्यासाठी पाणंद रस्ते उपयोगी पडतात. कराड दक्षिणमधील अनेक गावांमध्ये पाणंद रस्त्यांचे दीर्घकाळापासून मजबुतीकरण न झाल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. विशेषतः सुगीच्या दिवसात कृषी माल बाहेर काढून बाजारात पोहचविणे, शेतीअवजारे शेतापर्यंत पोहचविणे अडचणीचे ठरत होते. त्यामुळे पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणाबाबत आग्रही भूमिका घेत, आ.डॉ.भोसले यांनी गेल्या वर्षी महायुती सरकारच्या माध्यमातून कराड दक्षिणमधील सुमारे २२७ किलोमीटरच्या पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणास मंजुरी मिळवून आणली होती. त्यास आता पुन्हा ६० किलोमीटरच्या पाणंद रस्त्यांची भर पडली आहे.

वाठार (दोन किलोमीटर), कालवडे (पाच), भुरभुशी (एक), शिंगणवाडी (एक), गोवारे (सहा), कोळे (एक), अंबवडे (दोन), येरवळे (तीन), वारूंजी (एक),शेणोली (तीन), रेठरे बुद्रुक (चार),नांदगाव ( एक), किरपे (सहा),विंग (पाच), काजरवाडी (एक),विठोबाचीवाडी (एक),बेलवडे (एक),बेलवडे बुद्रुक (चार), शेरे (एक), रेठरे खुर्द (एक), गोटेवाडी (दोन), महारूगडेवाडी (एक), मनव (एक), सवादे (तीन), बांदेकरवाडी (दोन), शेवाळेवाडी–म्हासोली(एक), म्हासोली (एक किलोमीटर) येथील रस्त्यांचा समावेश आहे.

आ.डॉ.भोसले यांनी याप्रश्नी राज्याचे रोजगार मंत्री भरत गोगावले यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता.त्याची दखल घेत कराड दक्षिणमधील २६ गावांत ६० किलोमीटरच्या पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी राज्य शासनाच्या मातोश्री ग्रामसमृद्धी शेतपाणंद योजनेतून मंजुरी दिली आहे. यामुळे शेतकऱ्यांची रानातील वाट अधिक सुकर होणार आहे.

# सीईओ नरवाडेंचा साधेपणातील आदर्शाचा परिपाठ

## रात्री ग्रामपंचायतीत मुक्काम; गावच्या विकासासाठी ग्रामस्थांशी चर्चा

भिलवडी,ता.१३(वार्ताहर)–

**अधिकारी म्हणजे फक्त शासकीय दप्तर, आदेश आणि बैठका एवढंच नव्हे , तर जनतेत मिसळून त्यांच्या भावनांचा अनुभव घेणारा खरा सेवक असावा, याचं जिवंत उदाहरण सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी घालून दिले आहे.**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पलूस तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींना भेट देताना त्यांनी कोणताही शासकीय लवाजमा न ठेवता, थेट ग्रामपंचायत कार्यालयातच रात्रीचा मुक्काम केला. कुंडल ग्रामपंचायतीत त्यांनी साधेपणाने मुक्काम करत ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधला. गावातील विकासकामे, अडचणी, शासनाच्या योजनांची अंमलबजावणी आणि लोकसहभाग याविषयी त्यांनी रात्री उशिरापर्यंत चर्चा केली.गावकऱ्यांच्या नजरेत हे दृश्य विलक्षण होतं. गावात अधिकारी मुक्काम करत असल्याचं ऐकून अनेक ग्रामस्थ रात्री उशिरापर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात जमा झाले. त्यांच्यात मिसळून, कोणताही दुरावा न ठेवता त्यांनी ग्रामस्थांच्या अडचणी समजून घेतल्या. याचवेळी नरवाडे यांनी आपल्या साधेपणाचा आणखी एक उत्तम नमुना दाखवून दिला. त्यांनी रात्रीचं भोजन क्रांतिसिंह नाना पाटील बोर्डिंगमध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांसोबत जमिनीवर बसून घेतलं. व नंतर त्यांच्याशी संवाद साधला.


भिलवडी – येथील ग्रामपंचायतीसमोर नागरिकांशी संवाद साधताना सीईओ विशाल नरवाडे.

भोजनानंतर सीईओ नरवाडे यांनी ग्रामपंचायत कार्यालयातील दहा बाय दहाच्या छोट्या खोलीत, जमिनीवर गाद्या टाकून मुक्काम केला. त्यांच्या सोबत गटविकास अधिकारी राजेश कदम आणि विस्तार अधिकारी दिनेश खाडे यांनी सुद्धा त्याच ठिकाणी मुक्काम केला.ही दृश्ये पाहून ग्रामस्थ थक्क झाले.दुसऱ्या दिवशी सकाळी नरवाडे यांनी वीरभद्र पार्श्वनाथ डोंगराजवळ श्रमदान करून वृक्षारोपण केले. ग्रामस्थासोबत स्वतः झाडे लावतानाचे दृश्य प्रेरणादायी ठरले. नरवाडे यांनी सांगितले की, समृद्ध ग्रामपंचायत म्हणजे केवळ योजनांची अंमलबजावणी नव्हे,तर पर्यावरण, शिक्षण आणि लोकसहभाग यांचा संगम आहे.या कृतीतून विशाल नरवाडे यांनी प्रशासकीय जबाबदारीसोबत लोकाभिमुखता आणि साधेपणा यांचं सुंदर मिश्रण दाखवून दिलं आहे. ग्रामविकास फक्त शासकीय बैठकीतून नव्हे, तर लोकांच्या विश्वासातून घडतो, हे त्यांनी आपल्या कृतीतून सिध्द केले.त्यांच्या या अनोख्या मुक्कामामुळे असेच अधिकारी हवेत, जे गावकऱ्यांमध्ये राहून, त्यांच्याबरोबर जेवून आणि जमिनीवर झोपून विकासाचं स्वप्न साकार करतील अशी पलूस तालुक्यातील जनतेत एक चर्चा रंगली आहे.

**ग्रामस्थांनी विकासकामांसाठी केली लोकवर्गणी जमा**

मोराळे ३५,००० रुपये, सावंतपूर ४५,००० , सांडगेवाडी ६०,०००, विठ्ठलवाडी २७,०००, घोगाव १,१०, ०००, अमनापूर ३३,०००, बांबवडे २४,५००, वाळवा १०,५०० व तावदरवाडी ३०,००० रुपये अशी वर्गणी जमा करण्यात आली.

## तहसील कार्यालयात आज सैनिक दरबाराचे आयोजन

कराड ,ता.१३(प्रतिनिधी)–

**येथील तहसील कार्यालयाच्या सभागृहात आज (ता.१४) रोजी सकाळी ११ वाजता सैनिक दरबार आयोजित करण्यात आला आहे. अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे आणि तहसीलदार श्रीमती कल्पना ढवळे असणार आहेत.**

अमृत वीर जवान अभियान समिती आणि सैनिक कक्ष, तहसील कार्यालय कराड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सैनिक दरबारात आजी–माजी सैनिक, शहीद जवानांचे कुटुंबीय, तसेच त्यांच्या कुटुंबीयांच्या विविध शासकीय अडचणी, प्रलंबित प्रकरणे आणि कल्याणकारी योजना याबाबत मार्गदर्शन व समस्यांचे निराकरण करण्यात येणार आहे.या दरबाराचा अधिकाधिक लाभ घेण्यासाठी सर्व आजी–माजी सैनिक,शहीद जवानांचे कुटुंबीय आणि त्यांचे नातेवाईक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सैनिक फेडरेशनचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत कदम यांनी केले आहे.

## सावधान! सणासुदीत तुम्ही भेसळयुक्त मिठाई तर खात नाही ना?

**देशात** सध्या दिवाळीची धूम सुरू आहे. यानिमित्त बाजारात विविध पदार्थांची रेलचेल पाहायला मिळते. खरं सांगायचं झालं तर फराळ आणि मिठाईशिवाय दिवाळी सण अपूर्णच आहे. मात्र आजकाल आपण बातम्या ऐकतो की, खाद्यपदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत आहे. आता तर देशी तूप आणि शुद्ध मावा मिठाईतही भेसळ आढळून येत आहे, जी तुमच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकते. जर सणासुदीच्या काळात तुम्हाला भेसळयुक्त मिठाई ओळखायची असेल तर आम्ही तुम्हाला अशा काही ट्रिक्स सांगत आहोत, ज्याच्या मदतीने तुम्ही घरच्या घरी बनावट मिठाईची चाचणी करू शकता.

भेसळयुक्त तूप आणि मिठाईची प्रकरणे एकापाठोपाठ एक उघडकीस आली, त्यामुळे लोकांची चिंता वाढली आहे. सध्या



देशभरात दिवाळीचा उत्साह पाहायला मिळतोय. सणाच्या निमित्ताने सगळीकडे जल्लोष असला तरी दरवर्षी असे काही ना काही घडते, ज्यामुळे उत्सवाची रंगत बिघडते. यंदा भेसळयुक्त खाद्यपदार्थ हे काम करत आहेत. भेसळयुक्त मिठाई तुमचे आरोग्य बिघडू शकते. जाणून घेऊया खऱ्या आणि भेसळयुक्त मिठाई ओळखण्याची योग्य पद्धत.

खव्याची खरी-खोटी मिठाई कसं ओळखाल?

दुधापासून बनवलेल्या बहुतेक मिठाई खव्यापासून बनवल्या जातात आणि दुधापासून बनवलेल्या ड्राय फ्रूट्सपासून बनवल्या जातात. यामध्ये स्टार्च किंवा सिंथेटिक दुधाची भेसळ असते. या मिठाईची चाचणी घेण्यासाठी तुम्हाला थोडासा खवा गोड हातात घेऊन दाबावा लागेल. खवा खरा असेल तर दाणेदार दिसेल, तर स्निग्ध वाटल्यास खवा नकली आहे. म्हणजे तुम्ही खरेदी केलेली मिठाई ही भेसळयुक्त खव्यापासून बनवण्यात आलीय. दुसरा मार्ग म्हणजे खव्याचा तुकडा पाण्यात टाकूनही तुम्ही त्याची चाचणी करू शकता. यासाठी तुम्हाला गरम पाण्यात खवा टाकून २ मिनिटे थांबावे लागेल. खवा खरा असेल तर तो पाण्यात विरघळतो आणि त्याचे फॅट्स वर तरंगतात. खवा बनावट असेल तर पाण्यात फेसाचा थर तयार होतो.

छेना आणि पनीर मिठाई

रसगुल्ला आणि रसमलाई यांसारखी मिठाई छेनापासून बनवली जाते, त्यात भेसळ होऊ शकते. हे तयार करण्यासाठी सिंथेटिक दूध देखील वापरले जाते. या मिठाईंना न्याय देण्यासाठी तुम्हाला रसगुल्ल्याचा पोत पाहावा लागेल. जर गोड दाणेदार, मऊ आणि तोंडात विरघळत असेल तर ते खरे आहे. बनावट मिठाई रबरी आणि कडक असतात. बनावट मिठाईच्या पाकातही फरक असतो. पाकातून रसगुल्ला काढून तो पिळून घ्या, असे केल्याने पाकाचा रंग स्पष्ट राहिला तर गोड खरा आहे, तर बनावट मिठाईच्या पाकाचा रंग थोडा वेगळा असू शकतो.

देशी तूपाची खरी किंवा खोटी मिठाई कशी ओळखाल?

लाडू, बालुशाही यासारखे गोड पदार्थ देशी तुपात बनवले जातात. तुपातील भेसळीच्या कथा खूप जुन्या आहेत. या मिठाई बनवण्यासाठी बनावट देशी तूप किंवा पाम तेल वापरले जाते. या मिठाईला तुम्ही गॅसवर थोडे गरम करा, खरे देशी तूप लगेच वितळेल आणि त्याचा सुगंधही येऊ लागेल. त्याच वेळी, वनस्पती तेलात मिठाई गरम केल्याने एक अप्रिय गंध निर्माण होईल. याशिवाय भेसळयुक्त मिठाईवर केशर आणि चांदीच्या कोटींगसह कृत्रिम रंगांचाही वापर केला जातो. हे तपासण्यासाठी तुम्हाला चांदीचे कोटींग हातात घासून तपासाव्या लागतील, जर चांदी तुटून पावडरमध्ये बदलली तर ती खरी आहे. भेसळयुक्त असल्यास क्लिपिंग्ज फॉइल पेपर असतात, जे गोलाकार आकारात येतात.

## आरोग्यदायी अशी आनंदी दिवाळी







**आपली** दिवाळी आरोग्यदायी व आनंदाची जावो. पेशन्ट साठी दिवाळीनिमित्त काही वैद्यकीय सल्ले .

१. दिवाळीत तुमचे नेहमीचे डॉक्टर सुट्टीवर जाण्याची शक्यता असते. पर्यायी डॉक्टरांना भेटण्याची गरज पडल्यास पेशन्टची सगळी वैद्यकीय कागदपत्रं, रिपोर्ट आणि औषधं सोबत घेऊन जा. नवीन डॉक्टरांना पेशन्टची जास्तीत जास्त माहिती मिळणं आवश्यक आहे. काही ॲलर्जी असल्यास नवीन डॉक्टरांना आवर्जून सांगा.

२. दिवाळी आणि सुट्ट्या ह्यामुळे तुचमे महत्वाचे वैद्यकीय निर्णय पुढे ढकलू नका. काही तपासण्या, डॉक्टरांच्या भेटी तसंच काही उपचार हे लवकर केल्याने फायदा होतो. त्यांच्यासाठी थोडा वेळ खर्ची पडला तरी त्यामुळे बराच त्रास वाचू शकतो. सणाच्या नावाखाली आरोग्याकडे दुर्लक्ष झाले असे व्हायला नको.

३. सुट्टीत गावी जाताना तुमची औषधं, तसंच औषधाच्या चिठ्या(प्रिस्क्रिप्शन) सोबत घेऊन जा. नेहमीची औषधं घ्यायची राहून गेल्यामुळे कधीकधी गंभीर त्रास होऊ शकतो. उदा: मधमेहाची औषधं न घेतल्यामुळे एका दिवसातही रक्तातील साखर अनियंत्रित होऊ शकते. बाहेरगावी तमची नेहमीची औषधं मिळण्यास त्रास होऊ शकतो. अशा वेळी औषधं आणि प्रिस्क्रिप्शन सोबत असणं उपयोगी पडते. पर्यायी औषधं घेणं सुद्धा यामुळे सोपं होतं.

४.डायबेटिसच्या पेशंटना ह्या काळात आहाराविषयी जास्त जागरूक राहण्याची गरज असते. गोड पदार्थांशिवाय इतर पदार्थही जास्त कॅलरी असलेले असू शकतात. हे पदार्थ टाळावे. वजन वाढणे आणि डायबेटिस अनियंत्रित होणे हे वाईट. आपण आपल्या आजूबाच्या मधुमेही रुग्णांना खाण्यासाठी आग्रह करू नये. त्यांची पथ्ये पाळण्यासाठी मदत करावी. सणाच्या काळातही मधुमेहींनी आहाराची पथ्ये आणि व्यायाम नेहमीसारखाच ठेवावा. मधुमेहाशिवाय लठ्ठपणा, हृदयविकार इत्यादी आजारांमध्ये आहाराची पथ्ये पाळणाऱ्यांसाठी हा परीक्षेचा काळ असतो.

५. दम्याच्या बऱ्याचशा पेशन्टना ह्या काळात त्रास होतो. वातावरणातला बदल तसेच फटाक्यांमुळे होणारा धूर ह्याने दम्याची उबळ येऊ शकते. धुरापासून दूर राहून प्रतिबंध होण्यास मदत होते. त्याचप्रमाणे दम्याची औषधे सुरु करून दमा नियंत्रणात आणल्यास उबळ येण्याची शक्यता/भरती करावं लागण्याची शक्यता कमी होते.

६.फटाक्यांनी होणाऱ्या दुर्घटना टाळता येण्यासारख्या असतात. लहान मुलांनी फटाके उडवताना मोठ्यांनी सोबत असणे आवश्यक आहे. अशा वेळी मोठ्यांनी पूर्ण लक्ष (मोबाईल मध्ये लक्ष न ठेवता) मुलांकडे ठेवावे. अशा वेळी फटाके काळजीपूर्वक कसे उडवायचे व काय करू नये हे मुलांना सांगावे. फटाक्यांमुळे होणाऱ्या अपघाताने मुलांच्या पुढील आयुष्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. रुग्ण , जेष्ठ नागरिक व लहान मुले ह्यांना मोठ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे खूप त्रास होतो. त्यांना त्रास होऊ नये ही आपली जबाबदारी आहे हे मुलांना समजावणे व ह्या जाबाबदारीत त्यांना सहभागी करणे ह्याची आपल्याला एक संधी ह्यावेळी मिळते. सुरक्षित पद्धतीने आगपेटी व दिवे कसे वापरायचे हे लहान मुलांना व्यवस्थित शिकवणे सुद्धा आवश्यक आहे.

## किडनी होईल मुळांपासून स्वच्छ



धावपळीच्या जीवनशैलीमुळे हल्ली लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं गंभीर आजारांची लागण होत आहे. शरीरात होणाऱ्या बदलांकडे वेळीच लक्ष न दिल्यामुळे आरोग्याला हानी पोहचते. मधमेह, उच्च रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, फॅटी लिव्हर आणि किडनीसंबंधित गंभीर समस्या उद्भवू लागल्या आहेत.किडनी स्टोन झाल्यानंतर ओटीपोटात वेदना होणे, पोटात दुखणे, लघवी करताना जळजळ, पाठ दुखणे, अचानक पोटदुखी, श्वास घेण्यात त्रास, शरीरात थकवा इत्यादी लक्षणे शरीरात दिसून येतात. हल्ली किडनी स्टोनची समस्या वाढ लागली आहे. अशावेळी मेडिकलमधील पेनकिलर गोळ्यांचे सेवन केले जाते. पण पेनकिलरच्या गोळ्या वारंवार खाल्ल्यामुळे किडनी निकामी होते. आज आम्ही तुम्हाला किडनीमध्ये साचून राहिलेले खड्डे बाहेर काढून टाकण्यासाठी कोणत्या ड्रिंकचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या ड्रिंकचे नियमित सेवन केल्यास किडनीमधील विषारी घटक बाहेर पडून जातील शरीर कायमच हायड्रेट ठेवण्यासाठि भरपूर पाण्याचे सेवन करावे. पाण्याच्या सेवनामुळे शरीरातील विषारी घटक बाहेर पडून जातात आणि शरीर डिटॉक्स होते. किडनीमधील स्टोन विरघळवण्यासाठी भरपूर पाणी प्यावे. यामुळे लघवीवाटे किडनी स्टोन बाहेर पडून जातो. तसेच मिनरल्स विरघळतात आणि स्टोन कमी होतो.

विटामिन सी युक्त लिंबाच्या रसाचे सेवन केल्यामुळे शरीरातील घाण बाहेर पडून जाते. किडनीतील मिनरल्स आणि क्षार बाहेर काढन टाकण्यासाठी उपाशी पोटी लिंबाच्या रसाचे सेवन करावे. लिंबू सरबत नियमित प्यायल्यास किडनीमधील स्टोन विरघळून जाईल.

दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी डाळिंबाच्या रसाचे किंवा डाळिंबाचे दाणे खावेत. डाळिंबातील अँटीऑक्सिडंट्स लघवीमधील क्रिस्टल्स कमी करून टाकतात. याशिवाय नव्याने स्टोन होऊ नये म्हणून शरीराचा बचाव करतात. वारंवार पोटात वेदना होत असतील तर सकाळी उठून नियमित डाळिंबाच्या दाण्यांचा रस प्यावा. याशिवाय डाळिंब खाल्ल्यामुळे शरीरातील लोहाची कमतरता भरून निघते आणि आरोग्य सुधारते.

## ह्रुमाटॉइड आर्थ्रायटिसचे लवकर निदान होणे का आहे महत्वाचे?



**ऑस्टिओआर्थ्रायटिस** या व्याधीला बरेचदा वेअर-अँड-टेअर आर्थ्रायटिस असे म्हटले जी वाढत्या वयामुळे जडते, ह्रुमाटॉइड आर्थ्रायटिस मात्र खूप वेगळे आहे. RA ही एक क्रॉनिक ऑटोइम्युन स्थिती आहे व २०२१ च्या अहवालानुसार भारतातील १.३ कोटी लोकांना ती प्रभावित करते. या स्थितीमध्ये, तुमच्या शरीराची संरक्षक यंत्रणा जिची रचना सामान्यत: संसर्गांशी लढा देऊन त्यांना दूर ठेवण्याच्या दृष्टीने करण्यात आलेली असते. ती चुकून आपल्याच निरोगी उतकांवर हल्ला करते. RA मध्ये हा हल्ला सायनोव्हियमवर म्हणजे सांध्यांची हालचाल सहजतेने होऊ देणारे द्रव तयार करणाऱ्या सांध्यांच्या मऊ अस्तरावर केंद्रित असतो.

रोगप्रतिकार यंत्रणेच्या या चुकीच्या प्रतिसादाच्या परिणामी दीर्घकाळ दाहकारक स्थिती राहते, ज्यामुळे वेदना होतात, सूज येते व स्नायंत ताठरपणा येतो. कालांतराने, या आजारामुळे कूर्चा व हाडांचे नुकसान होऊ शकते व उपचार न केल्यास इतर अवयवांवरही याचा परिणाम होऊ शकतो. इतकेच नव्हे, तर लवकरात लवकर आणि परिणामकारक उपचार मिळाले नाहीत तर त्यामुळे सांध्यांचे कायमचे नुकसान होऊ शकते व अपंगत्व येऊ शकते.

भारतामध्ये, विशेषत: ३० ते ६०(४) वर्षांदरम्यानच्या वयोगटातील, या आजाराने मोठ्या प्रमाणात बाधित होणाऱ्या महिलावर्गामध्ये RA विषयी अधिक जागरुकता येण्याच्या गरजेबद्दल तज्ज्ञांकडून, विशेषत: ह्रुमॅटोलॉजिस्ट्सकडून चिंता व्यक्त केली जात आहे. वाढता प्रादुर्भाव असूनही RA ची पुरेशी दखल घेतली जात नाही व त्यावर पुरेसे उपचार केले जात नाहीत. यामुळे अपरिवर्तनीय हानी होऊ शकते आणि लवकर निदान न झाल्यास अपंगत्व येऊ शकते.

कन्सल्टन्ट ह्रुमॅटोलॉजिस्ट डॉ. शैलजा सबनीस म्हणाल्या, RA हा एक ऑटोइम्युन आजार आहे, जिथे शरीर स्वत:च्याच सांध्यांवर हल्ला चढविते. यामुळे कायमस्वरूपी नुकसान होऊ शकते, आणि म्हणूनच हा आजार बळावण्याची गती धीमी करण्यासाठी व वेदनांपासून आराम मिळण्यासाठी लवकर निदान होणे आणि उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. हा आजार बहुतेकदा कळेल न कळेल अशा पद्धतीने सुरू होतो. म्हणूनच सुरुवातीच्या टप्प्यावर RA ची ओळख पटणे आव्हानात्मक ठरू शकते. सकाळच्या वेळी ४५ मिनिटांहून अधिक काळ सांध्यांमध्ये ताठरपणा राहणे, सांध्यांना सतत सूज येणे, अकारण अंगात कणकण राहणे आणि थकव्याने गळून गेल्यासारखे वाटणे असे रेड फ्लॅग्ज दिसले तर ताबडतोब वैद्यकीय मूल्यमापन करून घ्यायला हवे.

## दातांमधील कीड कशी काढावी





**जर** दातांमधील कॅव्हिटी ही सुरुवातीच्या किंवा मध्यवर्ती टप्प्यात असेल तर त्यावर नैसर्गिकरित्या उपचार करता येतात. जर दातांची पोकळी खूप खोलवर असेल तर काही भाग पूर्णपणे बरे होऊ शकत नाहीत, परंत बहुतेक प्रकरणांमध्ये, पुन्हा चांगले दात करणे हे शक्य आहे, असे प्रसिद्ध अमेरिकन डॉक्टर ॲक्स यांचे म्हणणे आहे. तज्ज्ञांच्या मते, रासायनिक उपचारांशिवाय कॅव्हिटी बरी होऊ शकते. डॉक्टरांनी नैसर्गिकरित्या दातांच्या कीड असण्यावर उपचार करण्याचे काही मार्गदेखील सचवले आहेत.

कोणते आहेत हे उपाय आपण जाणून घेऊया.

अतिरिक्त साखर खाणे टाळा

तुमच्या आहारातून जास्तीचे अनहेल्दी असणारे धान्य आणि प्रक्रिया केलेली साखर काढून टाका. धान्यांमधील फायटिक -Acid शरीराला कॅल्शियम, लोह आणि खनिजे शोषण्यापासून रोखते. तसंच अतिरिक्त साखर तुम्हाला वेगवेगळ्या आजाराला निमंत्रण देण्यास भाग पाडते. याशिवाय दातांवर साखरेचा परिणाम लवकर होतो आणि कॅव्हिटीचा त्रास अधिक वाढू शकतो. त्यामुळे आपल्या आहारातून याचा वापर काढून टाकावा

स्प्राऊट्स वा फर्मेंटेड पदार्थ खा

डॉक्टरांनी सल्ला दिला की जर तुम्ही धान्य खाल्ले तर फक्त अंकुरलेले किंवा आंबवलेले धान्य निवडा. या अशा अन्नामध्ये फायटिक ॲसिडचा समावेश नसतो, ज्यामळे शरीराला पोषक तत्वे शोषणे सोपे होते. नाश्त्यामध्ये अंकुरित धान्य खाण्याने फायबर अधिक प्रमाणात मिळते आणि दातदेखील मजबूत राहण्यास मदत मिळते. फर्मेंटेड पदार्थांमळे दातांमध्ये कीड जमा होत नाही. प्रोसेस्ड शुगर खाणे टाळा

प्रक्रिया केलेली साखर अर्थात प्रोसेस्ड शुगर दातांसाठी सर्वात हानिकारक आहे, कारण ती तोंडात बॅक्टेरियाची वाढ वाढवते, ज्यामळे पोकळी निर्माण होते. कच्चा मध दातांसाठी सुरक्षित आहे. ब्लूबेरी, रास्पबेरी आणि सफरचंद यांसारखी फळे कमी प्रमाणात खाणेदेखील दातांसाठी फायदेशीर आहे.

आवश्यक विटामिन्स आणि मिनरल्स

मजबत आणि निरोगी दातांसाठी व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन के, कॅल्शियम आणि मॅग्नेशियम आवश्यक आहेत. हे पोषक घटक तुम्हाला शेळीच्या कच्च्या दुधापासून किंवा शेळीच्या दुधाच्या आंबवलेल्या दह्यामधून मिळू शकतात. यांचा तुम्ही आपल्या आहारामध्ये समावेश करून घेतल्यास फायदा मिळू शकतो.

प्रोबायोटिक्स खावे

प्रोबायोटिक्स हे चांगले बॅक्टेरिया आहेत जे तोंडातील वाईट बॅक्टेरिया मारतात. तमच्या आहारात दही, केफिर, सॉकरक्रॉट, किमची आणि सफरचंद सायडर व्हिनेगर सारखे आंबवलेले पदार्थ समाविष्ट करा. याचा आपल्या आहारातील समावेश दातांचा काळजी घेण्यास उपयक्त ठरतो. दातांमध्ये जास्त प्रमाणात कॅव्हिटी होत नाही.

## हिवाळ्यात थंड पाण्याची अंघोळ करणे शरीरासाठी योग्य की अयोग्य?

**राज्यासह** संपूर्ण देशभरात सगळीकडे पावसाचा जोर कमी झाला आहे. राज्यात पडलेल्या मसळधार पावसामळे काही ठिकाणी पूर देखील आला होता. मात्र आता पाऊस ओसरून थंडी पडण्यास सरुवात झाली आहे. हलकीशी थंडी सगळीकडे जाणवू लागली आहे. थंडीच्या दिवसांमध्ये अनेकांना अंघोळ करण्याचा खूप जास्त कंटाळा येतो. अशावेळी गरम पाण्याची अंघोळ केल्यास हलकासा उबदारपणा जाणवू लागतो. पण काहींना वर्षाच्या बाराही महिने थंड पाण्याची अंघोळ करण्याची सवय असते. पाऊस असो वा थंडी सर्वच ऋतूंमध्ये थंड पाणी अंगावर घेतले जाते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला हिवाळ्यात थंड पाण्याची अंघोळ करणे योग्य की अयोग्य? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. दैनंदिन जीवनात फॉलो केलेल्या चुकीच्या सवयी शरीराचे गंभीर नकसान करतात. त्यामळे थंड पाण्याची अंघोळ करताना खूप जास्त विचार करावा.



आपल्यातील अनेकांना वर्षाच्या बाराही ऋतूंमध्ये थंड पाण्याने अंघोळ करण्याची सवय असते. ही सवय शरीरासाठी लाभदायी ठरते. थंड पाण्याची अंघोळ केल्यामुळे शरीराचे रक्तभिसरण सधारण्यास मदत होते. याशिवाय अनेक लोक आइस बाथ सद्धा घेतात. आइस बाथ घेतल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. शरीरात वाढलेला मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते.याशिवाय शरीराला आराम मिळन स्नाय रिलॅक्स होण्यास मदत होते. त्यामळे महिन्यातून एकदा तरी आइस बाथ घ्यावा. मानसिक तणावापासन सटका मिळवण्यासाठी आणि शरीराची रोगप्रतिकारशक्ती मजबत करण्यासाठी थंड पाण्याने अंघोळ करावी.थंड पाण्याने नियमित अंघोळ केल्यास शरीराचे रक्तभिसरण सधारण्यास मदत होते. याशिवाय रक्तप्रवाहात कोणतेही अडथळे निर्माण होत नाहीत. केसांच्या निरोगी आरोग्यासाठी थंड पाणी अतिशय गुणकारी आहे. गरम पाण्याने केस धतल्यास केसांमधील नैसर्गिक ओलावा कमी होऊन जातो,ज्यामळे केस अतिशय निस्तेज आणि कोरडे होतात. त्यामळे केस धवण्यासाठी गरम पाण्याचा वापर अजिबात करू नये. थंड पाण्याने केस स्वच्छ करावेत. थंड पाण्याची अंघोळ केल्यामळे एंडॉर्फिन हार्मोन रिलीज होतात, ज्याचे शरीराला असंख्य फायदे आहेत.थंड पाण्याने अंघोळ केल्यानंतर काहींना लगेच सर्दी, खोकला किंवा ताप येतो. त्यामळे थंड पाण्याची अंघोळ करताना शरीराची काळजी घ्यावी. हृदयविकार किंवा उच्च रक्तदाबाच्या समस्येने त्रस्त असलेल्या लोकांनी चकूनही थंड पाण्याची अंघोळ करू नये.

यामळे रक्तदाब आणखीनच वाढून हृदय आणि मेंदूला हानी पोहचण्याची शक्यता असते. अचानक कोणत्याही वेळी थंड पाण्याची अंघोळ केल्यास शरीराला शॉक बसू शकतो, ज्यामळे शारीरिक आणि मानसिक आरोग्याला हानी पोहचू शकते.

## बीटचा रस पोटासाठी उपयुक्त!

**शरीर** कायमच निरोगी राहण्यासाठी अनेक गोष्टी केल्या जातात. आहारात पौष्टिक पदार्थांचे सेवन, व्यायाम, ध्यान, भरपूर पाण्याचे सेवन इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात. पण बऱ्याचदा धावपळीच्या जीवनशैलीमळे शरीराची काळजी घ्याल जास्त वेळ मिळत नाही. सतत काम करत राहिल्यामळे आरोग्य पूर्णपणे बिघडून जाते. धावपळीच्या जीवनशैलीत शरीराची काळजी घेण्यासाठी सकाळी उठल्यानंतर नियमित एक ग्लास बीटच्या रसाचे सेवन करावे. बीटचा रस प्यायल्यास शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात आणि आरोग्य सधारते. बीटचा रस आरोग्यासाठी वरदान आहे. यामध्ये लोह, फॉलिक ॲसिड, मॅग्नेशियम, पोटॅशियम, जीवनसत्त्व सी, फायबर तसेच अँटी ऑक्सिडंट्स इत्यादी अनेक घटक आढळून येतात. त्यामळे सकाळी उठल्यानंतर नियमित एक ग्लास बीटचा रस प्यायल्यास आतड्यांमध्ये साचलेली घाण बाहेर पडून जाईल आणि शरीर स्वच्छ होईल.

लहान मलांपासन अगदी मोठ्यांपर्यंत अनेकांना बीटचा रस प्यायला अजिबात आवडत नाही. अशावेळी तम्ही मलांना बीटची भाजी, सॅलड किंवा सरबत बनवून पिण्यास देऊ शकता. यामळे मलांच्या शरीराला भरपूर पोषण मिळेल. बीटचा रस प्यायल्यामळे शरीराची ताकद वाढते आणि रक्त शुद्ध होण्यास मदत होते.



शरीरात निर्माण झालेली रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी नियमित बीटच्या रसाचे सेवन करावे. यामळे नवीन रक्तपेशी तयार होण्यास मदत होते आणि आरोग्य सधारते. हिमोग्लोबिनची पातळी कमी झाल्यानंतर शरीरात सतत थकवा, अशक्तपणा जाणवू लागतो, अशावेळी उपाशी पोटी महिनाभर नियमित बीटचा रस प्यायल्यास शरीराला भरपूर ताकद आणि शक्ती मिळेल.

बीटचा रस केवळ आरोग्यासाठीच नाहीतर त्वचा आणि केसांसाठी सद्धा प्रभावी ठरतो. अँटी ऑक्सिडंट्स आणि विटामिन सी त्वचेमध्ये जमा झालेली घाण बाहेर काढून टाकण्यास मदत करतात. यामळे त्वचेवर चमकदार ग्लो येतो आणि चेहरा अतिशय संदर दिसतो. चेहऱ्यावर वाढलेले पिंपल्स कमी करण्यासाठी बीटचा रस प्यावा. यामळे त्वचेवर वाढलेला काळे डाग, पिगमेंटेशन आणि त्वचेच्या इतर सर्वच समस्यांपासून आराम मिळतो. केस गळणे, केसांमध्ये वाढलेला कोंडा आणि केसांच्या इतर सर्वच समस्यांपासन आराम मिळवण्यासाठी बीट, गाजर आणि सफरचंद रस प्यावा.शरीरात साचन राहिलेले घाणेरडे कोलेस्ट्रॉल हृदयाला हानी पोहचवते. रक्तवाहिन्यांमध्ये कोलेस्ट्रॉल जमा झाल्यानंतर कोणत्याही क्षणी हार्ट अटॅक किंवा हार्ट स्ट्रोक येण्याची शक्यता असते. त्यामळे बीटचा रस नियमित प्यायल्यास शरीरात जमा झालेली घाणेरडे कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होईल. यामध्ये असलेले नायट्रेट्स रक्तवाहिन्या स्वच्छ करते. शरीराची ऊर्जा वाढवण्यासाठी खेळाडू नियमित बीटच्या रसाचे सेवन करतात. यामध्ये असलेल्या फायबरमळे पचनक्रिया सधारते आणि कधीच बद्धकोष्ठतेचा त्रास होत नाही.

# यशवंत गैरव्यवहार प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे ?

कराड,ता.१३ (प्रतिनिधी )–

**यशवंत सहकारी बँकेत झालेल्या ११२ कोटींहून अधिकच्या गैरव्यवहारप्रकरणी ठेवीदारांचे जबाब नोंदवण्याचे काम पोलिसांनी सुरू केले आहे. त्यामुळे ठेवीदारांच्या हिताचे संरक्षणाच्या कायद्यानुसार पुढील कारवाई होण्याची शक्यता आहे. हा गुन्हा १०० कोटींहून अधिक रकमेचा असल्यामुळे तो आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याच्या हालचाली पोलिसांनी सुरू केल्या आहेत.**

राज्य सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकरसह ५० जणांवर येथील यशवंत बँकेमध्ये ११२ कोटींहून अधिकच्या अपहाराचा गुन्हा रात्री दाखल झाला. याची फिर्याद शासकीय लेखा परीक्षक मंदार देशपांडे यांनी दिली आहे. देशपांडे यांनी ३१ मार्च २०२५ अखेर लेखापरीक्षण केले. यामध्ये २०२५ पूर्वीच्या कालावधीचेही लेखापरीक्षण करण्यात आले. त्यात चरेगावकर यांच्यासह संबंधितांनी बंद खाती कार्यान्वित दाखवून त्यासाठी बोगस कागदपत्रे तयार करणे, बोगस कर्ज प्रकरणे करणे, दस्तऐवजांत फेरफार व खोट्या नोंदी तयार करणे यासह अन्य अपहाराचा ठपका ठेवण्यात आला आहे. अपहाराचा गुन्हा १०० कोटींहून अधिक रकमेचा असल्यामुळे याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने पोलीस अहवाल तयार करत आहेत. त्याची प्रक्रिया सुरू झाल्याचे खात्रीशीर वृत्त आहे.

९ ऑगस्ट २०१४ ते ३१ मार्च २०२५ या दरम्यान यशवंत बँकेचे अध्यक्ष, कर्मचारी व संचालकांनी स्वत:च्या आर्थिक लाभासाठी बँकेचे आर्थिक नुकसान केले. परस्पर संगनमताने ११२ कोटी १० लाख ५७ हजार ४८१ एवढ्या रकमेचा त्यांनी अपहार केला. त्यासाठी बोगस कर्ज प्रकरणे करून या प्रकरणांसाठी खोटी व बनावट कागदपत्रे तयार केली. कर्जास तारण न घेता हेतुपुरस्सर कर्ज वितरण करून जुनी थकीत खात्याद्वारे निधीचा उद्देशबाह्य विनियोग करून तृतीय पक्षांकडे निधी वळवला. दस्तऐवजांत फेरफार व खोट्या नोंदी तयार करून बँकेच्या निधीचा गैरविनियोग करून अपहार केल्याचे लेखापाल देशपांडे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. त्यामुळे हेप्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याच्या हालचाली सुरू आहेत.



## चौंडेश्वरी सहकारी सूतगिरणीतर्फे वार्षिक लाभांश वाटप उत्साहात

इचलकरंजी,ता.१३ –

**चौंडेश्वरी सहकारी सूतगिरणीतर्फे वार्षिक लाभांश वाटप सोहळा चौंडेश्वरी मंदिराच्या प्रांगणात उत्साहात झाला. या प्रसंगी देवांग समाजाचे अध्यक्ष विश्वनाथ मुसळे व सूतगिरणीचे चेअरमन संजयदादा कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सूत दर फरक, गूळ व तूप वाटप करण्यात आले.त्यामुळे सभासदांना दीपावलीचे हे अमूल्य भेट ठरली आहे.**

कार्यक्रमास उपाध्यक्ष कुमार कबाडे, मधुकर वरुटे, डॉ.गो.सी. ढवळे, राजेंद्र बिद्रे, सुवर्णा सातपुते, ज्योती वरुटे, मनोहर मुसळे, संतोष वरुटे, मारुती निमणकर,श्रीनिवास सातपुते,अशोक वरुटे आदी उपस्थित होते.

चेअरमन संजयदादा कांबळे यांनी,संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेतला. संस्थेच्या उत्पादनात गुणवत्ता, खर्च नियंत्रण आणि सभासद हिताला सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याचे त्यांनी सांगितले. सूतगिरणीने गेल्या काही वर्षांत जागतिक स्तरावर स्पर्धात्मक स्थिती, बाजारात चढ – उतार कापूस दर, सुताचे दरातील कापड उत्पादन, बाजारातील मंदी आदी समस्यांना सामोरे जावे लागले. संस्थेने उत्पादन प्रक्रियेत दर्जात्मक सुधारणा केल्या असून खर्चात काटकसर, व्यवस्थापनातील पारदर्शकता आणि सभासदांच्या हिताचा विचार यामुळे सूतगिरणी आर्थिक स्थैर्य निश्चितच येत्या काळात निर्माण करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी अनेक सभासदांनी संस्थेच्या कार्यप्रणालीबद्दल समाधान व्यक्त केले.सूतगिरणीवर असलेला विश्वास हेच संस्थेचे खरे बळ असल्याचे त्यांनी सांगितले.

## विना परवाना बांधकाम; एकावर गुन्हा दाखल

सरूड, ता.१३ (प्रतिनिधी)–

**शाहूवाडी तालुक्यातील चनवाड येथे विना परवाना घराचे बांधकाम केल्या प्रकरणी मारूती सदाशिव माने (रा. कोपार्डे ) यांच्यावर शाहूवाडी पोलिसात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ५२(१ ) यां कलमानुसार गुन्हा दाखल झाला आहे.माने यांच्या विरोधात मंडल अधिकारी भटूकुमार दाभाडे यांनी फिर्याद दिली आहे.**

कोपार्डे येथील मारूती माने यांनी २०२२ ते २०२४च्या दरम्यान चनवाड येथे गट नंबर १७२ मध्ये प्लॉट क्रमांक १४ / १५ मध्ये विना परवाना बांधकाम केले होते. त्यांनी बांधकाम करताना नगर रचना विभागाची परवानगी घेतली नव्हती. त्यांच्या विरोधात छबुताई आनंदा माने यांनी शाहूवाडी तहसील कार्यालय, जिल्हाधिकारी, नगर रचना विभागाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारदाराने पाठपुरावा केल्यामुळे अखेर शाहूवाडी महसूल विभागाचे तहसीलदार गणेश लव्हे यांनी विना परवाना बांधकामावर कारवाई करण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार मंडल अधिकारी यांनी मारूती माने यांच्या विरोधात तक्रार दिली आहे.

## बिबट्यासदृश्य वन्य प्राण्याचा युवकावर हल्ल्याचा प्रयत्न

कराड ,ता.१३(प्रतिनिधी) –

**वाखाण परिसरात शेतात पाणी लावण्यासाठी गेलेल्या युवकावर बिबट्यासदृश्य प्राण्याने झडप घातल्याचा प्रकार सोमवारी सायंकाळी घडला. सदरची माहिती मिळताच कराडच्या वन अधिकारी ललिता पाटील यांनी घटनास्थळी पथक पाठवले आहे.**

कराड वाखाण परिसरात नाना जगताप यांच्या शेतात अमोल कोळी हा युवक शेतात पाणी लावण्यासाठी गेला होता. त्यादरम्यान बिबट्यासदृश्य प्राण्याने संबंधितावर झडप घातली. त्या दोघांच्या मध्ये गेट असल्याने अमोल कोळी यास दुखापत झाली नाही. मात्र या प्रकराने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## दुचाकी धडकेत युवती जखमी

सांगली, ता. १३ (प्रतिनिधी)–

**भरधाव दुचाकीने धडक दिल्याने युवती जखमी झाली. हा अपघात बायपास रस्त्यावरील एका दुचाकी विक्रीच्या दुकानासमोर झाला.**

प्रतिक्षा नानासो पाटील (वय २७ रा. शिवाजी चौक, कर्नाळ, ता. मिरज) असे जखमीचे नाव आहे. याबाबत सांगली शहर पोलीस ठाण्यात नोंद झाली आहे.

प्रतिक्षा पाटील ही तिच्या दुचाकीवरुन खाली उतरत होती. त्याचवेळी भरधाव दुचाकीने तिला धडक दिली. यामध्ये तिच्या अंगठ्यास दुखापत झाली आहे. पोलिसांनी अज्ञात दुचाकी चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.


## इचलकरंजी महानगरपालिका, जि. कोल्हापूर
### सार्वजनिक उद्यान विभाग
### जाहीर नोटीस सूचना क्र.१ / २०२५–२६
### दि. १४/१०/२०२५

इचलकरंजी महानगरपालिकेकडील उद्यान विभागाकडील महानगरपालिका फंड अंतर्गत A B C D झोन नुसार ४ कामाची निविदा मागविणेत येत आहेत सदर निविदा http://ichalkaranjimnp.in या संकेत स्थळावर दि. १४ / १० / २०२५ सकाळी ११:०० वाजेपासून दि. २३/१०/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत पहावयास मिळेल भरलेली निविदा सादर करणेची अंतिम दि. २३/१०/२०२५ दुपारी २:०० वाजे पर्यंत राहील शक्य झालेस निविदा दि. २४/१०/२०२५ दुपारी २:०० वाजता उपस्थिती मक्तेदाराच्या समोर उघडणेत येईल. तसेच निविदा संबधी सर्व अटी व शर्ती संबधित विभागात कार्यालयीन वेळेत व महानगरपालिका नोटीस बोर्डावर तसेच http://ichalkaranjimnp.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.

सही/–
**(नंदू परळकर)**
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (SRM E-Tender) from registered contractors/suppliers on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahartransco.in for following works.**

| Sr. No. | RFX No. | Desrciption of work | Tender Amount in Rs. (Incl. GST & Labour cess) | Tender Fee in Rs. (Incl. of Tax) | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 7000037837 | Work of Arresting Oil Leakages from various joints of ICT's & Power Transformer by using latest technology of Power seal online gasketing Method at various 220/132/110KV EHV S/Stns under EHV O&M Division, Kolhapur | 25,00,000/- | 590/- | 25,000/- |

For further details visit our website **https//srmtender.mahatransco.in**

**Start date of submission of bids From : 13.10.2025 @ 18:00 Hrs.**

**Last date of submission of bids upto : 29.10.2025 @ 10:00 Hrs.**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-tendering portal **www.mahatransco.in**

**Save Energy**

**Executive Engineer**
**EHV O&M Division, Kolhapur**

## फॉर्म झेड
### (पहा सब– रूल (११ (ड – १ ) ) रूल १०७ प्रमाणे )
### स्थावर मिळकतीचा ताबा नोटीस

खाली सही करणार वसुली अधिकारी श्री आदिनाथ को–ऑप. बँक लि., इचलकरंजी ७/२३, २४, जनता चौक, इचलकरंजी ता.हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी दिनांक २०/०२/२०२५ इ रोजीची मागणी नोटीस कर्जदार, सहकर्जदार व त्यांचे जामिनदार यांना देवूनही वसुली दाखले प्रमाणे रक्कम रु. ४,६६, ३१५ = ८६ ( अक्षरी रू.चार लाख, सहासष्ठ हजार, तीनशे पंधरा, पैसे शहारैशी फक्त) रक्कम भरणे बाबत कळविले होते.

कर्जदार श्री. सल्लाउद्दीन बाबासो जमादार सहकर्जदार श्री. अल्लाउद्दीन बाबासो जमादार, श्रीमती न्यायमती बाबासो जमादार व सौ. जरीना अस्लम खलीप रा. मुजावर गल्ली, बिरोबा मंदिर रूई ता. हातकणंगले जि. कोल्हापूर व त्यांचे जामिनदार यांनी सदर मागणी नोटीसीत नमूद रक्कम रु. ४,६६, ३१५ = ८६ (अक्षरी रु.चार लाख, सहासष्ठ हजार, तीनशे पंधरा, पैसे शहारैशी फक्त) इतकी रक्कम व त्यावरील व्याज खर्च अशी रक्कम सदरची मागणी नोटीस मिळूनही रक्कम भागविलेली नाही. त्यामुळे वसुली / विक्री अधिकारी श्री आदिनाथ को–ऑप. बँक लि. इचलकरंजी यांनी खालील परिशिष्टात नमुद केलेले तारण स्थावर मिळकत जप्ती आदेश नोंद होणे बाबत दिनांक १२/०६/२०२५ इ रोजीच्या दिलेल्या आदेशाप्रमाणे जप्त झालेली आहे.

सदर प्रमाणे कर्जदार, सहकर्जदार हे श्री आदिनाथ को–ऑप. बँक लि, इचलकरंजी या बँकेचे देय रक्कम भागविणेस अपयशी ठरले असलेने प्रस्तुतच्या नोटीसीने श्री. सल्लाउद्दीन बाबासो जमादार सहकर्जदार श्री. अल्लाउद्दीन बाबासो जमादार, श्रीमती न्यायमती बाबासो जमादार व सौ. जरीना अस्लम खलीप यांना व तमाम जनतेस कळविणेत येते की, खाली सही करणार वसुली / विक्री अधिकारी श्री आदिनाथ को – ऑप. बँक लि. इचलकरंजी यांनी खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचा कब्जा, त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे रूल १०७ (११ (ड – १) प्रमाणे व का.क. १५६ अन्वये प्राप्त अधिकारा नुसार दिनांक– १०/१०/२०२५ इ रोजी प्रतिकात्मक कब्जा घेतला आहे:

कर्जदार श्री. सल्लाउद्दीन बाबासो जमादार सहकर्जदार श्री. अल्लाउद्दीन बाबासो जमादार, श्रीमती न्यायमती बाबासो जमादार व सौ. जरीना अस्लम खलीप रा. मुजावर गल्ली, बिरोबा मंदिर रूई ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांना व तमाम लोकांना या ताबा नोटीसीने जागृत करणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद तारण / जप्ती आदेशाच्या स्थावर मिळकती बाबत कोणीही, कसलाही, खरेदी, विक्री व तबदिलीचा व्यवहार करू नये. कोणी तसा बेकायदेशीर व्यवहार केलेस सदरचा व्यवहार हा श्री आदिनाथ को–ऑप. बँक लि. इचलकरंजी या बँकेच्या देय रक्कम दि.३०/०९/२०२५ अखेर रू. ४,४६,८०४ = ३८ (अक्षरी रु. चार लाख, शेहचाळीस हजार, आठशे चार, पैसे अडतीस फक्त) व त्यावरील पुढील व्याज खर्चासह सदर मिळकतीवर बोजा राहील.

**परिशिष्ट**

**स्थावर मिळकतीचे वर्णन–**

जिल्हा व तुकडी कोल्हापूर, पोट तुकडी इचलकरंजी पैकी मे. सह. दुय्यम निबंधकसो, वर्ग–२, इचलकरंजी यांचे अधिकार कक्षेतील तसेच जि.प. कोल्हापूर, ता.पं.स. व तहसिल हातकणंगले पैकी मौजे रुई गावाचे ग्रामपंचायत हद्दीतील कर्जदार, सहकर्जदार यांचे मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे–

मौजे रूई सि.स.नं. ७३० क्षेत्र २५१.९ चौरस मिटर या पुरे सि.स.नं पैकी ९२.०० फुट बाय १७ फुट ६ इंच याचे एकुण १६१९.२ चौरस फुट याचे १५०.४८ चौरस मिटर (खरेदीपत्राप्रमाणे क्षेत्र १५३.०० चौरस मिटर) ची जागा व या मधील बंदिस्त घर मिळकत सर्व. यास मौजे रूई ग्रामपंचायत मिळकत नंबर ११७७ तदंगभूत वस्तुसह व इंजेमंटरी हक्कासह सर्व यासी चतु:सिमा खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| **पुर्वेस** – | रस्ता |
| **पश्चिमेस** – | श्री. रसुल धोंडीबा वाडकर यांची मिळकत, |
| **दक्षिणेस** – | बोळ रस्ता |
| **उत्तरेस** – | श्री. गजबर हुसेन नदाफ व म्हमुलाल धोडी वाडकर यांची मिळकत, |

येणे प्रमाणे मिळकतीचे वर्णन असे.

**तारीख : १३/१०/२०२५**
**ठिकाण : इचलकरंजी**

**शिक्का**

**सही**
**व्ही. बी. उगारे**
वसुली / विक्री अधिकारी
म.स.सं अधिनियम १९६०चे कलम १५६व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये
श्री. आदिनाथ को–ऑप. बँक लि. इचलकरंजी
ता.हातकणंगले जि.कोल्हापूर
मो.नं. ७५८८१८५४०८

## कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालय – ४१६ ००३.

PWD

दूरध्वनी क्रं. : (०२३१) २६६६८५५
ई मेल : spkolhapur.ee@mahapwd.gov.in
फॅक्स नं. : (०२३१) २६५०१४०
वेब साईट : www.mahapwd.com
जा. क्रं. लेखा/निविदा/सु.क्रं.११/२६८६/२०२५
दिनांक : ०९/१०/२०२५

सत्यमेव जयते
**महाराष्ट्र शासन**

### ई – निविदा सूचना क्र.११, सन २०२५–२६ (ऑनलाईन)

कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खालील नमुन्यातील (B-1) निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. निविदाधारकांना सुचित करण्यात येते की, ऑनलाईनमध्ये प्रसिद्ध केलेल्या व कॉन्ट्रॅक्ट डाटामधील अटी तांत्रिक स्पेसिफिकेशन व शेड्युलड बी–मधील परिणाम हे बिड डाटा निविदा संचामध्ये समाविष्ट करणेत आलेले आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रू. लक्ष | इसारा रक्कम | निविदा फी रूपये | काम पुर्ण करणेचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पन्हाळा वाघबीळ बोरपाडळे वाठार तर्फ वडगाव हातकणंगले इचलकरंजी शिरदवाड शिवनाकवाडी राज्य हद्दी पर्यंतचा राज्य मार्ग क्र. १९२ किमी ०/०० ते २४/०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | ४६.२१ | ४७,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५ व त्यावरील |
| २ | कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी तालुक्यातील रा.म.मा क्र. २०४ पासून शिराळे येळवडी सावर्डे इजोली ते कोलीक प्रजिमा १९ ला मिळणारा रस्ता प्रजिमा क्र. ११७ कि.मी. १५/०० ते ३०/१०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे.(१.४०० किमी ओव्हरलप लांबी) | १५.६७ | १६,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५–अ व त्यावरील |
| ३ | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील आपटी नावली देवाळे बोरपाडळे आरले सातवे आमतेवाडीवाळकेवाडी भाडळे राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ला जोडणारा रस्ता प्रजिमा क्र. ११५ कि.मी. ०/०० ते २१/२५० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २७.०८ | २८,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५–अ व त्यावरील |
| ४ | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.२०४ पासून डोनोली जवळून चरण सैदापूर थेरगाव सावर्डे सातवे मोहरे कोडोली प्रजिमा क्र. ६ कि.मी. ८/० ते २१/६०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | १२.६८ | १३,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ६ व त्यावरील |
| ५ | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील रा.मा.क्र.१९९ पासून मासुदमाले ते रा.मा.क्र.१९२ ला मिळणारा ते कोडोली काखे मांगले ते जिल्हा हद्दीपर्यंत प्रजिमा.क्र.९ कि.मी. ०/० ते १८/६०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | १४.६३ | १५,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ६ व त्यावरील |
| ६ | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील निगवे कुशिरे पोहाळे गिरोली केखले कोडोली रस्ता प्रजिमा १२ कि.मी. २/०० ते १८/२०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | १२.९७ | १३,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ६ व त्यावरील |
| ७ | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील रामा. १९२ पासून राक्षी धबधबेवाडी निकमवाडी इंजोळे बांदीवडे घुंगुर रस्ता प्रजिमा ८८ कि.मी. ०/०० ते १८/५०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | १०.४१ | ११,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ६ व त्यावरील |
| ८ | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील रा.म.मा.२०४ पासून केर्ली वाडी रत्नागिरी जोतिबा गिरोली रस्ता प्रजिमा ११ कि.मी. १/५०० ते १३/४०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. अ) प्रजिमा ११ अ कि.मी. ०/० ते १०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. ब) प्रजिमा ११ ब कि.मी. ०/० ते २/८०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. क) प्रजिमा ११ क कि.मी. ०/० ते ०/६०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | २६.४५ | २७,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५–अ व त्यावरील |
| ९ | कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील प्रजिमा १२ पासून जाखले भैरेवाडी ते रा.मा. १९२ ते चिकूडेस जाणारा प्रजिमा ९१ कि.मी. ०/० ते ८/७५० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे. | ९.२६ | १०,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| १० | रा.म.मा.१९१ पासून नांदगांव पिशवी बांबवडे सरूड साग़ांव जिल्हा हद्द रस्ता रा.मा.क्र.३९७ कि.मी. ०/० ते २३/१०० व्दिवार्षीक देखभाल करणे ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर | ३८.१६ | ३९,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५ व त्यावरील |
| ११ | आरळा शित्तूर राघुचावाडा उदगिरी रस्ता प्रजिमा क्र. १ कि.मी. ०/०० ते १६/००० ची वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे. ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर | ३१.३० | ३२,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५ व त्यावरील |
| १२ | निळे करंगुळे अलतूर पुसाले उदगिरी प्रजिमा क्र. २ कि.मी. ०/०० ते २३/९०० ची वार्षीक देखभाल करणे. ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर | ३७.०० | ३८,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५ व त्यावरील |
| १३ | तुरुकवाडी गोंडोली सोंडोली शित्तूर वारुण उखळू रस्ता प्रजिमा क्र. ३ कि.मी. ०/०० ते २६/८३० ची वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे. ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर ची व्दिवार्षीक देखभाल करणे. ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर | ४८.८८ | ४९,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५ व त्यावरील |
| १४ | रा.म.मा. १६६ ते येळाणे कोपार्डे शिरंगाव सवते शिंपे सरूड रस्ता प्रजिमा क्र. ४ कि.मी. ०/०० ते १२/८०० ची वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे. ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर | ९.९९ | १०,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ७ व त्यावरील |
| १५ | रा.म.मा.१६६ ते आंबा विशाळगड रस्ता प्रजिमा क्रं. ७ किं.मी. ०/०० ते २०/०५० ची वार्षीक देखभाल दुरूस्ती करणे. ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर | ४०.२० | ४१,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५ व त्यावरील |
| १६ | रा.म.मा.३९७ पासून सरूड कापशी भेडसगाव नेर्ले रस्ता प्रजिमा ७४ कि.मी. ०/० ते १३/८००ची व्दिवार्षीक देखभाल करणे ता. शाहूवाडी जि. कोल्हापूर | ३०.७२ | ३१,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५ व त्यावरील |
| १७ | राष्ट्रीय महामार्ग क्र. २०४ पासून शिराळे येळवडी सावर्डे इंजोली ते कोलीक प्रजिमा १९ ला मिळणारा रस्ता प्रजिमा . क्रं ११७ किमी ०/००ते १५/०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर | १८.१२ | १९,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५–अ व त्यावरील |
| १८ | गावडी शेंबवणे मांजरे रामा. १५० ते चिखलवाडी गिरगांव बुरंबाळ कांटे ते रामा क्र. १९३ ला मिळणारा रस्ता प्रजिमा.क्र. ११८ किमी ०/०० ते २०/४५० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर | २९.४७ | ३०,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५–अ व त्यावरील |
| १९ | राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ पासून शाहुवाडी कोळगांव टेकोली पद्रे रा.मा. १५० ला मिळणारा इजिमा १७९ रस्ता प्रजिमा . क्रमांक ११९ किमी ०/०० ते ११/६०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर | १९.०० | २०,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५–अ व त्यावरील |
| २० | शिराळे तर्फ मलकापुर आंबार्डे आरूळ करंजोशी मोळावडे सावर्डे खुर्द सावे बाजागवाडी शित्तूर तर्फ मलकापुर सोनवडे सुपात्रे ते रा.म.मा.क्र. २०४ ला मिळणारा रस्ता प्रजिमा . क्रमांक १२० किमी ०/०० ते २८/४०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर | ४३.६३ | ४४,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ५–अ व त्यावरील |
| २१ | राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ पासून धोपेश्वर धनगरवाडी ऐनवाडी धनगरवाडी ते पातवडे माण रा.मा.क्रं. १५० ला मिळणारा रस्ता प्रजिमा क्रमांक १२१ किमी ०/०० ते १६/४०० ची वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे ता. शाहुवाडी जि. कोल्हापूर | १४.१३ | १५,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ६ व त्यावरील |
| २२ | राम मा २०४ पासून वाघबीळ दानेवाडी गिरोली रस्ता रामा क्र १९९ किमी ०/०० ते ५/४०० ची वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे | १२.३२ | १३,०००/– | ५००/– +GST | १२ महिने | वर्ग ६ व त्यावरील |

**ई – निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | दि. १३/१०/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते दि. २०/१०/२०२५ (सायं. १८.०० पर्यंत) |
| निविदा संचाची फी व इतर मूळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. २४/१०/२०२५ (सायं. १७.०० पर्यंत) |
| तांत्रिक व आर्थिक निविदा उघडण्याचे ठिकाण, दिनांक व **(शक्य झाल्यास)** | दि. २४/१०/२०२५ (सायं. १०.०१ नंतर) |

**टीप :–** खालील संकेतस्थळावर ई–निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://www.mahapwd.com सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.
२. कार्यकारी अभियंता, विशेषप्रकल्प (सा. बां.) विभाग, कोल्हापूर कार्यालयातील सूचना फलकावर.
३. निविदाकारांनी निविदासंदर्भात सर्व दस्तऐवज ऑफलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कमेची ऑफलाईन पावती, ऑनलाईन कोरा निविदासंच डाऊनलोड केलेली पावती, स्वतच्या नावाची गोपनीयता बाळगुन निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक वेळ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथाऑफलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
४. सदर कामांची एक अथवा सर्वनिविदा– कोणतेही कारण न देतारद्दकरण्याचे अधिकारी सक्षम अधिकारी कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवलेले आहेत. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
५. वरील कामांचीऑफनिविदा सूचना सा. बां. विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.
६. वरील निविदा सुचने मधिल एका कंत्राटदारास या आर्थिक वर्षात दोनच (२) कामे देणेत येतील.
७. वरील निविदा सुचने मधिल रु. १०.०० लक्ष रक्कमे आतील कामांना रोड रोलर व बिटुमन बॉयलर ही यंत्रसामुग्री स्वमालकीची अथवा भाडेतत्वावर उपलध्ब असणे अनिवार्य राहील. तसेच रु.१०.०० लक्ष रक्कमे वरील कामांना सदरची यंत्रसामुग्री व इतर यंत्रसामुग्री स्वमालकीची असणे अनिवार्य राहील.

**(चं. अ. आयरेकर)**
**कार्यकारी अभियंता,**
**विशेष प्रकल्प (सा. बां.) विभाग, कोल्हापूर.**

# टीम इंडिया विजयाच्या उंबरठ्यावर

## केवळ हव्यात ५८ धावा : दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजला २४८ धावांवर रोखले

नवी दिल्ली,ता.१३–

**कसोटी जिंकण्यापासून भारतीय संघ केवळ एक पावलावर आहे.फक्त ५८ धावांची टीम इंडियाला गरज आहे.वेस्ट इंडिजविरुद्ध १२१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना संघाने एका विकेटच्या मोबदल्यात ६३ धावा केल्या आहेत. चौथ्या दिवशी खेळ थांबला तेव्हा केएल राहुल २५ आणि साई सुदर्शन ३० धावांवर नाबाद राहिले होते. दोघांनीही आधीच अर्धशतकी भागीदारी केली आहे. यशस्वी जैस्वाल ८ धावा करून बाद झाला.**

फॉलोऑन खेळणाऱ्या वेस्ट इंडिज दुसऱ्या डावात ३९० धावांवर सर्वबाद झाला. जस्टिन ग्रीव्हज (५० धावा) आणि जेडेन सील्स (३२ धावा) यांनी ११३ चेंडूत १० व्या विकेटसाठी ७९ धावांची भागीदारी केली. एका क्षणी, वेस्ट इंडिजचा डाव पराभवाच्या धोक्यात होता.जॉन कॅम्पबेल (११५ धावा) आणि शाई होप (१०३ धावा) यांनी शतके झळकावून डावाचा पराभव टाळला. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १७७ धावांची भागीदारी केली.

दरम्यान,या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय संघाने ५१८ धावांचा डोंगर उभारून डाव घोषित केला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या वेस्ट इंडिजचा पहिला डाव २४८ धावांवर आटोपला. भारताने वेस्ट इंडिजला फॉलोऑन दिला. दुसऱ्या डावात फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिजला भारतीय संघाने सुरूवातीला मोठे धक्के दिले. पण कॅम्पबेल आणि शे होपने मिळून वेस्ट इंडिजचा डाव सांभाळला. यादरम्यान कॅम्पबेलने षटकार मारून आपले शतक पूर्ण केले. हे शतक वेस्ट इंडिज संघासाठी खूप खास ठरले आहे.



या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना भारतीय फलंदाजांनी वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांचा चांगलाच समाचार घेतला. भारतीय संघाने ५१८ धावा करून डाव घोषित केला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या वेस्ट इंडिजला हवी तशी सुरूवात करता आली नव्हती. सलामीवीर फलंदाज जॉन कॅम्पबेल अवघ्या १० धावा करत माघारी परतला होता. पण दुसऱ्या डावात संघाला फॉलोऑन मिळालेला असताना कॅम्पबेल खंबीरपणे उभा राहिला. कॅम्पबेलने शे होपसोबत मिळून १५० हून अधिक धावांची भागीदारी केली. या दरम्यान त्याने १७४ चेंडूंचा सामना करत आपले पहिले शतक पूर्ण केलं. त्याने षटकार मारून आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले यासह २००२ नंतर भारतात कसोटी क्रिकेट खेळताना वेस्ट इंडिजचा पहिलाच सलामीवीर फलंदाज ठरला आहे.

या सामन्यातीस पहिल्या डावात मोठी धावसंख्या उभारून भारतीय गोलंदाजांनी वेस्ट इंडिजचा पहिला डाव स्वस्तात संपुष्टात आणला. त्यामुळे वेस्ट इंडिजला फॉलोऑन मिळाला. दुसऱ्या डावात फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिजला चांगल्या सुरूवातीची गरज होती. पण तसे काही झाले नाही. सलामीला आलेला तेगनारायण चंद्रपॉल अवघ्या १० धावांवर माघारी परतला. तर ॲलिक अँथेंज अवघ्या ७ धावांवर माघारी परतला. वेस्ट इंडिजला ३५ धावांवर दुसरा धक्का बसला. पण त्यानंतर शे होप आणि कॅम्पबेलने मिळून वेस्ट इंडिजला दमदार पुनरागमन करून दिले.भारताकडून जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले.मोहम्मद सिराजने दोन बळी घेतले. रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.




**कॅम्पबेल हा भारतात भारतीय संघाविरूद्ध कसोटी क्रिकेट खेळताना शतकी खेळी करणारा वेस्ट इंडिजचा १४ वा सलामीवीर फलंदाज ठरला आहे. गेल्या २३ वर्षांपासून वेस्ट इंडिजच्या एकाही सलामीवीर फलंदाजाला असा पराक्रम करता आला नव्हता. २००२ मध्ये वेस्ट इंडिजचा सलामीवीर वेव्हेल हिंड्सने कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर शतकी खेळी केली होती. ॲलन फिट्जरॉय रे हे भारतीय संघाविरूद्ध भारतात कसोटी क्रिकेट खेळताना वेस्ट इंडिजचे पहिलेच सलामीवीर फलंदाज होते.**




# सिराज गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी

## कसोटीत सर्वाधिक बळींचा विक्रम

नवी दिल्ली,ता.१३–

**भारतीय वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने या वर्षात सर्वाधिक कसोटी बळी घेण्याचा विक्रम आपल्या नावावर केला आहे. यासह तो या वर्षात कसोटीत सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत अव्वल स्थानी पोहोचला आहे.**

सिराजने झिम्बाब्वेचा गोलंदाज ब्लेसिंग मुजरबानीला मागे टाकले आहे. ही कामगिरी त्याने वेस्ट इंडिजविरुद्ध दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या डावात केली. विंडिजच्या शाई होपला बाद करून सिराज या वर्षात कसोटीत सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला.

ताज्या आकडेवारीनुसार, दिल्ली कसोटी सामन्यातील दोन्ही डावांत मिळून सिराजने ३ बळी घेतले आहेत. या ३ बळींच्या जोरावर तो २०२५ मध्ये सर्वाधिक कसोटी बळी घेणारा गोलंदाज ठरला आहे. या वर्षातील त्याच्या बळींची संख्या आता ३७ झाली आहे. यासोबतच त्याने ३६ बळी घेतलेल्या मुजरबानीला मागे टाकले. सिराजने या वर्षात आतापर्यंत ८ कसोटी सामन्यांच्या १५ डावांत ३७ बळी घेतले आहेत. यामध्ये त्याने २ वेळा ५ आणि २ वेळा ४ विकेट्स घेण्याची कामगिरी केली आहे. त्याची सर्वोत्तम कामगिरी ७० धावांत ६ बळी ही आहे. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या मुजरबानीने ९ सामन्यांत ३६ बळी घेतले आहेत. त्यात त्याने ३ वेळा ५ बळी घेण्याची कामगिरी केली आहे.

# वैभव सूर्यवंशी बिहार रणजी संघाचा उपकर्णधार

पाटणा,ता.१३–

**आगामी रणजी करंडक हंगामातील पहिल्या दोन सामन्यांसाठी बिहार रणजी संघाने १४ वर्षीय फलंदाजीतील उदयोन्मुख तारा वैभव सूर्यवंशी याची उपकर्णधार म्हणून नियुक्ती केली आहे. या संघाचे नेतृत्व साकिबुल गनी करेल. बिहार क्रिकेट असोसिएशनने रविवारी रात्री उशिरा संघाची घोषणा केली.**




बिहारचा प्लेट लीगचा पहिला सामना बुधवारी १५ रोजी मोईन-उल-हक स्टेडियमवर अरुणाचल प्रदेशविरुद्ध होणार आहे. मागील रणजी हंगामात एकही विजय न मिळवल्याने बिहारची प्लेट लीगमध्ये घसरण झाली होती. वैभव सूर्यवंशी हा मूळचा बिहारमधील समस्तीपूरचा रहिवासी आहे.

सूर्यवंशीने २०२३-२४ च्या हंगामात वयाच्या अवघ्या १२ व्या वर्षी रणजी करंडक क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यानंतर, इंडियन प्रीमियर लीग (करार मिळवणारा तो सर्वात युवा खेळाडू ठरला. त्याला राजस्थान रॉयल्सने या वर्षाच्या हंगामापूर्वी संघात समाविष्ट केले, तेव्हा त्याचे वय १३ वर्षे होते. त्याने इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया दौऱ्यांसाठीच्या भारतीय १९ वर्षाखालील संघातही सहभाग घेतला आहे.राजस्थान रॉयल्सकडून खेळताना गुजरात टायटन्स विरुद्ध त्याने अवघ्या ३५ चेंडूंमध्ये शतक झळकावले. टी-२० क्रिकेटमध्ये शतक करणारा तो पुरुषांच्या क्रिकेटमधील सर्वात युवा खेळाडू ठरला. आयपीएलमधील हे दुसरे सर्वात जलद शतक होते.

पुढील वर्षी झिम्बाब्वे आणि नामिबिया येथे होणाऱ्या १९ वर्षाखालील विश्वचषकासाठी भारतीय संघात स्थान मिळण्याची शक्यता असल्याने सूर्यवंशी बिहारसाठी संपूर्ण हंगाम खेळण्याची शक्यता कमी आहे.

# सात्विक-चिरागच्या कामगिरीकडे लक्ष

नवी दिल्ली,ता.१३ –

**मंगळवारपासून सुरू होणाऱ्या ९५०,००० डॉलर्सच्या डेन्मार्क ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेत सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही भारतीय पुरुष दुहेरी जोडी भारताचे नेतृत्व करेल. आणि आपल्या कामगिरीचे विजेतेपदात रूपांतर करण्याचा प्रयत्न करेल. सहाव्या मानांकित जोडीचा पहिल्या सामन्यात स्कॉटलंडच्या क्रिस्टोफर ग्रिमली आणि मॅथ्यू ग्रिमलीशी होणार आहे.**

सात्विक आणि चिराग या हंगामात भारताचे सर्वोत्तम प्रदर्शन करणारे बॅडमिंटनपटू ठरले आहेत. पण त्यांना अद्याप एकही विजेतेपद जिंकता आलेले नाही. ते हाँगकाँग आणि चीन मास्टर्स सुपर ७५० स्पर्धांच्या अंतिम फेरीत पोहोचले होते. या जोडीने पॅरिसमधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत त्यांचे दुसरे कांस्यपदक जिंकले आणि इतर अनेक स्पर्धांच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

## स्कॉटलंडच्या क्रिस्टोफर ग्रिमली – मॅथ्यू ग्रिमलीशी होणार लढत

पुरुष एकेरीत जागतिक क्रमवारीत २८ व्या क्रमांकावर असलेला आयुष शेट्टी पहिल्या फेरीत फ्रान्सच्या टोमा ज्युनियर पोपोव्हशी सामना करेल. आणखी एक भारतीय जागतिक क्रमवारीत १९ व्या क्रमांकावर असलेला लक्ष्य सेन, आयर्लंडच्या न्हाट न्गुयेनशी सामना करणार आहे.महिला एकेरीत, युवा अनमोल खरबचा सामना पहिल्या फेरीत इंडोनेशियाच्या सातव्या मानांकित पुत्री कुसुमा वर्दानीशी होईल. पुरुष दुहेरीत, पृथ्वी कृष्णमूर्ती रॉय आणि साई प्रतीक यांचा सामना पहिल्या फेरीत चिनी तैपेईच्या लिऊ कुआंग हेंग आणि यांग पो हान यांच्याशी होईल.महिला दुहेरीत, रुतापर्णा पांडा आणि श्वेतापर्णा पांडा यांचा सामना स्कॉटलंडच्या जूली मॅकफर्सन आणि सियारा टोरेन्सशी होईल, तर कविप्रिया सेल्वम आणि सिमरन सिंघी यांचा सामना बल्गेरियाच्या गॅब्रिएला आणि स्टेफनी स्टोएवाशी होईल. मिश्र दुहेरीत, मोहित आणि लक्षिता जगलान, रोहन कपूर आणि रुत्विका शिवानी आणि ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांचा सामना आपला ठसा उमटवण्याचा प्रयत्न असेल.



# जोश्ना चिनप्पाला जपान ओपन स्क्वॅश स्पर्धेचे विजेतेपद

टोकियो, ता.१३ –

**भारताची दोन वेळा आशियाई विजेती जोश्ना चिनप्पाने पुन्हा एकदा दमदार कामगिरी केली. योकोहामा येथे झालेल्या जपान ओपन २०२५ स्क्वॅश स्पर्धेत तिने महिला एकेरीचे जेतेपद पटकावले. महिला एकेरीच्या क्रमवारीत ११७ व्या क्रमांकावर आणि जपानमध्ये बिगरमानांकित भारतीय स्क्वॅश खेळाडूने पीएसए चॅलेंजर स्पर्धेत तिसरी मानांकित जागतिक क्रमवारीत ५३ व्या क्रमांकावर असलेल्या इजिप्तच्या हया अलीचा ११-५, ११-९, ६-११, ११-८ असा पराभव करून विजयाला गवसणी घातली.**

जोश्ना चिनप्पाची हया अलीसोबतचा हा दुसरा सामना होता. या वर्षी बर्म्युडा ओपनच्या दुसऱ्या फेरीत या दोन्ही स्क्वॅश खेळाडू एकमेकांसमोर आल्या होत्या. जोश्नाने हा सामना ११-८, १०-१२, ५-११, ११-९, ११-८ असा गमावला होता.जपान ओपनमधील जोशनाचे हे तिच्या कारकिर्दीतील ११ वा पीएसए विजेतेपद होते.

माजी जागतिक क्रमवारीत १० व्या क्रमांकाची स्क्वॅशपटू, जोशनाने २०२३ च्या हांगझोऊ येथील आशियाई क्रीडा स्पर्धेनंतर गुडघ्याच्या शस्त्रक्रियेनंतर पुनरागमन केले आहे. ती आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताच्या कांस्यपदक विजेत्या महिला संघाचाही भाग होती.

या वर्षाच्या सुरुवातीला, जोशनाने जूनमध्ये आशियाई चॅम्पियनशिपमध्ये युवा स्टार अनाहत सिंगसह महिला दुहेरीचे विजेतेपद जिंकले. ती इंडियन ओपनच्या उपांत्य फेरीतही पोहोचली, जिथे ती अनाहतकडून पराभूत झाली आणि अनाहत विजेती ठरली.यापूर्वी जपान ओपनमध्ये, जोशनाने उपांत्यपूर्व फेरीत दुसऱ्या मानांकित इजिप्तच्या नार्डिन गरासचा ११-८, १५-१३, ११-९ असा पराभव केला.




**इचलकरंजी : बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया इचलकरंजी सेंटरतर्फे बांधकाम क्षेत्रातील प्रल्हाद माने तसेच बांधकाम क्षेत्रातील विविध व्यावसायिकांचा विविध पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित बिल्डर्स असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष जगन्नाथ जाधव, माजी राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश पाटील, दत्ता मुळे, प्रताप साळुंखे यांच्यासह नितीन धूत, फैय्याज गैबान, शीतल काजवे, राजेंद्र शिंत्रे आदी.**

# बिल्डर्स असोसिएशन ऑफ इचलकरंजी सेंटरचे कार्य कौतुकास्पद

इचलकरंजी,ता.१३–

**बिल्डर्स असोसिएशन ऑफ इचलकरंजी सेंटरचे कार्य कौतुकास्पद आहे. देशात बावीस तर महाराष्ट्रात सात सेंटरचे स्वमालकीचे कार्यालये आहेत. त्यामध्ये इचलकरंजी सेंटरचा समावेश असल्याचा अभिमान वाटतो. बिल्डर्स डे निमित्त गेली तीन वर्षे राबविण्यात येत असलेला उपक्रम आदर्शवत आहे. सर्व अवॉर्ड विजेत्यांना या पुरस्कारांमुळे यापुढील काळात अधिक प्रेरणा मिळत राहिल, असे प्रतिपादन बिल्डर्स असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष जगन्नाथ जाधव यांनी केले.**

बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया इचलकरंजी सेंटर व आदि स्टील यार्ड यांच्यावतीने बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांचा विविध पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहूणे म्हणून जाधव बोलत होते. यावेळी माजी राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश पाटील अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बांधकाम क्षेत्रातील उत्कृष्ट बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर प्रल्हाद माने यांचा विशेष पुरस्काराने गौरव करण्यात आला. माने यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी गुणवंत कामगार पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये चंपालाल मालविया (फरशी फिटिंग),जगदीश जांगिड (सुतार),धनंजय कुलकर्णी (पेंटर), सतीश माने(पेंटर),निखिल महाजन(प्लंबर),संजय माने (फॅब्रिकेशन), चंद्रकांत सस्ते (गिलावा) आणि जगदीश हिरेमठ (सेंट्रींग) यांचा सन्मान करण्यात आला. आदी स्टील यार्ड अरुण चौगुले यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

अविनाश पाटील म्हणाले, मोठा बिल्डर्स अथवा काँट्रॅक्टर होण्यासाठी अनेक महत्वाच्या घटकांची मदत होत असते. अशा विविध घटकांचा यथोचित सत्कार करुन बिल्डर्स असोसिएशनने सांभाळलेली परंपरा ही महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्राला दिशा देणारी आहे.

प्रारंभी दीपप्रज्वलन व सर विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन कुंतीलाल पाटणी, कुतुब गैबान व मान्यवरांच्या हस्ते झाले. उपस्थितांचे स्वागत अध्यक्ष फैय्याज गैबान व शितल काजवे यांनी शाल, फेटा व स्मृती चिन्ह देवून केले. प्रास्ताविकमध्ये नितीन धूत यांनी, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया इचलकरंजी सेंटरच्या कार्याचा आढावा घेतला. इचलकरंजी सेंटरला बेस्ट इमेज बिल्डींग पुरस्कार मिळाल्याचा त्यांनी यावेळी आवर्जुन उल्लेख केला.

पाहुण्यांचा परिचय करुन बिल्डर असोसिएशनच्या कार्याचा आढावा प्रताप साळुंखे यांनी करुन दिला. महाराष्ट्र राज्याध्यक्ष जाधव यांच्या हस्ते निर्देशिकेचे प्रकाशन करण्यात आले. २० नविन पेटर्न मेंबरांचा प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. आभार रमेश मर्दा यांनी मानले. सुत्रसंचालन मयूर शहा व राजेंद्र शिंत्रे यांनी केले. लायन्स ब्लड बँकेच्या प्रांगणात सोहळा झाला.या कार्यक्रमासाठी दिलीप पटेल, तानाजी हराळे, पुंडलिक जाधव, भगवान कांबुरे, सुहास अकिवटे, संजय रुग्गे, मोहन सातपुते, पन्नालाल डाळ्या, शिवकुमार हिराणी, विकास चंगेडीया, सुधीर लाटकर, राजेंद्र खंडेराजुरी, श्रीकांत लासकर, महेश महाजन, महांतेश कोकळकी, शिवाजी पवार, स्वप्निल शहा आदींनी परिश्रम घेतले.

# पहिल्या ॲशेस कसोटीस पॅट कमिन्स मुकणार?

कॅनबेरा,ता.१३ –

**ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सने २१ नोव्हेंबरपासून पर्थ येथे सुरू होणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या ॲशेस मालिकेतील पहिल्या कसोटीत खेळण्याची शक्यता कमी असल्याचे संकेत दिले आहेत. कमिन्स सध्या पाठीच्या दुखापतीतून सावरत असला तरी कमिन्सला पाठीत कमरेच्या हाडाच्या ताणाची समस्या असल्याचे निदान झाले होते. तेव्हापासून त्याने एकही चेंडू टाकलेला नाही. तो शेवटचा जुलैमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेत खेळला होता.**




सिडनी येथे कार्यक्रमात कमिन्स म्हणाला, मी म्हणेन की, पहिल्या कसोटीत खेळण्याची शक्यता कमी आहे. पण अजूनही काही वेळ शिल्लक आहे. मी आज आणि प्रत्येक दिवशी धावत आहे. मी पुढच्या आठवड्यात गोलंदाजीची तयारी सुरू करेन. मी कदाचित दोन आठवड्यांत नेटमध्ये परत येईन, स्पाइक्स घालून.कसोटी क्रिकेटसाठी तुमच्या शरीराला पूर्णपणे तयार करण्यासाठी किमान एक महिना लागतो. जर तुम्हाला कसोटी सामना खेळायचा असेल, तर तुम्हाला दररोज २० षटके टाकण्यासाठी तयार राहावे लागेल. चार आठवडे हा खूप कमी वेळ आहे, पण ते शक्य आहे.

ऑस्ट्रेलियाचे प्रशिक्षक अँड्र्यू मॅकडोनाल्ड यांनी सांगितले होते की, कमिन्सच्या उपलब्धतेबद्दल निर्णय शुक्रवारी घेतला जाऊ शकतो. कमिन्सने पहिली कसोटी गमावली तरी ॲशेस मालिकेत तो कधीतरी परत येईल असा प्रशिक्षकांना विश्वास आहे.

कमिन्स दुखापतीमुळे तो निराश आहे पण भविष्याबद्दल आशावादी आहे.ही दुखापत सात-आठ वर्षांनी मला झाली आहे. मला माहित आहे की, एकदा मी बरा झालो की, जास्त काळ त्रास देणार नाही. येत्या काळात मी अधिक क्रिकेट खेळेन अशी आशा आहे.ॲशेस मालिकेतील पहिली कसोटी २१ नोव्हेंबरपासून पर्थमध्ये खेळली जाईल. कमिन्सच्या अनुपस्थितीत, वेगवान गोलंदाज जोश हेझलवूड आणि मिशेल स्टार्क यांच्यावर अतिरिक्त जबाबदाऱ्या येण्याची शक्यता आहे.